# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

# प्रथम वर्ष कला

# अभ्यासक्रम-प्रथम सत्र

## Choice Based Credit System (CBCS)

### राज्यशास्त्र जनरल-१०१-अ-:भारतीय संविधान

### C.C. POL - G 101 - A - (Semester I)-Indian Constitution

**WITH EFFECT FROM JUNE २०१८**


# प्रा. डॉ. महेंद्र पाटील

# राज्यशास्त्र विभागप्रमुख

# एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर

**राज्यशास्त्र जनरल-१०१- अः भारतीय संविधान**

**प्रथम सत्र अभ्यासक्रम**

**१. भारतीय राज्यघटना आणि भारतीय संघराज्य व्यवस्था-**

अ) भारतीय संविधान- ऐतिहासिक पार्श्वभूमी, संविधान निर्मिती प्रकिया आणि वैशिष्टये

सरनामा आणि त्यांची वैशिष्टये

ब) भारतीय संघराज्य पद्धती- संरचना, स्वरूप आणि संघराज्याची वैशिष्टये

**२. मूलभूत हक्क, कर्तव्य आणि मार्गदर्शक तत्त्वे**

अ) मूलभूत हक्क आणि कर्तव्ये- अर्थ, स्वरूप, महत्त्व आणि कर्तव्ये, मूलभूत हक्क आणि कर्तव्यातील भेद

ब) मार्गदर्शक तत्त्वे- अर्थ, व्याप्ती, स्वरूप, महत्त्व आणि प्रकार, मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांतील भेद

**३. घटनात्मक मंडळे आणि घटना दुरूस्ती प्रक्रिया**

अ) घटनात्मक मंडळे- राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नीती आयोग,

अ) घटना दुरूस्ती प्रक्रिया- अर्थ आणि महत्त्व, घटनात्मक तरतूदी

महत्त्वपूर्ण घटना दुरूस्त्या- ७३, ७४, ८६ आणि १०१

८

## प्रकरण पहिले

## भारतीय राज्यघटना आणि भारतीय संघराज्य व्यवस्था

### प्र.१ ला. भारतीय संसदीय लोकशाहीची पायाभरणी करणारे बिटिशकालीन प्रमुख कायदे सांगा?

**किंवा**

### भारतीय घटनेला प्रभावित करणारे कायदे स्पष्ट करा?

**किंवा**

### भारतीय घटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा?

ईस्टइंडिया कंपनीने इ.स. १६०० मध्ये राणी एलिझाबेथकडून सनद घेऊन भारतात ब्रिटिश सत्तेची पायाभरणी केली. १७७३ च्या रेग्युलेटिंग कायदयापासून ब्रिटिश पार्लमेंटने भारताच्या अंतर्गत कारभारावर नियंत्रण ठेवण्यास सुरूवात केली. १८५७ च्या बंडानंतर ब्रिटिश पार्लमेंटने ईस्टइंडिया कंपनीची सत्ता नष्ट करून इंग्लंड राजाची सत्ता प्रस्थापित केली.ब्रिटिश राजा भारतमंत्रीच्या नेमणूक करून भारताच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवित असे.शासनाची सुत्रे गव्हर्नर जनरल व त्याला सहाय्य करणाऱ्या चार सदस्याच्या समितीकडे सोपविण्यात आली.गव्हर्नर राजाचा प्रतिनिधी म्हणून काम करू लागला.इंग्रजांनी भारतातील लोकशाही प्रक्रियेला चालना देण्यासाठी पुढील कायदे केलेले दिसतात.

१. **प्रथम कौन्सिल कायदा** (१८६१) - हा कायदा भारतातील लोकशाही निर्मितीतील प्रथम प्रयत्न मानला जाता.या कायदेविषयक सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. कायदा करण्याचा अधिकार असलेल्या केंद्रिय विधिमंडळात कमीत कमी सहा आणि जास्तीत जास्त बारा अतिरिक्त सदस्यांची नेमणूक करण्याचा अधिकार गव्हर्नरला देण्यात आला. या अतिरिक्त सदस्यात निम्मे सदस्य गैरसरकारी असतील आणि त्यांच्यात काही भारतीय सदस्यांची नेमणूक केली जाईल. अशा प्रकारे भारतीयांना कायदेविषयक कार्यात पहिल्यांदा प्रतिनिधित्व देण्यात आले. या कायदामळे भारतीयांना कायदे निर्मितीच्या कामाचा अनुभव आला. त्यामुळे भारतात लोकशाहीच्या निर्मितीला अनुकूल वातावरण तयार होऊ लागले. व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचा विस्तार करण्यात आला. प्रांतिक कार्यकारी मंडळात बदल करून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. प्रांतीय विधिमंडळाची स्थापना करून मद्रास आणि मुंबई प्रांतातील विधिमंडळाना कायदे निर्मितीचा अधिकार प्रदान करण्यात आला. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी परिषदेला कायदे निर्मितीसाठी नवीन प्रांत निर्माण करण्याचा आणि जुन्या प्रांतांच्या सीमेत बदल करण्याचा अधिकार देण्यात आला. या कायदयानुसार भारतात विधिमंडळाची स्थापना करून त्यात मर्यादित प्रमाणात भारतीयांना प्रतिनिधित्व प्रदान केलेले असले तरी हे प्रतिनिधी व्हॉइसरॉयकडून नेमलेले असल्यामुळे सरकारच्या मर्जीतील व्यक्तीची नेमणूक केली जात असे. विधिमंडळ सदस्यांना प्रश्न विचारण्याचा आणि आर्थिक धोरणासंबंधी मत व्यक्त करण्याचा अधिकार नसल्यामुळे त्या सदस्यात्वाला लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीने विचार केल्यास फारसा अर्थ नव्हता.

२. **दुसरा कौन्सिल कायदा** (१८९२)- लॉर्ड मेया व लॉर्ड रिपनने केलेल्या ठरावामुळे लोकशाही विकेंद्रीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन देण्याचे कार्य केले परंतु हे प्रयत्न भारतीयाचा अंसतोष कमी करू शकले नाही.भारतीयाचा अंसतोष कमी करण्यासाठी इंग्रजांनी हा कायदा केला. या कायदयानुसार प्रांतिक व केंद्रीय विधिसमित्याचा विस्तार करण्यात आला. केंद्रीय विधिमंडळात अतिरिक्त सदस्याची संख्या कमीत कमी १० ते जास्तीत जास्त १६ पर्यंत वाढविण्यात आली. केंद्रीय समित्याप्रमाणे प्रांतिक विधिमंडळाचाही विस्तार करण्यात आला. केंद्रीय व प्रांतिक समित्याच्या प्रतिनिधीची अप्रत्यक्ष का होईना निवड करण्यासाठी निवडणूक पद्धतीची सुरूवात करण्यात आली. या कायदयानुसार विधिसमिती सदस्यांचे अधिकार वाढविण्यात आले. अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा, प्रश्न विचारण्याचा अधिकार व टीका करण्याचा अधिकार सदस्यांना देण्यात आला. ब्रिटिश पार्लमेंटने दुसऱ्या कौन्सिल कायदयानुसार भारतीयाना काही अधिकार बहाल करून खूप करण्याचा प्रयत्न केला मात्र हा कायदा जनता व राष्ट्रीय सभेचे समाधान करू शकला नाही. विधिमंडळाचा विस्तार फार व्यापक नव्हता सदस्य संख्या मर्यादित प्रमाणात वाढविण्यात आली. उदा. १२ वरून १६ केली.

३. **१९०९ चा सुधारणा कायदा-** या कायदानुसार केंद्रीय आणि प्रांतीय विधिमंडळाचा विस्तार करण्यात आला. केंद्रीय विधानपरिषदेचे नाव औपनिवेशक विधान परिषद (Imperial Legislative Council) असे ठेवण्यात आले. केंद्रीय विधिमंडळाची सदस्य संख्या १६ वरून ६९ पर्यंत करण्यात आली. मुंबई, मद्रास, उत्तरप्रदेश विधिमंडळाची २० वरून ५० पर्यंत करण्यात आली आणि इतर प्रांताची सदस्यसंख्या ३० पर्यंत करण्यात आली. विधिमंडळ सदस्यात निर्वाचित, गैरसरकारी आणि सरकारी या तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले. केंद्रीय विधिमंडळात सरकारी सदस्याचे बहुमत कायम ठेवण्यात आले तर प्रांतात गैरसरकारी सदस्याचे बहुमत निर्माण करण्यात आले.

काँग्रेस नेतृत्वाच्या मागणीनुसार निर्वाचन पद्धतीला मान्यता देण्यात आली. निर्वाचित सदस्यांची निवड अप्रत्यक्ष निर्वाचन पद्धतीनुसार केली जाईल. केंद्रीय विधिमंडळात निर्वाचित सदस्यांची निवड प्रांतीय विधिमंडळाच्या गैरसरकारी सदस्याकडून करण्याची तरतूद केली. कायदेमंडळाताल सदस्यांना अंदाजपत्रकासहित सर्व विषयावर चर्चा करण्याचा, प्रश्न विचारण्याचा, उपप्रश्न विचारण्याचा, सूचना व उपसूचना दाखल करण्याचा अधिकार देण्यात आला. मात्र अर्थसंकल्पावर मतदानाचा अधिकार नाकारण्यात आला अर्थात कायदेमंडळाचे निर्णय गव्हर्नरवर बंधनकारक नसल्यामुळे जबाबदार शासन निर्माण होऊ शकले नाही. या कायदयानुसार मुसलमान व शीखांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले आणि हिंदु व मुसलमानांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न या कायदयाने केला.

४. **१९१९ चा सुधारणा कायदा-** या कायदयानुसार ब्रिटिश भारतात उत्तरदायी शासन प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट मान्य करण्यात आले. जबाबदार शासन पद्धती क्रमाक्रमाने प्रस्थापित केली जाईल. तसेच भारतासाठी अस्थायी संविधानची निर्मिती केली मात्र त्यात परिवर्तन करण्याचा अधिकार ब्रिटिश संसदेला असेल. केंद्रात द्विगृही कायदेमंडळाची स्थापना करण्यात आली. कनिष्ठ सभागृहाला विधानसभा (Legislative Assembly) आणि वरिष्ठ सभागृहाला राज्यपरिषद (Council of State) ही नावे देण्यात आली. दोन्ही गृहाचे अधिकार समान असले तरी गव्हर्नरच्या संमतीशिवाय विधेयक मांडता येत नसे. गृहानी मंजूर केलेले विधेयक तो फेटाळू शकत असे. मतदानाचा अधिकार मर्यादित लोकांना देण्यात आला.मतदानासाठी मालमत्ता व शिक्षणाची अट टाकण्यात आली.गव्हर्नर हा कार्यकारिणाचा प्रमुख असेल. कार्यकारिणी सदस्य विधिमंडळाला नव्हे तर गव्हर्नरला जबाबदास असतील. प्रांतिक राज्यकारभार द्विदल शासन पद्धती सुरू करण्यात आली. महत्वाची खाती राखीव ठेऊन त्यांची जबाबदारी इंग्रजाकडे देण्यात आली तर कमी महत्वाच्या सोपीव खात्याची जबाबदारी भारतीयाकडे देण्यात आली. सांप्रदायिक निर्वाचन पद्धतीचा विस्तार करण्यात आला. शीख, अँग्लो-इंडियन, भारतीय ख्रिश्चनाना स्वतंत्र मतदारसंघ बहाल करण्यात आले.

५. **१९३५ चा भारत प्रशासन कायदा** - या कायदयानुसार केंद्रात दुहेरी शासन व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला.संरक्षण व परराष्ट्र सारखे महत्वाचे विषय गव्हर्नरकडे देण्यात आले.कमी महत्वाच्या खात्याची जबाबदारी भारतीयांकडे देण्यात आली.मात्र मंत्रीमडळाचे निर्णय गव्हर्नरवर बंधनकारक नव्हते.गव्हर्नर मंत्रीमंडळाचे निर्णय फेटाळत असल्याने जबाबदार शासन निर्माण होऊ शकले नाही.या कायदयानुसार भारतात संघराज्याची निर्मिती करण्यात आली. प्रांतात स्वयंशासनाची पद्धत सुरू करण्यात आली.मुख्यमंत्री व मंत्रीमंडळकडे सत्ता सोपविण्यात आली.या कायदयानुसार संघराज्य न्यायलयाची स्थापना करण्यात आली.

६. **क्रिप्स योजना-** भारतीयांचा अंसतोष कमी करण्यासाठी पंतप्रधान चर्चिल यांनी क्रिप्स याना भारतात पाठविले.क्रिप्स यानी काँग्रेस, मुस्लिम लीग, हिंदु महासभा आणि संस्थानिकाशी चर्चा करून आपली योजना जाहीर केली.या योजनेनुसार महायुद्ध समाप्तीनंतर भारताला औपचारीक स्वातंत्र्य दिले जाईल.ज्या संस्थानिकांना संघराज्यात राहायचे नसेल त्याना स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला जाईल.केंद्रात राष्ट्रीय सरकार स्थापनेस क्रिप्स मिशने विरोध केल्यामुळे काँग्रेसने ही योजना फेटाळली.पाकिस्तानच्या मागणीचा समावेश नसल्यामुळे मुस्लिमलीगने देखील ही योजना फेटाळली.

७. **कॅबिनेट मिशन योजना-** दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंडमध्ये सत्ता बदल झाला.मजूर पक्षाचे अॅटली पंतप्रधान बनले.त्यानी भारताला लवकरात लवकर स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली.त्यासाठी कॅबिनेट मिशन भारतात पाठविले.या मिशनच्या योजनेनुसार हिंदुस्थानात संघराज्य निर्माण करून हिंदुस्थान अखंड राहणार होता.धार्मिक व जातीय प्रश्न बहुमताच्या आधारावर सोडवले जाणार होते.घटना निर्माण करण्यासाठी घटनापरिषद स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.घटना तयार होईपर्यत नेहरूच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सरकार निर्माण करण्यात आले.मात्र मुस्लिम लीगने पाकिस्तान निर्मितीसाठी घटनेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला.पाकिस्तानची मागणी मान्य व्हावी म्हणून प्रत्यक्ष कृती दिन साजरा केला.परिणामतः देशभर हिंदू-मुस्लिमांचे दंगे सुरू झाले.

८. **फाळणीची योजना-** पाकिस्तानच्या मागणीवरून काँग्रेस व मुस्लिम लीगमध्ये तडजोड होऊ शकली नाही.पाकिस्तान निर्माण केल्याशिवाय ब्रिटिशांनी भारत सोडू नये ही मुस्लिम लीगने मागणी केली म्हणून गव्हर्नर मांऊट बॅटनने फाळणीची योजना जाहीर केली.या योजनेनुसार हिंदुस्थान अखंड राहू शकत नसेल तर पंजाब व बंगाल प्रांताची फाळणी करावी.पूर्व बंगाल, पश्चिम पंजाब आणि सिंध प्रांताचा पाकिस्तानमध्ये समावेश करावा.सरहद्द प्रांत व बलुचिस्तान येथे सार्वमत घेऊन कोणत्या तरी एका देशात त्याचा समावेश करावा.संस्थानिकाना स्वतंत्र राहता येईल किंवा भारत व पाकिस्तान या दोन्हीपैकी एका देशात जाता येईल.दोन्ही देशासाठी स्वतंत्र घटनासमिती निर्माण केल्या जातील.फाळणी मान्य झाल्यानंतर देशाच्या सीमा निश्चित केल्या

जातील.या योजनेला कॉग्रेस व मुस्लिम लीगने मान्यता दिली.ब्रिटिश पार्लमेंटच्या मान्यतेनंतर हिंदुस्थानची फाळणी झाली.

९. **भारत स्वातंत्र कायदा-** या कायदयानुसार भारत आणि पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात येतील.या राष्ट्रसाठी एक गर्व्हनर नेमला जाईल.घटना अंमलात आल्यानंतर त्याला परत बोलविले जाईल.यापुढे ब्रिटिशांचा कोणताही कायदा दोन्ही राष्ट्रांना लागू होणार नाहीत.दोन्ही देशाच्या कायदेमंडळाना राज्यकारभारासाठी कायदे करता येतील.ब्रिटिशाचे संस्थानिकांबरोबरचे सर्व तह करार रद्द होतील.तसेच भारत सचिव पदाची समाप्ती करून प्रशासन दोन्ही देशांच्या सरकाराकडे देण्यात येईल.

इंग्रजांनी केलेल्या वरील कायदयामुळे भारतातील संसदीय लोकशाहीच्या विकासास वा पायाभरणीस मदत झालेली असल्याने या कायदयांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**टिप- घटना समिती वा घटना निर्मिती प्रक्रिया-**

कॅबिनेट मिशन योजनेनुसार जुलै १९४६ मध्ये घटना समितीच्या अप्रत्यक्ष पद्धतीने निवडणुका घेण्यात आल्या.प्रांताच्या कायदेमंडळामार्फत घटना समितीचे सदस्य निवडण्यात आले.मूळ योजनेनुसार घटना समिती ३८९ सदस्य होते.त्यात २९६ सदस्य ब्रिटिश प्रांतातून आणि ९३ सदस्य संस्थानिकाकडून निवडावयाचे होते.घटना समिती निवडणुकीत कॉग्रेसला २११ आणि मुस्लिम लीगला ७३ जागा मिळाल्या. घटनासमितीत कॉग्रेसला बहुमत मिळालेले असले तरी अनेक नामवंत व्यक्ती समितीवर निवडून आल्या.त्यात बाबासाहेब आंबेडकर, डॉ.राजेद्र प्रसाद, सरदार पटेल, बेगम रसूल, विजया लक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू, श्यामाप्रसाद मुखर्जी, बॅ.जयकर इ.समावेश होता.मुस्लिम लीगने पाकिस्तानच्या मागणी वरून घटनेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला.९ डिसेंबर १९४६ ला घटनासमितीचे पहिले अधिवेशन झाले.या अधिवेशनात डॉ.राजेद्र प्रसाद यांची घटनासमितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली.पंडित नेहरूनी भारतचे सार्वभौम, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण करण्याबाबतचा ठराव मांडला.या ठरावावर दुसऱ्या अधिवेशनात चर्चा होऊन ठराव मंजूर झाला.मुस्लिम लीगने बहिष्कार टाकल्यामुळे घटनेच्या कामाला गती येऊ शकली नाही.मात्र फाळणीनंतर घटनेच्या कामकाजाला गती आली.घटनेच्या तिसऱ्या अधिवेशनात विविध समितीची निर्मिती करण्यात आली.त्यात २९ ऑगस्ट १९४७ ला मसुदा समिती निर्माण करण्यात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकराना मसुदा समितीचे अध्यक्ष करण्यात आले.समितीत सात सदस्य होते त्यात के.एम.मुन्शी, डी.पी.खेतान, गोपाल स्वामी अय्यंगार, एन.माधवराव, सय्यद सादुल्ला, टी.टी.कृष्णमचारी इ.चा समावेश होता.बी.आर.राव घटनेचे कायदेविषयक सल्लागार होते.मसुदा समितीने विविध देशातील घटनाचा अभ्यास करून घटनेचा कच्चा आराखडा प्रसिद्ध केला.या आराखडयावर जवळ जवळ ७६२५ सूचना भारतीयांनी केल्या.त्यापैकी २४७३ सूचनावर समितीत विचार करण्यात आला.२६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी समितीने घटना स्विकृत व मान्य केली.२६जानेवारी १९५० पासून घटनेची अंमलबजावणी सुरू झाली.घटना तयार करण्यासाठी २ वर्षे ११ महिने १८ दिवस इतका कालखंड लागला. घटनेच्या आराखडयावर ११४ दिवस विस्तृत चर्चा झाली. घटना एकमताने स्वीकारलेली असली तरी बॅ.जयकरच्या मते भारतीय घटना सार्वभौम नाही.कारण घटना समितीच्या सदस्याची निवड प्रत्यक्ष जनतेकडून झालेली नव्हती. निवडणुका घेतल्या असत्या तर प्रचंड वेळ व पैसा खर्च झाला असता त्यामुळे घटना निर्मितीला विलंब लागला असता.म्हणून घटनेच्या अप्रत्यक्ष निवडणुका घेण्यात आल्या.तसेच भारतीय जनतेने किंवा कोणत्याही राजकिय पक्षाने घटना मान्य नाही असे म्हटलेले नाही याचा अर्थ घटना भारतीयांना मान्य आहे.

**प्र.२ रा.भारतीय राज्यघटनेतील सरनामा किंवा उद्देशपत्रिकेचे विश्लेषण करून त्यातील तत्वज्ञान वा मूल्ये सांगा?**

प्रत्येक देशाची राज्यघटना विशिष्ट उद्देश लक्षात घेऊन लिहिली जाते.त्या उद्देशाचा समावेश उद्देशपत्रिकेत केलेला असतो.सरनामा घटनेचा आत्मा मानला जातो.भारतीय घटनेचा सरनामा पंडित नेहरूनी लिहिलेला आहे.

**घटनेचा सरनामा वा उद्देशपत्रिका-**आम्ही भारतीय लोक, भारताचे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण करण्याचे आणि भारताच्या सर्व नागरिकांना,

न्याय-आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय

स्वातंत्र्य-विचार, उच्चार, धर्म, श्रद्धा आणि उपासना

समता-समान संधी आणि दर्जाबाबत

बंधुता-व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकात्मता व अंखडता राखण्याची शाश्वती देऊन,

२६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी घटना मान्य व स्वीकृत करत आहोत.

**सरनाम्याचे विश्लेषण, तत्वज्ञान वा मूल्ये किंवा आधारभूत तत्वे-**

१. **घटनेचे उगमस्थान भारताय जनता**-उद्देशपत्रिकेत आम्ही भारतीय जनता घटना तयार करून मान्य करीत आहोत असा उल्लेख आहे याचा अर्थ घटना भारतीय जनतेने तयार करून स्वईच्छेने स्वीकारलेली आहे, असा अर्थ निघतो.वास्तविक

घटनासमिती प्रत्यक्ष जनतेद्वारा निवडली नव्हती.सदस्य अप्रत्यक्ष मार्गाने निवडले होते.परंतु घटना समितीच्या निवडणुका घेतल्या असत्या तर वेळ व पैशांची हानी झाली असती तसेच भारतातील कोणत्याही राजकिय पक्षाने वा जनतेने घटना रद्द करावी ही मागणी केलेली नाही याचा अर्थ सर्व भारतीयांना घटना मान्य आहे.

२. **सार्वभौम-** १५ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.१५ऑगस्ट १९४७ ते २६ जानेवारी १९५० पर्यंत भारताचे स्वरूप वसाहतीच्या राज्याचे होते. कारण तोपर्यंत इंग्लंडची राणी भारताची कायदेशीर प्रमुख होती.२६ जानेवारी घटना लागू झाल्यानंतर भारत सार्वभौम देश बनला.कारण भारतावर कोणत्याही देशाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियत्रण नाही. अंर्तगत व बर्हिगत दृष्टया भारत पूर्ण स्वतंत्र आहे.भारत राष्ट्रकुल संघटनेचा सदस्य असला तरी ते सदस्यत्व सार्वभौमच्या आड येत नाही.मित्रत्वाचे संबंध टिकवून ठेवण्यासाठी भारत राष्ट्रकुल संघटनेचा सदस्य झाला आहे.

३. **प्रजासत्ताक-** प्रजासत्ताक म्हणजे शासन व्यवस्थेत जनतेचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग होय.भारताचा राज्यकारभार जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत चालतो.प्रतिनिधी ठराविक काळासाठी निवडून दिलेले असतात.जनता आपली इच्छा प्रतिनिधीमार्फत व्यक्त करतात.प्रौढमताधिकाराच्या तत्वानुसार प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिलेला असतो.

४. **गणराज्य-** गणराज्य म्हणजे राजा नसलेले राज्य होय किंवा ज्या देशाचा सर्वोच्च प्रमुख जनतेने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मार्गाने विशिष्टकाळासाठी निवडून दिलेला असतो.त्या देशाला गणराज्य असे म्हणतात.उदा-भारताचा सर्वोच्च प्रमुख राष्ट्रपती जनतेकडून अप्रत्यक्षरित्या पाच वर्षासाठी निवडून दिलेला असतो.म्हणून भारत गणराज्य आहे.या उलट इंग्लंडमध्ये गणराज्य नाही.कारण इंग्लंडचा राजा वंशपरापरागत पद्धतीने सत्तेवर येतो.

५. **स्वातंत्र्य** -भारतातील नागरिकांच्या व्यक्तिमत्त्वविकासासाठी विचार, उच्चार, श्रध्दा,धर्म व उपासना इ.बाबतचा स्वातंत्र्याचा उल्लेख सरनाम्यात केलेला आहे.स्वातंत्र व्यक्तीविकासासाठी आवश्यक असल्याने या स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यायोग्य परिस्थिती भारत सरकारने निर्माण करावी ही घटनाकारांची अपेक्षा होती.

६. **समता-** समता म्हणजे सारखेपणा नव्हे तर मानवनिर्मित विषमता नष्ट करून सर्वांना विकासाची समान संधी आणि दर्जा उपलब्ध करून देणे होय.धर्म, जात, वंश, लिंग व वर्ण इ.आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान संधी व दर्जा उपलब्ध करून देणे हा घटनाकाराचा मुख्य उद्देश होता.

७. **न्याय-** घटनेच्या सरनाम्यात सामाजिक, आर्थिक व राजकिय क्षेत्रात न्याय उपलब्ध करून देणे शासनाचे उद्दिष्ट राहिल.न्याय हा राजकिय व्यवस्थेचा आत्मा असतो.समाजात न्याय प्रस्थापित केल्याशिवाय व्यक्तीची उन्नती होणार नाही.घटनेने सामाजिक न्याय प्रस्तापित करण्यावर भर दिला आहे. अस्पृश्यता निवारण, मागास जातींना सवलती इ.गोष्टी सामाजिक व आर्थिक न्यायासाठी आहेत.राजकिय न्यायासाठी सर्वांना प्रौढमताधिकाराचा अधिकार दिलेला आहे.

८. **बंधुता-** भारतात पूर्वीपासून जातीवाद, प्रांतवाद इ.समस्या आहेत.या समस्यामुळे राष्ट्रांच्या ऐक्य निर्मितीला बाधा येतो.व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मता कायम ठेवण्यासाठी वरील भेदाभेद नष्ट करून बंधुभाव निर्माण करणे आवश्यक आहे.म्हणून घटनाकारानी स्त्री व पुरूषांना समान अधिकार देऊन समतेच्या आधारावर बंधुत्वाची उभारणी करण्याचा प्रयत्न केला.

९. **समाजवाद-** या शब्दाचा समावेश ४२ व्या घटनादुरूस्तीने सरनाम्यात केला.समाजवादाला खाजगी मालमत्ता व भांडवलशाही मान्य नाही.देशातील श्रमिकाचे शोषण थांबविण्यासाठी श्रीमंत व गरिबातील दरी कमी करण्यासाठी भारताने समाजवादाचा स्वीकार केलेला आहे.समाजवाद म्हणजे उत्पादन साधनावर आणि वितरण व्यवस्थेवर समाज वा राज्याची मालकी वा नियंत्रण होय.

१०. **धर्मनिरपेक्षता-** सरनाम्यात हा शब्द ४२ व्या घटनादुरूस्तीने समाविष्ट करण्यात आला.धर्मनिरपेक्ष म्हणजे राज्याचा अधिकृत असा कोणताही धर्म राहणार नाही.कोणत्याही विशिष्ट धर्माला राज्य पाठिंबा देणार नाही.सर्व धर्मांना समान मानले जाईल.धर्म ही वैयक्तिक बाब असून प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणे कोणत्याही धर्माची पूजा अर्चा करता येईल.धर्म बदलता येईल.याचा अर्थ कोणत्याही धर्माला भारताने राजाश्रय दिलेला नाही.

११. **राष्ट्रीय एकात्मता व अखंडता**-या शब्दाचा समावेश ४२ व्या घटनादुरूस्तीने केलेला आहे.लोकशाहीत प्रत्येकाला प्रतिष्ठा दिली जाते.त्यामुळे व्यक्तीत स्वाभिमानाची भावना तयार होते ही भावना राष्ट्रीय एकात्मतेसाठी उपयुक्त मानली जाते.व्यक्तीचे देशावर प्रेम असल्यास व्यक्ती कोणताही त्याग करायला तयार असते.देशाच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय एकात्मतेचा सरनाम्यात करण्यात आला.त्यासाठी कोणत्याही घटकराज्याला संघराज्यातून बाहेर पडता येत नाही.त्यासाठी केंद्राला जास्त अधिकार दिले आहेत.

**प्र.३ रा. भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये सांगा?**

प्रत्येक देशाची राज्यघटना देशाच्या राजकीय जीवनाची आधारशिला मानली जाते. जनतेच्या इच्छा आकांक्षाचे प्रतिनिधित्व ज्या नियमात दिसते.त्या नियम व कायदेसंग्रहाला राज्यघटना असे म्हणतात. घटनाकारांनी घटना तयार करताना अनेक

देशाच्या घटनांचा अभ्यास करून घटना तयार केली.भारतीय घटनेवर अनेक देशाच्या घटनांचा प्रभाव दिसतो.संसदिय पद्धत इंग्लडकडून तर संघराज्यपद्धत अमेरिकेकडून, फ्रॅान्स व अमेरिकेकडून मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्व आर्यलँडकडून तर दक्षिण आफ्रिकेच्या घटनेतून घटनादुरूस्ती पद्धत आणि मूलभूत कर्तव्य रशियाच्या घटनेतून घेतलेले दिसतात.भारतीय घटनेची वैशिष्टयै पुढील प्रमाणे

१. **सर्वात मोठी व लिखित राज्यघटना-** भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी राज्यघटना मानली जाते.भारताने संघराज्य शासन पद्धतीचा अवलंब केलेला असल्यामुळे लिखित राज्यघटना आवश्यक असते.मूळ घटनेनुसार ३९५ कलमे, ८ परिशिष्ट आणि २२ विभाग घटनेत समाविष्ट होते.४२ व्या आणि इतर दुरूस्तीनी घटनेत काही नवीन कलमांचा समावेश केला.सद्या घटनेत ४०५ कलमे २४ विभाग आणि १० परिशिष्ट आहेत.घटना इतकी प्रदीर्घ असण्याचे कारण म्हणजे राजकीय अनुभवहीनता होय.तसेच केंद्र-राज्य संबंध, मूलभूत हक्क इ.तरतूदी घटनेत सविस्तर दिल्यामुळे घटनेचा आकार वाढला.

२. **संसदीय शासन पध्दती** - स्वातंत्र्पूर्व काळात इंग्रजानी भारतात संसदीय लोकशाही रूजविण्याचा प्रयत्न केला तसेच भारतातील बऱ्याच नेत्याचे शिक्षण इंग्लंड झालेले असल्यामुळे त्यांना संसदीय लोकशाहीचा अनुभव होता.म्हणून स्वातंत्र्यानंतर आपण संसदीय लोकशाही स्वीकारली.या लोकशाहीत कायदेमंडळातून कार्यकारीमंडळ निर्माण होते.कार्यकारीमंडळ कायदेमंडळाला जबाबदार असते. जोपर्यत कायदेमंडळाचा विश्वास आहे तोपर्यत कार्यकारीमंडळाला सत्तेवर राहता येते.संसदीय लोकशाहीत नामधारी व वास्तव हे दोन प्रमुख असतात.आपण इंग्लंडकडून संसदीय लोकशाही घेतली असली तरी त्यात काही बदल केलेले आहेत.उदा.राष्ट्रपतीचे आणीबाणीचे अधिकार हा अधिकार इंग्लंडच्या राजाला नाही.

३. **संघराज्य शासन पद्धती -** भारतीय राज्यघटनेने संघराज्य शासन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.संघराज्यात केंद्र व घटकराज्यात वेगवेगळी सरकारे असतात.संघराज्यात अधिकार विभागणीसाठी तीन विषय सूची दिलेल्या आहेत.केंद्रसुचीत ९७ विषय, राज्यसुचीत ६६ विषय आणि समवर्तीसुचीत ४७ विषयाचा समावेश आहे.या अधिकार विभागणीचा विचार करता भारतीय संघराज्यात केंद्रसरकारला जास्त अधिकार दिलेले दिसतात.त्यामुळे भारतीय संघराज्य केंद्रप्रधान दिसून येते.केंद्र आणि राज्यात निर्माण झालेल्या संघर्षाचे निराकरण करण्यासाठी घटनेने सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार दिला आहे.

४. **प्रौढमताधिकार-** भारतीय घटनेने संपत्ती व मालमत्तेची अट न टाकता वयाची २१ वर्ष पूर्ण झालेल्या सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार दिला.त्या अधिकाराला प्रौढमताधिकार म्हणतात.६१ वी घटनादुरूस्ती करून मतदानासाठी वयाची अट २१ वर्षावरून १८ वर्ष इतकी करण्यात आली.

५. **राष्ट्रपतीचे आणीबाणीचे अधिकार-**शांततेच्या काळात संघराज्य आणि संकटाच्या काळात एकात्म राज्य हे भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूप आहे.संकटाला तोंड देण्यासाठी घटनेने राष्ट्रपतीला तीन प्रकारची आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार दिलेला आहे.राष्ट्रीय आणीबाणी ३५२ कलम, ३५६ कलम राज्य आणीबाणी व ३६० कलम आर्थिक आणीबाणी तसेच आणीबाणीची घोषणा केल्यानंतर एका महिन्याच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते अन्यथा आणीबाणी स्थगित वा रद्द होते.आणीबाणीच्या काळात मूलभूत अधिकार स्थगित होतात. घटकराज्याचे अधिकार कमी होतात. त्यांना केंद्राच्या आदेशाप्रमाणे काम करावे लागते.

६. **एकेरी नागरिकत्व आणी एकच राज्यघटना-** भारतात संघराज्य असूनही दुहेरी नागरिकत्वाची पद्धत नाही. घटकराज्यांना नागरिकत्व देण्याचा अधिकार नाही.नागरिकत्व फक्त केंद्र सरकार देऊ शकते.घटनेच्या पाच ते अकरा कलमामध्ये नागरिकत्वाबाबतच्या तरतूदी दिलेल्या आहेत.तसेच भारतात एकच राज्यघटना दिसून येते. घटकराज्यांना स्वतंत्र घटना निर्माण करता येत नाही.राज्यकारभार विषयक सर्व बाबींचा घटनेत समावेश असल्याने आणिराज्यांना संघराज्यातून फुटून बाहेर निघण्याचा अधिकार नसल्यामुळे एकच राज्यघटना दिसून येते फक्त जम्मू काश्मिर राज्यासाठी स्वतंत्र घटना आहे.

७. **स्वतंत्र व एकेरी न्यायव्यवस्था** - भारतात संघराज्य असूनही अमेरिकेसारखी दुहेरी न्यायव्यवस्था नाही.भारतात एकेरी न्यायव्यवस्था आहे.न्यायालयाची रचना पिरॅमिड सारखी आहे.सर्वात वरच्या पातळीवर सर्वोच्च न्यायालय त्यानंतर उच्च न्यायालय आणि सर्वात शेवटी दुय्यम न्यायालये दिसून येतात.सर्वोच्च न्यायालय सर्वश्रेष्ठ व अंतिम न्यायालय मानले जाते.त्याचा निकाल सर्व न्यायालयावर बंधनकारक मानला जातो.न्यायमंडळाच्या स्वातंत्र रक्षणासाठी न्यायाधीशाची नेमणूक राष्ट्रपतीकडून केली जाते.त्यांना वेतन व नोकरीची शाश्वती दिली जाते.

८. **मूलभूत हक्क** - भारतीय घटनेच्या तिसऱ्या भागात १२ ते ३५ कलमात मूलभूत अधिकाराचा समावेश आहे.मूळ घटनेत सात अधिकाराचा समावेश होता.४४ व्या घटना दुरूस्तीने मालमत्तेचा अधिकार मूलभूत हक्काच्या यादीतून वगळलेला आहे.सद्या घटनेत समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, धार्मिक स्वातंत्र इ.सहा प्रकारच्या हक्काचा घटनेत समावेश

आहे.मूलभूत हक्काना न्यायलयाचे संरक्षण आहे.हक्कावर कोणीही अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यास न्यायालयात दाद मागता येते.

९. **मार्गदर्शक तत्वे-** घटनेच्या चौथ्या भागात ३६ ते ५१ कलमामध्ये मार्गदर्शक तत्वे दिसून येतात.या तत्त्वांना न्यायलयाचे संरक्षण नसल्यामुळे त्यांचे पालन करणे सरकारवर बंधनकारक नाही.मार्गदर्शक तत्वे नैतिक हक्क आहेत त्यांना कायदयाचे संरक्षण नसले तरी ही तत्वे जनतेच्या कल्यासाठी आवश्यक असल्यामुळे कोणतेही सरकार या तत्वांकडे दुर्लक्ष करू शकत नाही कारण सरकारच्या यशाचे मूल्यमापन या तत्त्वांच्या आधारावर केले जाते.

१०. **अंशतः परिदृढ आणि अंशतः परिवर्तनीय -** इंग्लंडची राज्यघटना सर्वात परिवर्तनीय मानली जाते तर अमेरिकेची घटना सर्वात परिदृढ मानली जाते.भारतीय घटनाकारानी वरील दोन्ही पद्धतीचा त्याग करून घटनकारांनी घटना अशतः परिवर्तनीय आणी अशतः परिदृढ स्वरूपाची बनवली आहे.घटनेत घटनादुरूस्तीच्या तीन पद्धती दिलेल्या आहेत. घटनेतील कमी महत्वपूर्ण भाग साध्या बहुमताने बदलता येतो.याउलट घटनेतील महत्वपूर्ण भागात बदल घडवून आणण्यासाठी विशेष बहुमत व निम्मे राज्याची मान्यता आवश्यक आहे.या दोन्ही मार्गाचा अवलंब घटनाकारानी केलेला आहे.

**प्र.४ था. भारतीय संघराज्याचे स्वरूप, वैशिष्टये किंवा लक्षणे सांगा?**

"India that is Bharat shall be union of state" 'भारत हा राज्याचा संघअसेल' या कलमाने भारतीय राज्यघटनेची सुरूवात होती. भारतीय राज्यघटनेने संघराज्य शासन पद्धतीचा स्वीकार केलेला असला तरी 'संघराज्य' वा 'Federation' शब्दाचा कुठेही उल्लेख नाही. भारताने संघराज्य शासन पद्धतीचा स्वीकार केलेला असताना देखील Federation शब्दाऐवजी Union हा शब्दप्रयोग केलेला आहे. या शब्दाच्या वापराबाबत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, "संघराज्य शब्दापेक्षा Union हा शब्द जास्त एकतावादी आहे. तसेच घटकराज्यांनी करार करून संघराज्य निर्माण केलेले नाही. त्यामुळे Union शब्दाचा वापर घटनेत वापर केलेला आहे." डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेला आशय लक्षात घेतला तर एक गोष्ट लक्षात येते की, भारतीय संघराज्य जगातील इतर देशाच्या संघराज्यापेक्षा भिन्न स्वरूपाचे आहे. अमेरिका व इतर देशातील संघराज्याची लक्षणे व स्वरूपाच्या आधारावर भारतीय संघराज्याची तुलना करून अभ्यासक भारत संघराज्यात्मक शासन पद्धती असलेला देश आहे की नाही याबाबत शंका प्रदर्शित करतात. जागतिक संघराज्याच्या प्रयोगापेक्षा अत्यंत भिन्न व नाविण्यपूर्ण पद्धतीचे संघराज्य भारतात अस्तित्वात आहे तसेच राज्यशास्त्राच्या संघराज्य संकल्पना वा चौकटीत विशद केलेल्या वैशिष्टयाहून वेगळी वैशिष्टये धारण केलेले संघराज्य अभ्यासकांना दिसते आणि हा गुंता सोडविण्यासाठी अभ्यासक अर्ध संघराज्य, सहकारी संघराज्य, एकात्मककडे झुकलेले संघराज्य, केंद्रप्रधान संघराज्य इत्यादी विविध संज्ञाचा वापर भारतीय संघराज्याबाबत करतात. भारतीय संघराज्याच्या वेगळेपणाचा अभ्यास करावयाचा असेल तर संघराज्याच्या निर्मितीच्या पार्श्वभूमीचे अध्ययन करणे गरजेचे आहे. भारतात संघराज्याची निर्मिती ब्रिटिशकालीन १९३५ च्या प्रशासन कायदयातून झालेली आहे. या कायदयाने प्रशासकीय सोयीसाठी संघराज्याची निर्मिती केलेली आहे. घटकराज्याना व्यापक स्वरूपाचे अधिकार देऊन केंद्रीय सत्तेचे विकेंद्रीकरण करावे या उद्देशाने संघराज्य निर्माण झालेले नाही. भारतात घटकराज्यांनी एकत्र येऊन संघराज्याची निर्मिती केलेली नाही. केंद्रसरकारने प्रशासकीय सोयी लक्षात घेऊन संघराज्याची निर्मिती केलेली आहे म्हणून आपल्याकडे जास्त अधिकार देऊन मर्यादित स्वरूपाचे अधिकार राज्याकडे सोपविलेले असल्यामुळे जागतिक संघ वा संघराज्य सिद्धांत विशद केलेल्या संघराज्यापेक्षा नाविन्यपूर्ण स्वरूपाचे संघराज्य भारतात आढळते. कॅबिनेट मिशनच्या योजनेनुसार तयार होणाऱ्या घटनेत घटकराज्याना व्यापक अधिकार मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती परंतु पाकिस्तानच्या मागणीवरून मुस्लिमलीगने घटनेवर टाकलेला बहिष्कार आणि नंतरच्या काळात भारताची झालेली फाळणी यामुळे घटकराज्याच्या स्वायत्ततेची मागणी मागे पडून भविष्यातील फुटीरवृत्ती टाळण्यासाठी केंद्रसरकार जास्तीत जास्त बलवान कसे करता येईल या उद्देशाने संघराज्याची उभारणी करण्यात आली. जगातील कोणत्या ही देशाच्या संघराज्यापेक्षा अधिक स्वरूपाचे केंद्रीकरण भारतीय संघराज्यात केलेले आढळते. भारतीय संघराज्यात घटकराज्याचे अधिकार या संकल्पनेला फारसे प्राधान्य दिलेले नाही. संघराज्यात घटकराज्यांना स्वतंत्र राज्यघटना, दुहेरी नागरिकत्व, स्वतंत्र ध्वज, दुहेरी न्यायव्यवस्था यापैकी कोणती ही तरतूद घटनेत केलेली नाही. घटकराज्याचा घटनात्मक प्रमुख राज्यपाल देखील केंद्राचा प्रतिनिधी म्हणून राज्यात नेमला जातो. अधिकार विभागणीच्या सूचीमध्ये केंद्राच्या पदरात झुकते माप दिलेले आढळते. वरील ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास केल्यास संघराज्याच्या वेगळया स्वरूपाविषयीचा गुंता सुटता केंद्रप्रधान संघराज्यपद्धतीचे योग्य पद्धतीने आकलन होते.

**संघराज्य अर्थ व परिभाषा-** जगात सर्वप्रथम १७८९ मध्ये अमेरिकेतील १३ वसाहतींनी एकत्र येऊन संघराज्याची निर्मिती केली त्यानंतर सोव्हिएट रशिया, कॅनडा, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशानी संघराज्य शासन पद्धतीचा अवलंब सुरू

केला. १९३५ च्या भारत प्रशासन कायदयानुसार भारतात संघराज्य शासन पद्धतीची सुरूवात झाली. ब्रिटिश राजवटीने प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने संघराज्याची निर्मिती केली. घटनाकारावर ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या संघराज्य पद्धतीचा प्रभाव असल्याने साहजिकच केंद्र सरकारच्या अधिकाराला प्राधान्य मिळाले. संघराज्य हा शब्द 'Federation' या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. हा शब्द 'Foedus' मूळ लॅटिन शब्दापासून बनलेला आहे. 'Foedus' शब्दाचा अर्थ तह वा करार असा होतो. केंद्र आणि घटकराज्य किंवा अनेक घटकराज्य एकत्र येऊन तह वा करार करून केंद्र व राज्याचे अस्तित्व असलेले संघराज्य निर्माण करतात हा Foedus शब्दाचा गर्भित अर्थ सांगता येतो. संघराज्य म्हणजे नेमके काय हे अधिक स्पष्ट करण्यासाठी विचारवंतांनी केलेल्या संघराज्याच्या काही व्याख्या अभ्यासणे गरजेचे आहे. उदाहरणासाठी संघराज्याच्या काही ठळक व्याख्या पुढील दिलेल्या आहेत.

१. **प्रा. डायसी-** यांच्या मते, राष्ट्रीय एकता व राष्ट्रीय सत्ता यांचा घटक राज्याच्या हक्कांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न संघराज्य शासन पद्धतीत केला जातो.
२. **डॉ. फायनर-** यांच्या मते, संघराज्यात्मक शासन पद्धतीत सत्ता व सामर्थ्यांचा एक भाग प्रादेशिक क्षेत्राकडे राखून ठेवला जातो व दुसरा भाग प्रादेशिक क्षेत्रांनी हेतु पुरस्कर निर्माण केलेल्या केंद्रीय सत्तेकडे राखला जातो.
३. **मॉन्टेस्क्यू-** यांच्या मते, संघराज्य म्हणजे अशी पद्धती की, जी अनेक छोटी छोटी एक मोठे राज्य निर्माण करण्याचा निर्णय घेवून त्या मोठया राज्याचे सभासद होण्याचे मान्य करतात.
४. **के. सी. व्हीअर-** यांच्या मते, संघराज्य शासन पद्धती संपूर्ण देशाची शासन यंत्रणा आणि प्रादेशिक शासन यंत्रणा यांच्यात अधिकार विभाजन केले जाऊन प्रत्येक शासन यंत्रणा आपापाल्या कार्यक्षेत्रात विधी नियमाद्वारे स्वतंत्र राज्य कारभार करतात.

वरील व्याख्या विचार करता असे लक्षात येते की, संघराज्य शासन पद्धतीत केंद्र व घटक राज्य सरकार अशी दोन सरकारे देशात अस्तित्वात असतात. केंद्र सरकारचे अस्तित्व संपूर्ण देशाकरिता असते तर घटक राज्य सरकारचे अस्तित्व विशिष्ट प्रदेश वा प्रांतापुरते मर्यादित असते. केंद्र व घटकराज्य सरकार यांच्यात घटनेद्वारे अधिकार विभागणी केलेली असते. अधिकारविभागणीनुसार केंद्र व राज्य आपआपल्या कार्यक्षेत्रात स्वायत्तत व स्वतंत्र पद्धतीने कार्य करीत असतात.

**टिप-संघराज्याची आवश्यकता वा गरज-** भारतासारख्या देशाने संघराज्य शासन पद्धतीचा का अवलंब केला आहे याची अनेक कारणे अभ्यासकांनी नमूद केलेली आहेत. त्या कारणापैकी काही ठळक कारणे पुढील प्रमाणे होत.

१. **विस्तृत भूप्रदेश-** देशाचा भूप्रदेश अत्यंत विस्तृत व व्यापक स्वरूपाचा असतो तेव्हा एका ठिकाणाहून राज्यकारभार चालविणे अत्यंत कठीण व गुंतागुंतीचे काम बनते. अशा वेळेस प्रशासकीय सोयीसाठी संघराज्याची निर्मिती केली जाते. भारतसारख्या जगातील सातव्या क्रमांकाचा भूप्रदेश असलेल्या आणि दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या असलेल्या देशाचे प्रशासन राजधानीच्या ठिकाणाहून चालविणे अशक्य आहे याची कल्पना ब्रिटिश शासनाला आल्यामुळे संघराज्य शासन पद्धतीचा स्वीकार केला.
२. **विविधता-** सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पातळीवर मोठया प्रमाणावर विविधता असलेल्या देशात संघराज्य शासन पद्धती निर्माण करणे अपरिहार्य बनते. भारतात मोठया प्रमाणवर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक विविधतेचे अस्तित्व आहे. या विविधता असलेल्या नागरिकांची विविधता जपण्यासाठी संघराज्य निर्माण केल्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. धर्म, भाषा, वंश, वेशभुषा, आहार, सण, समारंभ, रूढी व परंपरेतील विविधता जतन करून विविधतेत एकता निर्माण करण्यासाठी भारत सरकारने संघराज्याची निर्मिती केली आहे.
३. **सांस्कृतिक एकता-** भारतात धर्म, भाषा, पंथ, आणि इतर गोष्टीबाबत मोठया प्रमाणावर विविधता आढळून येत असली तरी सर्वांच्या संस्कृतीत भिन्नता मात्र आढळून येत नाही. प्राचीन काळापासून भारतात सांस्कृतिक एकतेचे अस्तित्व आढळून येते. वेद, गीता, रामायण, महाभारत, उपनिषदे इत्यादीविषयी समस्त भारतीयामध्ये आदर व पावित्र्याची भावना आढळून येते. भारतातील विविध प्रांतात विविध भाषेचे अस्तित्व दिसून येत असले तरी सर्व भाषाचा उगम संस्कृत भाषेतून झालेला आढळतो. भारतात विविध धर्माचे लोक आहेत परंतु बहुसंख्य धर्माची निर्मिती हिंदू धर्मापासून झालेली आहे. हिंदू धर्मापासून उत्पत्ती न झालेल्या मुस्लिम, ख्रिश्चन, ज्यू, पारशी धर्मातील लोक देखील पूर्वाश्रमीचे हिंदू होते त्यांनी धर्मांतर करून हे धर्म स्वीकारलेले आहेत याचा अर्थ त्यांचे धर्म वेगळा असला तरी सांस्कृतिक मूळे एकच असल्यामुळे विविधतेत एकता निर्माण करणे भारतात सहज शक्य होते या सूत्राचा आधार घेऊन भारतात संघराज्याची निर्मिती करण्यात आलेली आहे.
४. **समान राजकीय महत्त्वाकांक्षा-** लहान लहान राज्ये आपले संरक्षण व आर्थिक विकासाचा प्रश्न एकटयाच्या जोरावर सोडवू शकत नाही. म्हणून लहान लहान राज्ये एकत्र येऊन संघराज्याची निर्मिती करत असतात. एकत्र राहून सर्वांचे संरक्षण चांगल्या पद्धतीने करू शकतो. आर्थिक प्रगती करण्यासाठी सर्वांकडे उपलब्ध संसाधनाचा चांगल्या पद्धतीने

उपयोग करून घेण्यासाठी संघराज्याची आवश्यकता असते. ब्रिटिशकालीन भारतात मोठया प्रमाणावर विविधता आणि संस्थानिकांचे अस्तित्व असताना समान राजकीय महत्त्वकांक्षेमुळे सर्व भारतीयांनी एकत्र येऊन ब्रिटिश राजवटीच्या विरोध करून स्वातंत्र्य मिळविले आणि सर्वांच्या विकासासाठी एकत्र येऊन संघराज्याची निर्मिती केली.

५. **ब्रिटिश राजवटीचा परिणाम-** भारतावर ब्रिटिशाचे दीडशे वर्ष राज्य होते. ब्रिटिश राजवटीच्या काळात झालेल्या विविध कायदयाच्या माध्यमातून संघराज्य पद्धतीला पोषक वातावरण भारतात निर्माण होत गेले. इ.स. १८६१ च्या कौन्सिल कायदयाने प्रांतिक समित्यांना कायदे करण्याचा अधिकार बहाल केला. १९१९ च्या कायदयाने प्रांताना स्वायत्तता देण्यात आली तर १९३५ च्या भारत प्रशासन कायदानुसार सर्व प्रांतात जबाबदार शासन पद्धतीचा अवलंब करून संघराज्याची निर्मिती करण्यात आली. ब्रिटिश राजवटीने स्थापन केलेल्या संघराज्य शासन पद्धतीला भारतीय घटनाकारांनी घटनेत स्थान देऊन कायमस्वरूपी केले.

अशा पद्धतीने विविध कारणाच्या प्रभावामुळे भारतात संघराज्याची निर्मिती करण्यात आली.

**टिप-संघराज्याचे स्वरूप-** भारतीय संघराज्य इतर देशातील संघराज्यापेक्षा वेगळे आहे. संघराज्य निर्मितीच्या साधारणतः दोन पद्धती आढळून येतात.

**अ) केंद्राकर्षी पद्धत-** घटकराज्यांनी करार करून संघराज्य निर्माण केल्यास त्या पद्धतीला केंद्राकर्षी पद्धत असे म्हणतात. उदा. अमेरिकेतील १३ वसाहतींनी करार करून अमेरिकन संघराज्याची निर्मिती केली आहे.

**ब) केंद्रात्सारी वा विकेंद्रीकरण पद्धत-** या पद्धतीत मध्यवर्ती सरकार प्रशासनाच्या सोयीसाठी संघराज्य निर्माण करते. उदा. १९३५ च्या कायदयान्वये केंद्रसरकारने प्रशासनाच्या सोईसाठी भारतात संघराज्य निर्माण केले.

भारतीय संघराज्य संघराज्याच्या मूळ सिद्धांताशी विसंगत आहे. संघराज्याच्या सिद्धांतानुसार अधिकारविभागणी करताना केंद्र व घटकराज्य सरकारांना समान दर्जा दिला जातो. परंतु भारतीय संघराज्यात मध्यवर्ती सरकार अत्यंत शक्तिशाली व प्रबळ बनविलेले आहेत आणि राज्यांना अत्यंत मर्यादित स्वरूपाचे अधिकार दिलेले आहेत. केंद्राला दिलेल्या अवाजवी महत्त्व व अधिकारामुळे अनेक अभ्यासक भारतीय संघराज्याला अर्ध संघराज्य (Quasi federal), एकात्म राज्य, आभासी संघराज्य, केंद्रप्रधान संघराज्य आणि एकात्मतेकडे झुकणारे संघराज्य अशा विविध नावानी संबोधतात. भारतीय संघराज्य ज्या ऐतिहासिक वातावरणात निर्माण झाले त्यात केंद्रीकरणाला प्राधान्य मिळणे साहजिकच आहे. संघराज्याची निर्मिती विकेंद्रीकरण प्रवृत्तीतून झालेली आहे. विकेंद्रीकरण प्रवृत्तीत निर्माण झालेल्या संघराज्यात केंद्रसरकारला विशेष अधिकार असणे स्वाभाविक बाब असते. भारताची घटना निर्माण होत असताना देशाची फाळणी झाली. फाळणीच्या पार्श्वभूमीवर घटना निर्माण होत असताना भविष्यात देशातील फुटीरता वृत्तीचा धोका नको या व्यापक उद्देशाने घटनाकारांनी केंद्र सरकारला व्यापक अधिकार बहाल केले. कारण राज्यशास्त्रातील कोणताही सिद्धांत मग तो संघराज्याचा असो वा कोणता असो काळ व प्रदेशाच्या गरजानुसार स्वीकारला जातो. भारताची तत्कालीन परिस्थिती बळकट केंद्रसरकार निर्माण करावे या बाजूची असल्यामुळे केंद्रप्रधान संघराज्याची निर्मिती केलेली आहे. त्यामुळे जागतिक संघराज्यविषयक सिद्धांत भारतीय सिद्धांताच्या अभ्यासासाठी सोईस्कर ठरत नाही.

भारतात संघराज्य आहे की नाही हा मुद्दा चर्चा व वादाचा विषय असला तरी संघराज्यात्मक सिद्धांत व चौकटीतील मूलभूत बाबींचे अस्तित्व भारतात दिसून येते. संघराज्यात एक मध्यवर्ती सत्ता असते आणि अनेक स्वायत्त घटकराज्य असतात. भारतात मध्यवर्ती सरकार आणि अनेक घटक राज्ये आहेत. संघराज्यात केंद्र व घटकराज्य यांच्यात अधिकारविभागणी केलेली असते. भारतीय राज्यघटनेने केंद्र व घटकराज्यात अधिकार विभागणी केलेली आहे. केंद्र व घटकराज्यात संघर्ष निर्माण झाल्यास संघर्ष निवारणाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला दिलेला असतो. संघराज्य शासन पद्धती असलेल्या देशांची राज्यघटना लिखित स्वरूपाचे असते. संघराज्यात्मक सिद्धांतातील सर्व नव्हे पण बहुतेक मूलभूत बाबीं भारतीय संघराज्यात दिसून येतात. भारत संघराज्य आहे की नाही हा प्रश्न गैरलागू ठरतो.

**टिप-भारतीय संघराज्याची लक्षणे वा वैशिष्टयै-**

संघराज्य शासन व्यवस्था असलेल्या देशात राजकीय सत्तेचे विभाजन केंद्र आणि घटकराज्य सरकार यांच्यात केलेले असते. प्रत्येक सरकार आपापापल्या क्षेत्रात स्वायत्त आणि स्वतंत्र असते या संघराज्य सिद्धांताच्या मूळ तत्त्वाशी भारतीय संघराज्य मेळ साधते. अमेरिका व जगातील इतर देशाच्या संघराज्यात असलेली वैशिष्टये भारतीय संघराज्यात आढळून येत नाही कारण भारतीय संघराज्य ज्या ऐतिहासिक वास्तवातातून निर्माण झाले आहे त्या परिस्थितीत केंद्र सरकारला जास्त अधिकार देणे आणि घटकराज्यांना दुय्यम अधिकार देणे ही गोष्ट फारशी आक्षेपार्ह नव्हती. अधिकार विभागणी असमतोल लक्षात घेऊन अभ्यासक भारतीय संघराज्याला अर्ध संघराज्य, संघराज्याचा मुखवटा असलेले एकात्म राज्य असे संबोधतात. ग्रेनव्हिल ऑस्टिन यांनी 'भारतीय संघराज्याला सहकारी संघवाद असे म्हटले आहे.' सहकारी संघवादात

केंद्र आणि राज्यसरकारे परस्पर सहयोग, समन्वय आणि सहकार्याच्या आधारावर काम करत असतात. भारत हा संघराज्य देश आहे यांच्या समर्थनार्थ काही मुद्दे मांडले जातात. ते पुढीलप्रमाणे होत.

१. **विकेंद्रीकरण पद्धत-** संघराज्य निर्मितीच्या केंद्राकर्षी आणि विकेंद्रीकरण या दोन प्रमुख दोन पद्धती आहेत. या पद्धतीपैकी विकेंद्रीकरण पद्धतीने भारतीय संघराज्याची निर्मिती झालेली असल्यामुळे केंद्राला जास्त अधिकार प्राप्त होणे साहजिकच बाब आहे. अमेरिकेसारखे घटकराज्यांनी एकत्र येऊन करार करून संघराज्याची निर्मिती केलेली नाही. १९३५ च्या भारत प्रशासन कायदयानुसार प्रशासकीय विकेंद्रीकरण व सोय या उद्देशाने संघराज्याची निर्मिती करण्यात आली आहे. संपूर्ण देशाचा राज्यकारभार एकाच ठिकाणीहून पाहणे अशक्य असल्यामुळे केंद्रीय प्रशासनाचे विकेंद्रीकरण करून केंद्र व प्रांत हे दोन भाग करण्यात आले. त्या दोन भागातील केंद्राला जास्त अधिकार देण्यात आले. हा ब्रिटिशकालीन वारसा घटनाकारांनी भावी भारताच्या घटनेत समाविष्ठ केला. घटनेत संघराज्य शब्दाऐवजी राज्याचा संघ असा शब्द वापरलेला आहे. तसेच संसदेला नवीन राज्य निर्माण करण्याचा वा नष्ट करण्याचा अधिकार दिलेला आहे आणि राज्याची पुनर्रचना करण्याचा अधिकार दिलेला.

२. **लिखित राज्यघटना-** संघराज्य हा राज्याचा विशिष्ट ध्येयपूर्तीसाठी एकत्र राहण्याचा करार आहे. या कराराचे केंद्र व घटकराज्य सरकार हे दोन पक्ष आहेत. या दोन्ही पक्षांना करार बंधनकारक आहे. कराराचे उल्लंघन दोन्ही पक्षांकडून होता कामा नये म्हणून हा करार लिखित असणे गरजेचे आहे. करार लिखित असल्याशिवाय संघराज्याला स्थैर्य लाभणार नाही. म्हणून भारतीय राज्यघटना लिखित असून त्यात केंद्र-राज्य संबंधाचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

३. **परिदृढता-** संघराज्य शासन पद्धती असलेल्या देशातील राज्यघटना परिदृढ असणे गरजेचे आहे. राज्यघटना लवचिक आणि परिवर्तनीय स्वरूपाची असेल तर केंद्र सरकार घटनादुरूस्ती करून राज्याच्या अधिकाराच्या अधिकारावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करेल किवा घटनादुरूस्तीच्या माध्यमातून राज्याचे अधिकार कमी करेल. हे वास्तव लक्षात घेऊन भारतीय राज्यघटना अंशतः परिदृढ आणि अंशतः परिवर्तनीय स्वरूपाची आहे. घटनेतील कमी महत्त्वूपर्ण बाबींतील बदल साध्या बहुमताने करता येतात. उदा. राज्याचे नाव, सीमा बदलणे वा नवीन राज्यांची निर्मिती करणे याउलट घटनेतील अत्यंत महत्त्वपूर्ण घटकांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी संसदेतील दोन्ही संबंधात विशेष बहुमत (दोन तृतीयांश) आणि निम्मे घटकराज्याच्या विधानसभेची मान्यता आवश्यक असते. केंद्र- राज्य संबंधात बदल करण्यासाठी परिदृढ पद्धतीचा वापर केला आहे जेणेकरून केंद्र आपल्या मर्जीप्रमाणे अधिकारविभागणीत बदल घडवून आणणार नाही याचा दक्षता घटनाकारांनी घेतलेली आहे.

४. **अधिकार विभागणी-** संघराज्य शासन पद्धतीत केंद्र व घटकराज्यात अधिकार विभागणी केलेली असते. भारतीय राज्यघटनेच्या सातव्या परिशिष्टात दिलेल्या तीन विषय सूचीद्वारा अधिकार विभागणी केलेली आहे. या अधिकार विभागणीनुसार केंद्रसूचीत ९७ विषय, राज्य सूचीत ६६ तर समवर्ती सूचीत ४७ विषयाचा समावेश केलेला आहे. समवर्तीसूचीतील विषयावर केंद्र व राज्य दोघांनाही कायदा करता येतो. घटनेने केलेल्या अधिकार विभागणीमुळे केंद्र व राज्यांना आपापापल्या अधिकार क्षेत्रात काम करता येते. अधिकार विभागणीचा समावेश घटनेत केल्यामुळे परस्परांच्या अधिकारावर अतिक्रमण करण्याचा प्रश्न येत नाही.

५. **न्यायमंडळाचे सर्वश्रेष्ठत्व-** संघराज्य शासन पद्धती न्यायमंडळाला सर्वश्रेष्ठत्व बहाल केलेले असते. भारतीय संघराज्यात न्यायमंडळाला स्वतंत्र व सर्वश्रेष्ठत्व मान्य केलेले आहे. केंद्रसरकार व घटकराज्य सरकार यांनी ऐकमेकांच्या अधिकारावर अतिक्रमण केल्यास किंवा दोघांमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास या संघर्षावर तोडगा काढण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला दिलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतिम व बंधनकारक असतो. घटनेतील अधिकार विभागणी आणि संघराज्यविषयक तरतूदीचा अर्थ लक्षात घेऊन केंद्र व राज्य संघर्षात सर्वोच्च न्यायालयाला अर्थ लावावा लागतो. वेळेप्रसंगी न्यायालयीन पुनर्विलोकन तत्त्वाच्या आधारे केंद्र व राज्य यांनी केलेला घटना विसंगत कायदा देखील न्यायालय रद्द करते.

६. **आणीबाणीची तरतूद-** शांततेच्या काळात संघराज्य आणि संकटकाळात एकात्म राज्य असे भारतीय संघराज्याचे स्वरूप आहे. संकट काळात देशातील संपूर्ण शक्तीला एकत्र आणण्यासाठी घटनेत राष्ट्रपतीच्या आणीबाणीची तरतूद करण्यात आली आहे. आणीबाणीच्या काळात संघराज्याचे रूपांतर एकात्म राज्यात होते. आणीबाणीच्या काळात राज्यांना केंद्राचे आदेश पाळावे लागतात. जनतेला दिलेले मूलभूत अधिकार देखील स्थगित होतात हे आगळे वेगळे वैशिष्टये भारतीय राज्यघटनेचे दिसून येते.

अशा प्रकारे वरील चर्चा व वैशिष्टयांचा आशय लक्षात घेता वेगळेपणा असलेले का असेना पण भारत हे संघराज्य शासन पद्धती असलेला देश आहे हे निर्विवाद सत्य लक्षात येते. अर्थात भारतीय संघराज्याची वैशिष्टये इतर संघराज्यापेक्षा थोडी भिन्न

आहेत हे वरील मुद्यांच्या आधारे लक्षात येते परंतु संघराज्याच्या सैद्धांतिक चौकटीशी मिळतेजुळते आहेत एवढे मात्र निश्चित सांगता येते.

**प्र.५ वा. भारतीय संघराज्याचे एकात्म स्वरूप स्पष्ट करा?**

**किंवा**

**भारतात केंद्रसरकार बलवान आहे या विधानाची चर्चा करा?**

भारतीय राज्यघटनेत संघराज्याची वैशिष्ट्ये असली तरी केंद्राला जास्त अधिकार दिल्यामुळे भारत संघराज्य नसून एकात्म राज्य आहे ही टीका केली जाते.त्यासाठी खालील कारणे दिली जातात.

१. **केंद्राकडे जास्त अधिकार -** केंद्र व राज्य अधिकार विभागणी करताना घटनेत तीन विषय सूचीचा उल्लेख आहे.केंद्रसुचीत ९७ विषय तर राज्यसुचीत ६६ विषय आणि समवती सुचीत ४७ विषयांचा समावेश आहे.समवतीसूचीवर केंद्र व राज्य या दोघांना कायदा करता येतो मात्र एकाच विषयावर दोघांनी कायदा केल्यास केंद्राचा कायदा श्रेष्ठ ठरतो आणि राज्याचा कायदा रद्द ठरतो. ज्या विषयाचा उल्लेख घटनेत नाही त्यांना शेषअधिकार असे म्हणतात.त्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे. राष्ट्रहितासाठी राज्यसभेने २/३ बहुमताने ठराव मंजूर केल्यास राज्यसुचीतील विषयावर केंद्राला कायदा करता येतो.याचा अर्थ केंद्राला सर्व विषयावर कायदा करता येतो.त्यामुळे केंद्राची सत्ता आपोआप वाढते.

२. **राज्यपालाची नेमणूक** -राज्यपाल हा घटकराज्याचा घटनात्मक प्रमुख असतो.त्यांची नेमणूक राष्ट्रपती मार्फत होते.राष्ट्रपतीची इच्छा असेपर्यत तो पदावर राहतो.राज्यपालाच्या माध्यमातून केंद्रसरकार राज्यावर प्रशासकीय नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते.राज्यपाल केंद्राचा हस्तक म्हणून काम करतो.राज्यपाल पदामुळे संघराज्य शासन पद्धतीवर प्रतिकूल परिणाम होतो.

३. **राष्ट्रपती राजवट -** एखादया घटकराज्यात घटनेनुसार राज्यकारभार चालत नसेल तर असा अहवाल राज्यपालाने राष्ट्रपतीला पाठविल्यास आणि राष्ट्रपतीची खात्री झाल्यास, राष्ट्रपती त्या राज्यासाठी राष्ट्रपती राजवट जाहीर करतो.ही राजवट लागू झाल्यास राज्याचे मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ आणि विधिमंडळ बरखास्त होते.ही तरतूद संघराज्याच्या तत्वांशी विसंगत आहे.

४. **एकच राज्यघटना-** भारतात संघराज्य असूनही संपूर्ण देशासाठी एकच राज्यघटना आहे. घटकराज्यांना घटनानिर्मितीचा अधिकार नाही. तसेच घटनादुरूस्तीचा अधिकार सुद्धा केंद्राला आहे.संसदेने पाठविलेल्या घटना दुरूस्ती विधेयक मंजुरी वा नामंजुरी देण्याचा अधिकार राज्यांना आहे. घटनादुरूस्तीसाठी फक्त निम्मे राज्याची मान्यता आवश्यकअसते. घटनादुरूस्तीच्या अधिकारामुळे केंद्रसरकार आपले अधिकार वाढून घेताना दिसते.

५. **असुरक्षित राज्ये -** भारतीय संघराज्य असूनही घटकराज्याची स्वायत्ता अबाधित ठेवली जात नाही.संघराज्य शासनपद्धतीत नवीन राज्यांची निर्मिती वा नवीन प्रदेशाचा समावेश राज्यांच्या संमती शिवाय केला जात नाही.मात्र भारतात राज्यांच्या अस्तित्वाची हमी घेतलेली नाही. नवीन राज्य निर्माण करणे वा राज्याचा आकार बदलणे इ. अधिकार संसदेला आहेत केंद्र याबाबतचे विधयेक राज्याकडे पाठविते पण राज्याचा निर्णय केंद्रावर बंधनकारक नाही.

६. **आर्थिक उत्पन्न वाटप-** घटनेने केंद्र व राज्य याच्यांत आर्थिक उत्पन्न वाटप केलेले आहे.मात्र उत्पन्न वाटप करतांना केंद्राकडे जास्त उत्पन्न देणारे कर दिलेले आहेत.याउलट राज्याकडे खर्चिक विषय दिलेले आहेत.त्यामुळे राज्य आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण नाहीत.म्हणून राज्यांना केंद्राच्या मदत व अनुदानावर अवलंबून राहावे लागते.अनुदान देतांना केंद्र भेदभाव करते.यामुळे देखील राज्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येतात.

७. **एकेरी नागरिकत्व व एकेरी न्यायव्यवस्था -**भारतात संघराज्य असूनही अमेरिकेसारखी दुहेरी न्यायव्यवस्था नाही.संपूर्ण भारतासाठी एकेरी न्यायव्यवस्था आहे. घटकराज्याना स्वतंत्र न्यायलये निर्माण करण्याचा अधिकार नाही.सर्वोच्च न्यायलय अंतिम व सर्वश्रेष्ठ न्यायालय आहे.त्याचा निर्णय सर्वांवर बंधनकारक असतो.त्यामुळे देखील राज्याच्या हक्कांवर संकोच होतो.तसेच भारतात दुहेरी नागरिकत्वाऐवजी एकेरी नागरिकत्वाची पद्धत आहे.नागरिकत्वाबद्दल कायदे करण्याचा वा नागरिकत्व देण्याचा अधिकार फक्त केंद्राला आहे.

८. **समान प्रतिनिधित्व नाही-**भारतीय संघराज्यात सर्व घटकराज्यांना समान प्रतिनिधित्व नाही.राज्याचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून राज्यसभा हे गृह ओळखले जाते.मात्र राज्यसभेत सर्व राज्यांना समान जागा दिलेल्या नाहीत. लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधित्व दिलेले असल्यामुळे लहान राज्यांना अत्यंत कमी प्रतिनिधित्व मिळालेले आहे.

वरील वैशिष्टयेचा विचार केल्यास भारतीय संघराज्याचे एकात्म स्वरूप स्पष्ट होते.तसेच केंद्र सरकारला अवाजवी अधिकार असल्याने केंद्र बलवान झालेले दिसते.

**खालील दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडा.**

१. ईस्ट इंडिया कंपनीला राणी इलिझाबेथकडून---------- वर्षी सनद प्राप्त झाली होती.
अ) **१६००** ब) १६०२ क) १६१५ ड) १६२०

२. ईस्ट इंडिया कंपनीच्या अंतर्गत कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने १७७३ मध्ये कोणता कायदा पास केला.
अ) भारत प्रशासन कायदा ब) **रेग्युलेंटिग अ‍ॅक्ट** क) प्रथम कौन्सिल कायदा ड) यापैकी नाही

३. प्रथम कौन्सिल कायदा ----------साली संमत झाला.
अ) १८५८ ब) **१८६१** क) १८७५ ड) १८९२

४. १९०९ च्या कायदयातील प्रमुख तरतूदी खालीलपैकी कोणती आहे.
अ) संघराज्य शासन पद्धती ब) गैरसरकारी सदस्य क) **मुसलमान व शीख स्वतंत्र मतदार संघ** ड) द्विदल पद्धती

५. १९१९ च्या कायदयाचे प्रमुख वैशिष्टये------- होते.
अ) संघराज्य शासन पद्धती ब) गैरसरकारी सदस्य क) स्वतंत्र मतदार संघ ड) **द्विदल पद्धती**

६. १९३५ च्या कायदयातील प्रमुख वैशिष्टये------ होते.
अ) **संघराज्य शासन पद्धती** ब) गैरसरकारी सदस्य क) स्वतंत्र मतदार संघ ड) द्विदल पद्धती

७. ब्रिटनच्या------------पंतप्रधानाच्या काळात कॅबिनेट मिशन भारतात आले होते.
अ) विस्टन चर्चिल ब) **लॉर्ड ॲटली** क) रॅम्से मॅकडोनाल्ड ड) जॉन मेजर

८. भारताची फाळणी--------------कायदयान्वये करण्यात आली.
अ) १९३५ कायदा ब) १९१९ चा कायदा क) **भारत स्वातंत्र्य कायदा** ड) क्रिप्स मिशन

९. घटना समितीचे हंगामी अध्यक्ष कोण होते.
अ) राजेंद्र प्रसाद ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर क) सरदार पटेल ड) **सच्चिदानंद सिन्हा**

१०. घटना समितीचे पहिले अधिवेशन केव्हा झाले.
अ) **९ डिसेंबर१९४६ ब**) १५ ऑगस्ट १९४७ क) २६ नोव्हेंबर १९४९ ड) २६ जानेवारी १९५०

११. घटना समितीचे कायदेविषयक सल्लागार कोण होते.
अ) राजेंद्र प्रसाद ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर क) सरदार पटेल ड) **बी.एन.राव**

१२. भारताला सार्वभौमत्व --------------दिवशी मिळाले.
अ) ९ डिसेंबर१९४६ **ब**) १५ ऑगस्ट १९४७ क) २६ नोव्हेंबर १९४९ ड) **२६ जानेवारी १९५०**

१३. गणराज्य शासन पद्धती असलेला देश खालीलपैकी कोणता आहे.
अ) इंग्लंड ब) जपान क) **भारत** ड) सौदी अरेबिया

१४. घटनेच्या ४२ व्या घटना दुरूस्तीने कोणत्या शब्दाचा सरनाम्यात समावेश करण्यात आला होता.
अ) स्वातंत्र्य व समता ब) प्रजासत्ताक व गणराज्य क) सार्वभौम व बंधुता ड) **धर्मनिरपेक्ष व समाजवाद**

१५. भारतीय घटनाकारांनी संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार कोणत्या देशाच्या घटनेवरून केला आहे.
अ) **इंग्लंड** ब) अमेरिका क) फ्रॉन्स ड) रशिया

१६. घटना दुरूस्तीची पद्धती कोणत्या देशाच्या घटनेच्या प्रभावातून समाविष्ट केली गेलेली आहे.
अ) **द. आफ्रिका** ब) अमेरिका क) फ्रॉन्स ड) रशिया

१७. प्रौढमताधिकारातील वयाची अट २१ वरून १८ वर्ष कोणत्या घटनादुरूस्तीने करण्यात आली.
अ) ४२ वी घटनादुरूस्ती ब) ४४ वी घटनादुरूस्ती क) **६१ वी घटनादुरूस्ती** ड) ७२ वी घटनादुरूस्ती

१८. सर्वात मोठी व लिखित राज्यघटना--------------देशाची आहे.
अ) **भारत** ब) अमेरिका क) चीन ड) रशिया

१९. भारतातील कोणत्या घटक राज्याची स्वतंत्र राज्यघटना अस्तित्वात आहे.
अ) महाराष्ट्र ब) उत्तरप्रदेश क) बिहार ड) **जम्मू-काश्मिर**

२०. आणीबाणीची तरतूद घटनेतील कोणत्या कलमामध्ये नमूद केलेली आहे.
अ) **३५२, ३५६ व ३६०** ब) ३५०, ३५४ व ३६० क) ३५०, ३५१ व ३५५ ड) ३५२, ३५७ व ३५९

२१. आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार घटनेनुसार कोणाला असतो.

अ) पंतप्रधान ब) **राष्ट्रपती** क) लोकसभा सभापती ड) उपराष्ट्रपती

२२. भारतात संघराज्याची निर्मिती---------- कायद्याने करण्यात आलेली होती.

अ) १९१९ चा कायदा ब) **१९३५ भारत प्रशासन कायदा** क) १९४७ भारत स्वातंत्र्य कायदा ड) १९०९ चा सुधारणा कायदा

२३. भारतात संघराज्याची निर्मिती कोणत्या पद्धतीनुसार करण्यात आलेली आहे.

अ) केंद्राकर्षी पद्धत ब) **विकेंद्रीकरण पद्धत** क) केंद्रीकरण पद्धत ड) स्थानिक पद्धत

२४. भारतीय संघराज्याला विचारवंत कोणत्या प्रकारच्या संघराज्य मानतात.

अ) **अर्ध संघराज्य** ब) पूर्ण संघराज्य क) अपूर्ण संघराज्य ड) केंद्रीय संघराज्य

२५. संघराज्य शासन पद्धती असलेल्या देशाची घटना-------- प्रकारची असते.

अ) लिखित व परिवर्तनीय ब) **लिखित व परिदृढ** क) अलिखित व परिवर्तनीय ड) अलिखित व परिदृढ

२६. भारतीय संघराज्याचे एकात्म राज्यात स्वरूपात-------------काळात होते.

अ) निवडणूक ब) युद्ध क) शांतता ड) **आणीबाणी**

२७. केंद्र- राज्य अधिकारविभागणीचा घटनेतील कितव्या----------अनुसूची (Schedule) समावेश आहे.

अ) पाचव्या ब) सहाव्या क) **सातव्या** ड) आठव्या

२८. केंद्र, राज्य आणि समवर्ती सूचीत किती विषयाचा समावेश आहे.

अ) **९७, ६६, ४७** ब) ९७, ६२, ५२ क) ९७, ६५, ४६ ड) ९६, ६६, ४९

२९. घटनेनुसार राज्यकारभार चालत नाही असा अहवाल----------पाठविल्यास राष्ट्रपती त्या राज्यासाठी राष्ट्रपती राजवट जाहीर करीत असतो.

३०. अ) मुख्यमंत्री ब) विधानसभा क) **राज्यपाल** ड) पंतप्रधान

भारतात नवीन राज्य निर्माण करणे वा राज्याचा आकार बदलणे इ. अधिकार --------ला आहेत.

३१. अ) विधानसभा ब) **संसद** क) विधानपरिषद ड) राष्ट्रपती

राज्यसभेत राज्यांना -------------आधारावर प्रतिनिधित्व दिलेले आहे.

३२. अ) समान प्रतिनिधित्व ब) आकारमान क) स्थान ड) **लोकसंख्या**

भारतीय संघराज्याची वैशिष्टये खालीलपैकी कोणते आहे ते सांगा.

अ) मर्यादित नागरिकत्व व बहुल न्यायव्यवस्था ब) **एकेरी नागरिकत्व व एकेरी न्यायव्यवस्था**

क) दुहेरी नागरिकत्व व दुहेरी न्यायव्यवस्था ड) यापैकी नाही

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

**१.** भारतीय राज्यघटनेचा सरनामा ठराव घटना समितीत कोणी मांडला होता.

उत्तर-भारतीय राज्यघटनेचा सरनाम्याचा ठराव पंडित नेहरू यांनी मांडला होता.

**२.** सार्वभौमत्व म्हणजे काय ते सांगा?

उत्तर- कोणत्याही देशाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियत्रंण नसणे आणि अंर्तगत व बर्हिगतदृष्टया पूर्ण स्वतंत्र असणे म्हणजे सार्वभौम होय.भारत हा सार्वभौम देश आहे.

**३.** गणराज्य म्हणजे काय?

उत्तर- देशाचा सर्वोच्च प्रमुख प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या जनतेकडून विशिष्ट काळासाठी निवडून येतो त्यास गणराज्य म्हणतात.भारत गणराज्य देश आहे.कारण भारताचा सर्वोच्च प्रमुख राष्ट्रपती जनतेकडून निवडून येतो.

**४.** ४२ व्या घटनादुरूस्तीने सरनाम्यात कोणत्या तत्त्वाचा समावेश केलेला आहे.

उत्तर- ४२ व्या घटनादुरूस्तीने घटनेत समाजवाद, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता शब्दाचा समावेश केलेला आहे.

**५.** धर्मनिरपेक्षता म्हणजे काय?

उत्तर- राष्ट्राचा अधिकृत धर्म नसणे आणि सर्व धर्माना समान वागणूक देणे म्हणजे धर्मनिरपेक्षता होय.

**६.** मसुदा समितीच्या दोन सदस्यांची नावे लिहा.

उत्तर- डॉ.बाबासाहेब आंबेडकर, के.एम.मुंन्शी, गोपाळस्वामी अय्यंगार आणि डी.पी.खेतान

**७.** प्रतिनिधीक लोकशाहीचे दोन प्रकार कोणते?

उत्तर- अ) संसदीय लोकशाही  ब) अध्यक्षीय लोकशाही

**८.** घटना समितीतील दोन स्त्री प्रतिनिधीची नांवे सांगा.

उत्तर - बेगम रसूल, विजयालक्ष्मी पंडित, हंसा मेहता आणि सरोजिनी नायडू

**९.** संसदीय लोकशाहीची दोन प्रमुख वैशिष्टये सांगा.

उत्तर -अ) कार्यकारीमंडळ कायदेमंडळाला सामुहिकरित्या जबाबदार असते.कायदेमंडळाचा विश्वास असेपर्यंत सत्तेवर राहते.कायदेमंडळाने अविश्वास प्रस्ताव मंजुर केल्यास कार्यकारीमंडळला राजीनामा दयावा लागतो.

ब) कायदेमंडळातून कार्यकारीमंडळ निर्माण होते.कार्यकारीमंडळाचे सदस्य कायदेमंडळाच्या कार्यात सक्रिय सहभात घेतात.

**१०.** घटना समिती आणि मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते?

उत्तर- घटना समिती अध्यक्ष- डॉ. राजेंद्रप्रसाद आणि मसुदा समिती अध्यक्ष - डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**११.** घटना समितीच्या दोन सदस्यांची नांवे सांगा.

उत्तर- पंडीत जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बॅ.जयकर

**१२.** घटना समितीचे कामकाज किती दिवस चालले ते सांगा.

उत्तर- घटना समितीचे कामकाज २ वर्ष ११ महिने आणि १८ दिवस चालले होते.

**१३.** भारतीय राज्यघटनेत एकूण किती कलमे व प्रकरणे आहेत ते सांगा.

उत्तर - भारतीय राज्यघटनेत ३९५ कलमे आणि १० परिशिष्ट आणि २४ विभाग आहेत.

**१४.** धर्मनिरपेक्ष राज्याची दोन वैशिष्टये सांगा.

उत्तर - अ) धर्मनिरपेक्षता म्हणजे राज्याचा अधिकृत धर्म राहणार नाही .

ब) राज्य सर्व धर्माना समान स्थान व समान संरक्षण देईल.प्रत्येकाला वैयक्तिक जीवनात धर्म पालनाचा अधिकार असेल.

**१५.** भारतीय राज्यघटना केव्हा स्वीकृत आणि अंमलात आली ते सांगा.

उत्तर-२६ नोंव्हेबर १९४९ ला घटना घटनापरिषदेने स्वीकृत करण्यात आली.२६ जानेवारी १९५० पासून घटनेची अंमलबजावणी करण्यात आली.

**१६.** भारतीय घटनेतील कोणत्या कलमांत आणि किती प्रकारच्या घटनादुरूस्ती पद्धती दिलेल्या आहेत.

उत्तर- घटनेच्या ३६८ कलमात घटनादुरूस्तीची पद्धत दिलेली असून त्यात साधे बहुमत, विशेष बहुमत आणि विशेष बहुमत व निम्मे राज्याची मान्यता या तीन प्रकारे घटनादुरूस्ती करता येते.

**१७.** संघराज्यासाठी आवश्यक असणाऱ्या तीन प्रमुख गोष्टी सांगा?

उत्तर- अ) लिखीत राज्यघटना ब) अधिकार विभागणी क) न्यायमंडळाचे सर्वश्रेष्ठत्व

**१८.** केंद्र सूची, राज्यसूची व समवर्ती सूचीत किती विषय आहेत?

उत्तर - केद्र सूची - ९७ विषय, राज्यसूची - ६६ विषय आणि समवर्ती सूची- ४७ विषय आहेत.

**१९.** संघराज्याची व्याख्या सांगा.

उत्तर - प्रा.डायसीच्या मते "संघराज्य म्हणजे राष्ट्रीय ऐक्य व सत्ता आणि घटकराज्याचे अधिकार यांचा तऱ्हेने मेळ घालण्याच्या उद्देशाने तयार केलेली राजकीय यंत्रणा होय."

**२०.** भारतीय संघराज्य पद्धतीची दोन वैशिष्टये सांगा.

उत्तर -अ) केंद्रप्रधान संघराज्य ब) एकेरी राज्यघटना व एकेरी न्यायव्यवस्था क) अधिकार विभागणी

## प्रकरण दुसरे
## मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्त्वे

**टिप-भारतातील मूलभूत हक्कांचा विकास-** जगात सर्वप्रथम १७९१ मध्ये अमेरिकन राज्यघटनेत मूलभूत अधिकाराचा समावेश केलेला होता. भारतात स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात राष्ट्रवादी नेतृत्वाने मूलभूत अधिकाराची मागणी सुरू केली. लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणने तयार केलेल्या स्वराज्य सनदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य, खाजगी मालमत्तेचे स्वातंत्र्य आणि न्यायालयीन समता इत्यादी मूलभूत अधिकाराचा समावेश केला होता. श्रीमती ॲनी बेझंट यांनी आयर्लंडच्या घटनेवर आधारित The Common Wealth of India Bill संमत करून मूलभूत हक्कांसंबंधी एक प्रस्ताव सादर केलेला होता. त्या प्रस्तावात अनेक मूलभूत अधिकाराचा उल्लेख केला होता. १९१८ च्या काँग्रेस अधिवेशनात मूलभूत हक्कांचा नव्या राज्यघटनेत समावेश व्हावा अशी मागणी केली होती. १९२८ मध्ये नेहरू समितीने भारतासाठी निर्माण केलेल्या घटनेत मूलभूत अधिकाराचा उल्लेख होता. नेहरून समिती स्पष्ट शब्दात सांगितले की, "भारतातील सर्व वर्गातील लोकांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकाराची सुरक्षितता निर्माण करण्याचे सर्वोत्तम साधन म्हणजे मौलिक अधिकाराचा समावेश करणे हेच आहे." या स्पष्ट शब्दात नेहरू समितीने मूलभूत अधिकाराच्या समावेशाचा आग्रह धरला होता. १९३१ साली कराची येथे झालेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात मूलभूत अधिकारांच्या संदर्भात ठराव संमत केला होता. गोलमेज परिषदामध्ये भारतीय प्रतिनिधींनी भारतीयांना मूलभूत अधिकार प्रदान करावेत ही मागणी ब्रिटिशांकडे होती. १९४५ मध्ये सप्रु समितीने मूलभूत हक्कांची मागणीचा पुनरूच्चार केला. १९४६ साली कॅबिनेट मिशनने मूलभूत अधिकाराच्या घटनेतील समावेशासाठी आचार्य जे.बी.कृपलानी यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमली होती. या समितीने आपला तात्पुरता अहवाल २३ एप्रिल १९४७ रोजी घटना समितीने सादर केला. घटना समितीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली मूलभूत अधिकार व अल्पसंख्याक समिती स्थान केली. या समितीने दिलेल्या शिफारशीच्या आधारावर चर्चा होऊन सर्वसंमतीने मूलभूत अधिकाराचा भारतीय राज्यघटनेत समावेश करण्यात आला.

मूलभूत हक्क हा मानवी जीवनाच्या विकासाची गुरूकिल्ली मानली जाते. हक्काशिवाय व्यक्तिविकासाची कल्पना करता येत नाही म्हणून मानवाने प्राचीन काळापासून राज्य आणि समाजव्यवस्थेशी संघर्ष करून विविध हक्क प्राप्त केलेले आहेत. इंग्लंडचा राजा जॉनने दिलेल्या मॅग्नाकार्टा सनदेपासून तर आधुनिक काळात युनोने दिलेल्या मानव अधिकार घोषणापत्रात विविध अधिकाराचा समावेश आहे. अधिकाराचे मानवी जीवनातील स्थान लक्षात घेता प्रा. लास्की विचारवंत म्हणतो की, "कोणत्याही राज्याचा दर्जा ते राज्य तेथील नागरिकांना किती प्रमाणात अधिकार देता यावरून ठरत असतो." प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक विकास साध्य करणे आधुनिक लोकशाही शासन व्यवस्थेचे ध्येय मानले जाते. हे ध्येय पूर्ण करण्यासाठी नागरिकांना मूलभूत अधिकार देणे आधुनिक काळात आवश्यक मानले जाते. नागरिकांना नुसते हक्क देणे पुरेसे नसते तर हक्कांच्या उपभोगायोग्य परिस्थिती निर्माण करणे देखील राजकीय व्यवस्थेचे प्रदान कार्य असते. योग्य परिस्थितीशिवाय हक्कांचा उपभोग अशक्य असतो. हक्क उपभोगण्यास योग्य परिस्थितीचा अभाव असेल तर हक्क ही शोभेची वस्तू ठरेल. म्हणून आधुनिक काळात मूलभूत हक्कांशिवाय लोकशाही व्यवस्थेची कल्पना करताच येत नाही. हक्कांची व्याख्या करताना प्रा. लास्की म्हणतात की, "अधिकार म्हणजे समाजजीवनाच्या अशा अटी की ज्याशिवाय व्यक्ती स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व सर्वांगीण विकास करू शकत नाही." प्रा. लास्कीच्या व्याख्येवरून असे सांगता येते की, हक्काशिवाय व्यक्ती विकास होऊ शकत नाही. व्यक्तीविकासासाठी आवश्यक परिस्थितीला राज्य आणि समाजाने अधिकृत मान्यता वा वैधता प्रदान करणे म्हणजे हक्क होय.

**टिप-मूलभूत हक्कांचे महत्त्व-** व्यक्तीच्या विविध अंगाच्या विकासासाठी हक्क आवश्यक असतात. या हक्कांना राज्य व्यवस्थेने मान्यता प्रदान केल्यास त्यांचे मूलभूत हक्कांत रूपांतर होत असते. मूलभूत अधिकाराचा समावेश संविधान केला जात असतो. संविधानात समाविष्ट मूलभूत अधिकारात घटनादुरूस्तीशिवाय परिवर्तन करता येत नाही. तसेच अधिकाराना न्यायालयाचे संरक्षण प्रदान केलेले असल्यामुळे त्यांच्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता कमी असते. हक्कांचा घटनेत समावेश केल्यामुळे व्यक्ती, संस्था आणि सरकारच्या हुकूमशाही वृत्तीपासून बचाव करण्यासाठी नागरिकांना एक हत्यार प्राप्त होत असते. अधिकारावर कोणीही अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला तर नागरिकांना न्यायालयात दाद मागता येते आणि न्यायालयाचा निर्णय सर्वांवर बंधनकारक असतो. त्यामुळे मूलभूत अधिकाराच्या माध्यमातून नागरिकांच्या स्वातंत्र्याला एक प्रकारे हमी प्राप्त होत असते त्यासोबत शासनाच्या अधिकारावर नियंत्रण प्रस्थापित होत असते. प्रा. व्ही.एम. पायली म्हणतात की, "मूलभूत अधिकाराच्या माध्यमातून व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि राज्याची शक्ती ह्यांवर मर्यादा लादल्या जातात." मूलभूत अधिकार हे एका अर्थाने राज्याचे सार्वभौमत्व आणि नागरिकांचे स्वातंत्र्य यात समन्वय साधणारी प्रक्रिया ठरते.

**मूलभूत अधिकाराचा अर्थ व व्याख्या -** अधिकाराचा सकारात्मक आणि नकारात्मक भूमिकेतून विचार केला जातो. बंधनाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य हा अधिकाराचा नकारात्मक भाव असतो. परंतु मूलभूत अधिकाराचा विचार सकारात्मक परिस्थितीत केला जात असतो. मूलभूत अधिकाराचा विचार राज्य आणि सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात केला जात असतो. व्यक्तीविकासासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करणे वा व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वोष्कृष्ट पद्धतीने विकास साधता येईल अशा परिस्थितीची निर्मितीला मान्यता प्रदान करणे म्हणजे मूलभूत अधिकार आहे असे मानले जाते. हक्क वा अधिकारांना समाज आणि राज्याने मान्यता दिल्यानंतर त्यांचे मूलभूत अधिकारात रूपांतर होत असते. राज्याने मान्यता दिलेले वैधानिक अधिकार आणि समाजाने मान्यता दिलेल्या सामाजिक अधिकारांना संविधान स्थान मिळाल्यानंतर त्यांना आपण मूलभूत अधिकार असे संबोधतो. संविधानात समाविष्ट मूलभूत अधिकाराच्या संरक्षणाची हमी दिलेली असते. त्यामुळे मूलभूत अधिकाराच्या संविधानातील समावेशामुळे हक्क उपभोगाची शाश्वती मिळते. त्यांच्यावर अतिक्रमण करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास न्यायालयात दाद मागता येते.

१. **बोझांके-** यांच्या मते, हक्क म्हणजे समाजाने मान्य केलेला व राज्याने अंमलात आणलेला असा व्यक्तीचा दावा होय.
२. **गिलख्रिस्त-** यांच्यामते, समुदायाचा एक घटक म्हणून व्यक्तीला हक्क प्राप्त होतात. समुदायाच्या बाहेर व्यक्तीला हक्क आहेत.
३. **प्रा.** लास्की- "अधिकार म्हणजे समाज जीवनाची अशी परिस्थिती होय की ज्याच्या शिवाय कोणतीही व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्वाचा योग्य तऱ्हेने विकास करू शकत नाही. व्यक्ती विकासावी उचित संधी प्राप्त करून देण्याचा अधिकाराचा उद्देश असतो."

**टिप- भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची वैशिष्टये-**

भारतीय राज्यघटनेच्या १२ ते ३५ कलमात मूलभूत अधिकाराचा समावेश केलेला आहे. हक्काविषयीच्या तपशिलाचा समावेश १४ ते ३५ कलमा केलेला आहे. मूलभूत हक्क हे न्यायप्रविष्ठ मानल्यामुळे एखादी व्यक्ती, संस्था वा शासनाकडून अतिक्रमण झाल्यास नागरिकाला न्यायालयात दाद मागता येते. भारतीय घटनाकारांनी अमेरिका, फ्रॉन्स, वायमर प्रजासत्ताक, आयर्लंड, कॅनडा इत्यादी देशाच्या राज्यघटनेच्या प्रभावातून मूलभूत अधिकाराचा घटनेत समावेश केलेला आहे. घटनेत मूलभूत अधिकाराचा समावेश केला गेल्यामुळे बहुमतप्राप्त पक्षाची आणि राज्यकर्त्यावर्गांच्या हुकूमशाहीपासून नागरिकांचा बचाव करता येईल. हक्कांच्या माध्यमातून जनहिताचे संवर्धन व संरक्षण करण्याची हमी प्राप्त होऊ शकते. मूलभूत हक्क एका बाजूला नागरी स्वातंत्र्याच्या संरक्षणाची हमी घेतात तर दुसऱ्या बाजूला राज्यकर्त्यावर्गांच्या सत्तेवर मर्यादा व नियंत्रण प्रस्थापित करण्याचे काम करतात. लोकशाही ही जीवनप्रणाली बनविण्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करण्याचे काम मूलभूत हक्क करत असतात. मूलभूत हक्कांच्या समावेशला महत्त्वपूर्ण स्थान दिले जाते. भारतीय राज्यघटनेत समाविष्ठ मूलभूत अधिकारांची काही ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**१. सविस्तर व विस्तृत नोंद-** भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकाराची सविस्तरपणे नोंद घेतलेली आहे. घटनेतील जवळपास २४ कलमे मूलभूत अधिकारासाठी खर्च केलेली आहेत. जगातील कोणत्याही देशाच्या राज्यघटनेत इतक्या सविस्तरपणे मूलभूत हक्कांचाी नोंद घेतलेली दिसून येते नाही. भारतीय राज्यघटनेने फक्त भारतीयांना अधिकार प्रदान केलेले नाहीत तर परकीय नागरिकांना देखील काही अधिकार प्रदान केलेले आढळतात. उदा. धार्मिक स्वातंत्र्य मूलभूत अधिकाराचा समावेश करताना भारतातील सामाजिक परिस्थितीचा विचार करूनही काही अधिकाराचा समावेश केलेला आहे. हक्कांचा समावेश करताना बहुसंख्याकासोबत अल्पसंख्याकाचा देखील विचार केलेला आहे. अल्पसंख्याकाच्या संरक्षणासाठी काही अधिकाराचा समावेश केलेला आहे.

**२. सकारात्मक आणि नकारात्मक हक्क-** भारतीय राज्यघटनेत समाविष्ट अधिकाराचे सकारात्मक आणि नकारात्मक या दोन प्रकारात वर्गीकरण करता येते. सकारात्मक अधिकाराच्या माध्यमातून व्यक्ती विकासाला वाव देणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण अधिकाराचा समावेश घटनेत केलेला आहेत उदा. भाषण स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य याउलट नकारात्मक अधिकाराच्या माध्यमातून राज्याच्या अधिकारावर मर्यादा लादलेल्या आहेत. उदा. धर्म, लिंग, जन्मस्थान इत्यादी आधारावर नागरिकांमध्ये भेदाभेद करता येणार नाही.

**३. हक्क संरक्षणाची हमी-** भारतीय राज्यघटनेने मूलभूत अधिकार न्यायप्रविष्ठ मानलेले आहेत. घटनेच्या ३२ व्या कलमानुसार मूलभूत हक्कांना न्यायालयाचे संरक्षण दिलेले आहे. हक्कांवर एखादया व्यक्ती, संस्था वा सरकारने अतिक्रमण केल्यास न्यायालयात दाद मागता येते. घटनेच्या ३२ व्या कलमानुसार सर्वोच्च न्यायालय बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, अधिकारपृच्छा इत्यादी सारखे पाच प्रकारचे आदेश निर्गमित करू शकते. न्यायालय हक्क संरक्षणासाठी आदेश काढू शकते. घटनेच्या कलम २२६ नुसार उच्च न्यायालय देखील वरील प्रकारचे पाच प्रकारचे

आदेश निर्गमित करू शकते. मूलभूत हक्क संरक्षणाचे महत्त्व लक्षात घेता घटनेच्या ३२ व्या कलमाला भारतीय राज्यघटनेचा आत्मा असे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे.

४. **हक्कांवर मर्यादा-** भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेले हक्क अमर्याद स्वरूपाचे नाहीत. अधिकारावर अनेक मर्यादा व अटी लादलेल्या आहेत. विशिष्ट परिस्थितीत हक्कांचा संक्षेप करण्याचा अधिकार संसदेला बहाल केलेला आहे. संसद राष्ट्रहिताच्या दृष्टीकोनातून हक्कावर मर्यादा लादत असते. कलम १३ नुसार हक्कांशी विसंगत कायदा रद्दबादल ठरविण्याचा अधिकार घटनेने प्रदान केलेला होता. परंतु २४ वी आणि २५ व्या घटनादुरूस्तीने झालेल्या बदलामुळे १३ व्या कलमाला काहीही अर्थ उरलेला नाही. घटनादुरूस्ती ३६८ व्या कलमानुसार घटनेच्या कोणत्याही भागात बदल करता येतो याचा अर्थ संसद कायदा करून मूलभूत अधिकार कमी करून शकते. घटनेने हक्क दिलेले असले तरी ते अमर्याद स्वरूपात दिलेले नाहीत. प्रत्येक हक्कांबाबत मर्यादा घटनेत दिलेल्या आहेत. उदा. भाषण स्वातंत्र्याचा अधिकार असला तरी भाषणामुळे कायदा व सुव्यवस्थेला बाद्या पोहचत असेल तर सरकार या अधिकारावर बंदी लादू शकते. अर्थात सरकारने लादलेल्या मर्यादा योग्य की अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.

५. **बंधनकारक-** भारतीय राज्यघटनेत समाविष्ठ मूलभूत अधिकार भारतातील सर्व व्यक्ती, संस्था आणि शासनावर देखील बंधनकारक आहेत. मूलभूत हक्क पालनाबाबत कोणताही अपवाद घटनेने केलेला नाही. आणीबाणीचा अपवाद वगळता मूलभूत अधिकारावर बंधने टाकण्याचा अधिकार कोणत्याही संस्थेला दिलेला नाही. भारतातील कोणतीही व्यक्ती, संस्था वा शासन मूलभूत अधिकार नाकारू शकत नाही. हक्कांमध्ये विशद केलेल्या गोष्टीपासून स्वतःला नामनिराळे ठेवू शकत नाही. त्यांना हक्कांचे पालन करावेच लागते. उदा. सर्व सार्वजनिक ठिकाणे सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी खुली करणे कायदयाने बंधनकारक आहे.

६. **आणाबाणीच्या काळात हक्क स्थगित-** भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५२, ३५६ व ३६० मध्ये राष्ट्रीय, राज्य आणि आर्थिक आणीबाणी संबंधीच्या तरतूदीचा समावेश केलेला आहे. परकीय आक्रमण, युद्ध आणि सशस्त्र उठाव इत्यादी कारणासाठी राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात नागरिकांना घटनेने दिलेले मूलभूत अधिकार स्थगित होतात. त्या काळात हक्क संरक्षणासाठी न्यायालयात दाद मागता येत नाही.

७. **वैधानिक अधिकार-** भारतीय राज्यघटनेने हक्कासंदर्भातला नैसर्गिक अधिकाराचा सिद्धांत स्वीकारलेला नाही. नैसर्गिक हक्क सिद्धांतानुसार व्यक्तीला अधिकार निसर्गतः वा जन्मतः प्राप्त होतात. हक्क हे निसर्गतः प्राप्त होत असल्यामुळे त्यांच्यावर मर्यादा लादण्याचा अधिकार कोणालाही नसतो. नैसर्गिक अधिकाराच्या सिद्धांतात अधिकारावर मर्यादा लादता येत नाही त्यामुळे घटनाकारांनी नैसर्गिक अधिकाराऐवजी वैधानिक अधिकार सिद्धांताला मान्यता दिलेली आहे. अधिकार हे घटनेने प्रदान केलेले आहे. घटनेने अधिकाराना रीतसर वैधानिक मान्यता व संरक्षण पुरविलेले आहे. अधिकाराचा योग्य उपभोगासाठी आवश्यक मर्यादा देखील विशद केलेल्या आहेत.

८. **परिवर्तनशील आणि सामाजिकता-** भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेले अधिकार हे परिवर्तनशील आहेत. स्थल, काल आणि परिस्थितीनुसार त्यात घटनादुरूस्ती करून परिवर्तन करण्याचा अधिकार संसदेला बहाल केलेला आहे. उदा. भारताने स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही समाजवादी अर्थव्यवस्था स्वीकार केल्यामुळे मूळ राज्यघटनेतील संपत्तीचा अधिकार ४४ व्या घटनादुरूस्तीने रद्द केला. घटनेने प्रदान केलेले अधिकार समाजहित आणि राष्ट्रहित लक्षात घेऊन नागरिकांना प्रदान केलेले आहेत. हक्कांचा उपभोग घेताना समाजहित आणि राष्ट्रहिताला कोणत्याही प्रकारची बाधा आणता कामा नये म्हणून घटनाकारांनी समाजहितासाठी हक्कांवर काही नियंत्रणे लादली आहेत. या नियंत्रणाच्या मर्यादेत राहून अधिकाराचा उपभोग नागरिकांना घेता येतो. हक्कांच्या उपभोगामुळे समाजहिताला बाधा पोहचत असेल तर त्यावर नियंत्रण लादण्याचा अधिकार संसदेला आहे.

**प्र.१ रा. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क सांगा?**

भारतीय घटनेच्या तिसऱ्या विभागात १२ ते ३५ कलमांमध्ये सुरूवातीला सात मूलभूत हक्काचा समावेश होता.४४ व्या घटनादुरूस्तीने मालमत्तेचा अधिकार हक्कांच्या यादीतून वगळलेला आहे.त्यामुळे घटनेत सद्या सहा मूलभूत हक्क आहेत. घटनाकारांनी कॅनडा, फ्रॉन्स व अमेरिकेच्या घटनांचा विचार करून आपल्या देशाच्या घटनेत हक्कांचा समावेश केलेला आहे

१. **समतेचा हक्क** - घटनेच्या १४ ते १८ कलमांत समतेच्या हक्कांचा समावेश आहे.त्यात पुढील तरतूदीचा समावेश आहे.

a) **कायदयासमोर समानता -** घटनेने प्रत्येक व्यक्तीला कायदयासमोर समान मानलेले आहे. कायदयाचे समान संरक्षण दिलेले आहे.कायदयासमोर समानता म्हणजे व्यक्ती कोणत्याही दर्जाची असो वा हुद्दांची असो कायदयापेक्षा श्रेष्ठ

नाही.सर्व कायदे व न्यायालयाचे आदेश सर्वांना समान लागू होतील.राष्ट्रपती असो की झाडू कामगार समान गुन्हासाठी समान शिक्षा दिली जाईल.

**b) भेदभावाचा अभाव** - घटनेनुसार धर्म, जात, वंश, लिंग व पंथ इ.आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही.रस्ते, सार्वजनिक उपहारगृह व तलाव इ.सार्वजनिक ठिकाणे सर्वांसाठी खुली राहतील.मात्र १६ व्या कलमानुसार लहान बालके, स्त्रिया व मागासलेल्या जाती व जमातीसाठी सरकार विशेष तरतूदी करेल, त्या समतेच्या विरोधी मानल्या जाणार नाहीत.

**c) अस्पृश्यता निवारण** - भारतात प्राचीन काळापासून अस्पृश्यता पाळली जात होती.ही अत्यंत अमानुष रूढी घटनेच्या १७ व्या कलमानुसार घटनाबाहय ठरविण्यात आली. अस्पृश्यता पाळणे फौजदारी गुन्हा आहे.अस्पृश्यतेच्या नावाखाली कुणालाही अपात्र ठरविता येणार नाही.

**d) पदव्यांचे समाप्तीकरण** - ब्रिटिशकाळात रावसाहेब, रावबहादूर, रावदिवाण इ.स्वरूपाच्या भेदभाव निर्माण करणाऱ्या पदव्या दिल्या जात असत. घटनेच्या १८ व्या कलमानुसार या पदव्या रद्द करण्यात आल्या.मात्र विविध क्षेत्रात विशेष काम करणाऱ्या व्यक्तीचे कौतुक करण्यासाठी सरकार पदव्या देऊ शकते उदा. भारतरत्न पदवी मात्र या पदव्या नसून पदके आहेत.तसेच राष्ट्रपतीच्या परवानगीशिवाय भारताच्या नागरिकाला परदेशातील पदवी स्विकारता येणार नाही.

**२. स्वातंत्र्याचा हक्क** - घटनेच्या १९ ते २२ कलमात स्वातंत्र्याच्या हक्काचा समावेश आहे.१९ व्या कलमात पुढील हक्क दिलेले आहेत.

**a) भाषण व मतप्रदर्शन स्वातंत्र्य** - भाषण व लेखनाद्वारे व्यक्ती आपले विचार इतरांसमोर ठेऊ शकते.म्हणून घटनेने हे स्वातंत्र्य नागरिकांना दिलेले आहे.मात्र या हक्कावर काही मर्यादा टाकलेल्या आहेत उदा.कायदा सुव्यवस्था नष्ट होईल वा एखादया व्यक्तीचे चारित्र्यहनन होईल असे भाषण व लेखन करता येणार नाही.आणि केल्यास सरकार भाषणावर बंदी लादू शकते.

**b) निशस्त्रपणे सभा भरविणे** - घटनेने शांततापूर्वक सभा भरविण्याचा अधिकार नागरिकांना दिलेला आहे.कारण सभा भरविल्याशिवाय आपले विचार लोकांसमोर मांडता येणार नाहीत.मात्र हा अधिकार अमर्याद स्वरूपात नाही.सार्वजनिक शांततेला बाद्या पोहचत असेल तर सरकार या अधिकारावर बंदी लादू शकते.

**c) संघटन स्वातंत्र्य** - घटनेने व्यक्तिमत्त्व विकासासाठी संस्था व संघटना स्थापन करण्याचा अधिकार दिलेला आहे.या अधिकाराचा वापर करून सांस्कृतिक व राजकीय संघटना स्थापन करता येतात.मात्र हा अधिकार अमर्याद नाही.देशाच्या एकात्मतेला बाद्या पोचवणाऱ्या संघटनेवर सरकार बंदी लादू शकते उदा.महाराष्ट्र सरकारने सिमी संघटनेवर बंदी लादली.

**d) संचार स्वातंत्र्य**- घटनेनुसार भारतीय नागरिकाला भारतात कुठेही संचार करता येईल त्यासाठी परवानगीची गरज राहणार नाही.मात्र सरकारने सुरक्षित घोषित केलेल्या क्षेत्रात सरकारच्या परवानगीशिवाय प्रवेश करता येणार नाही.

**e) वास्तव्य स्वातंत्र्य**- भारताच्या नागरिकाला भारताच्या कोणत्याही भागात जाऊन वास्तव्य करण्याचा अधिकार घटनेने दिलेला आहे.पण वास्तव्यामुळे सार्वजनिक हिताला धोका वा बाद्या येत असेल तर सरकार बंदी लादू शकते.

**f) व्यवसाय स्वातंत्र्य** - भारतात पूर्वी जातीच्या आधारावर व्यवसाय केला जात असे एका जातीचा व्यवसाय दुसऱ्या जातीला करता येत नसे.सद्या घटनेनुसार भारतीयांना कोणत्याही व्यवसाय करता येईल.मात्र काही व्यवसाय करण्यासाठी सरकार पात्रता लादू शकते.

**g) व्यक्ती स्वातंत्र्याची हमी** - घटनेच्या २० ते २२ कलमात व्यक्ती स्वातंत्र्य रक्षणासाठी पुढील तरतूदी केलेल्या आहेत.२० व्या कलमानुसार प्रचलित कायदयानुसार गुन्हा सिद्ध होत नाही तोपर्यंत कोणत्याही व्यक्तीला गुन्हेगार मानले जाणार नाही.एका गुन्हासाठी एकदाच शिक्षा दिली जाईल.२१ व्या कलमानुसार व्यक्तीचे जीवित व स्वातंत्र्य कायदयाने घालून दिलेल्या पद्धतीशिवाय हिरावून घेता येणार नाही. २२ व्या कलमानुसार अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासाच्या आत न्यायाधीशासमोर हजर केले जाईल.मात्र परकिय नागरिक व प्रतिबंधक स्थानबध्दता कायदयाखाली अटक केलेल्या व्यक्तीला ही सवलत मिळणार नाही.

**३. शोषणाविरूध्द वा पिळवणूकीविरूध्दचा हक्क** - भारतात फारपूर्वी पासून वेठबिगारी, देवदासी, सतीप्रथा व गुलामाची खरेदी विक्री इ.रूढी अस्तित्वात होत्या.या रूढींच्या माध्यमातून पद्दलित वर्गाची आणी स्त्रियाची पिळवणूक सुरू होती.म्हणून घटनेच्या २३ व्या कलमानुसार या सर्व रूढी घटनाबाहय मानण्यात आल्या.सक्तीचा वेश्या व्यवसाय तसेच १४ वर्षाच्या आतील लहान मुलाकडून शारीरिक काम करून घेण्यास बंदी लादण्यात आली.२४ व्या कलमानुसार सरकार सार्वजनिक हितासाठी नागरिकांकडून एखादे काम करून घेऊ

शकते.उदा.युद्धकाळात सक्तीने लष्कर भरती मात्र सक्ती करतांना जात, धर्म, लिंग इ.आधारावर भेदभाव करता येणार नाही.

४. **धार्मिक स्वातंत्र्य** - घटनेच्या २५ ते २८ कलमात धार्मिक स्वातंत्र्याचा समावेश आहे.हिंदुस्थानची फाळणी धर्म घटकावर झालेली असल्याने घटनाकारांनी धर्म ही वैयक्तिक बाब मानली.प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार धर्म बदलण्याचा, पुजा व अर्चा करण्याचा अधिकार दिलेला आहे. धार्मिक कार्यासाठी नागरिक धार्मिक संस्था वा मंडळ निर्माण करू शकतात.धार्मिक कार्यासाठी देणगी गोळा करता येते.मात्र देणगी गोळा करतांना सक्ती करता येत नाही.सरकारी मदतीवर चालणाऱ्या शिक्षणसंस्थेत धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही वा विशिष्ट शिक्षण घेण्याची सक्ती केली जाणार नाही.या तरतूदीचा विचार करता भारत धर्मनिरपेक्ष देश आहे.कारण भारताचा अधिकृत असा कोणताही धर्म नाही.सर्व धर्माना समान स्थान आहे.

५. **सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क** - घटनेच्या २९ व्या कलमानुसार प्रत्येक नागरिकाला आपली भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्याचा अधिकार आहे.तसेच सरकारी मदतीवर चालणाऱ्या संस्थेत धर्म, जात, लिंग इ.आधारावर भेदभाव केला जाणार नाही वा प्रवेश नाकारता येणार नाही.३० व्या कलमानुसार भाषिक व धार्मिक अल्पसंख्याक आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी शिक्षण संस्था स्थापन करू शकतात.या संस्थाना मदत करताना सरकार कोणताही भेदभाव करणार नाही.या हक्काच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाला संरक्षण देण्याचा प्रयत्न घटनेने केलेला दिसतो.

६. **घटनात्मक उपायोजनेचा हक्क-** घटनेच्या ३२ व्या कलमानुसार मूलभूत हक्काना न्यायालयाचे संरक्षण दिलेले आहे.हक्कांवर कुणी ही अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यास न्यायालयात दाद मागता येते.हक्क रक्षणासाठी उच्च व सर्वोच्च न्यायालयात पाच प्रकारचे अर्ज दाखल करता येतात.

a) **बंदीप्रत्यक्षीकरण-** एखादया व्यक्तीला बेकायदेशीररीत्या अटक केलेली असेल तर त्या व्यक्तीला वा तिच्या मित्र व नातेवाईकाना हा अर्ज करता येतो.अर्ज मान्य झाल्यास अटक केलेल्या व्यक्तीला न्यायालयासमोर हजर केले जाते.अटक करणाऱ्याला अटकेची कारणे द्यावी लागतात.ती कारणे अयोग्य वाटल्यास न्यायालय संबंधित व्यक्तीची सुटका करू शकते याचा अर्थ सरकार कुणालाही कारणाशिवाय अटक करू शकत नाही.

b) **परमादेश** - एखादया व्यक्तीवर अन्याय झाल्यास अन्याय दूर करण्यासाठी परमादेश अर्जाचा उपयोग करता येतो.उदा.एखादया कारखान्यात अपघात झाल्यास कंपनी कायदयानुसार मालक नुकसानभरपाई देण्यास टाळाटाळ करत असेल तर या अर्जाचा वापर करता येतो.न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास संबंधित व्यक्तीवरील अन्याय दूर करण्याचा आदेश न्यायालय देत असते.

c) **अधिकारपृच्छा** - कोणतेही सरकारी वा सार्वजनिक पद पात्रता नसतांना एखादी व्यक्ती भूषवित असेल आणि ते पद कायमस्वरूपी असेल. त्या पदाशी आपले हितसंबंध गुंतलेले असतील तर न्यायालयात हा अर्ज करता येतो.न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास अपात्र व्यक्तीस पद सोडण्याचा आदेश न्यायालय देते.

d) **प्रतिषेध** - एखादा खटला कनिष्ठ न्यायालयात सुरू असेल तो खटला चालविण्याचा कनिष्ठ न्यायालयास अधिकार नसेल वा त्या न्यायालयाकडून निर्णय घेणे योग्य वाटत नसेल तर हा अर्ज करता येतो.वरिष्ठ न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास कनिष्ठ न्यायालयाताल खटल्याचे कामकाज ताबडतोब थांबविले जावे असा आदेश वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयास देते.

e) **उत्पेक्षण** - कनिष्ठ न्यायालयात चालत असलेला खटला वरिष्ठ न्यायालयात चालवावा अशी विनंती करणाऱ्या अर्जास उत्पेक्षण असे म्हणतात.हा अर्ज मान्य झाल्यास वरिष्ठ न्यायालय खटल्याशी संबंधित सर्व कागदपत्र आपल्या ताब्यात घेऊन स्वतः निर्णय देते त्यास उत्पेक्षण म्हणतात.

**टिप-मूलभूत हक्कांचे मूल्यमापन वा परीक्षण** -

भारतीय राज्यघटनेत समाविष्ट मूलभूत हक्कांवर अनेक विचारवंतानी पुढील टीका केलेल्या दिसतात.

१. **खऱ्या मूलभूत हक्कांचा समावेश नाही** - हक्कांच्या यादीत शिक्षणाचा हक्क, रोजगाराचा हक्क इ.सारख्या महत्वपूर्ण हक्कांचा समावेश केलेला नाही.वास्तविक रोजगाराच्या हक्काबद्दल अनेकदा चर्चा होऊन ही हा हक्क घटनेत समाविष्ट केलेला नाही त्यामुळे हक्कांची यादी अपुरी वाटते.

२. **हक्कांवर मर्यादा अधिक** - घटनाकारानी हक्कांवर प्रचंड मर्यादा टाकलेल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणाला मूलभूत हक्क ऐवजी हक्कांवरील मर्यादा हे नांव द्यावे ही टीका केली जाते.उदा. भाषण स्वातंत्र्यावर राज्याची कायदा व सुव्यवस्था, व्यक्तीचे चारित्र्यहनन, अंर्तगत सुरक्षा व परराष्ट्र संबंधाला धोका इ. कारणावरून मर्यादा लादता येतात. या प्रचंड मर्यादांमुळे हक्कांचा पूर्ण उपभोग नागरिकांना घेता येणार नाही.

**३. आणाबाणीच्या काळात हक्क स्थगित -** आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्क स्थगित केले जातात.कारण आणीबाणीच्या काळात हक्क संरक्षणासाठी न्यायालयात जाता येत नाही याचा अर्थ आणीबाणी काळात सरकारची दडपशाही जनतेला निमूटपणे सहन करावी लागते.

**४. संदिग्ध वाक्यरचना -** मूलभूत हक्कांच्या यादीत अनेक शब्दप्रयोग संदिग्ध स्वरूपाचे आहेत.सरकार या शब्दाचा आपल्या सोयीनुसार अर्थ लावू शकते.उदा.सार्वजनिक कल्याण, राष्ट्रहित इ. च्या नावावर सरकारने घटनादुरूस्त्या करून हक्क कमी केलेले आहेत.

**५. मार्गदर्शक तत्वे श्रेष्ठ -** सुरूवातीला मूलभूत हक्क श्रेष्ठ आणि मार्गदर्शक तत्वे दुय्यम मानली जात असत पण नंतरच्याकाळात सरकारने घटनादुरूस्त्या करून हक्कांपेक्षा मार्गदर्शक तत्वांना श्रेष्ठ स्थान दिल्यामुळे हक्काचे महत्व कमी झाले.

अशा प्रकारच्या वरील मर्यादा मूलभूत हक्कांत दिसून येतात.

**टिप-मूलभूत कर्तव्ये-** हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. हक्कांइतकेच कर्तव्यांना महत्व स्थान असते. नागरिकांमध्ये कर्तव्याची भावना अस्तित्वात नसेल तर हक्काचा उपभोग घेताच येणार नाही. कर्तव्याविना अधिकार म्हणजे अराजकतेला निमंत्रण ठरेल तर अधिकाराविना कर्तव्य म्हणजे गुलामगिरी ठरेल म्हणून घटनेत हक्क आणि कर्तव्य दोन्ही समावेश करणे आवश्यक असते. मूळ घटनेत मूलभूत कर्तव्याचा समावेश नव्हता. हक्काबरोबर कर्तव्य गृहित धरलेली होती पण स्वातंत्र्योत्तर काळात लोक कर्तव्य विसरले सर्वत्र हक्कांचा उदोउदो केला गेला. कर्तव्याप्रति उदासिनतेमुळे राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण इत्यादीकडे दुर्लक्ष झाले. रशिया आणि साम्यवादी देशाच्या राज्यघटनेमध्ये कर्तव्याचा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे तोच आदर्श लक्षात घेऊनभारत सरकारने १९७६ मध्ये ४२ वी घटनादुरूस्ती करून ४ अ हा नवा विभाग निर्माण करून ५१ (अ) कलमांत १० मूलभूत कर्तव्याचा समावेश केला.

कर्तव्य म्हणजे सामाजिक स्वास्थ्याच्या संरक्षणासाठी व्यक्तीकडून अपेक्षित केल्या जाणाऱ्या कृतींना कर्तव्य असे म्हणतात. कर्तव्य ही सामाजिक, नैतिक, आर्थिक, सार्वजनिक, कायदेशीर इत्यादी विविध प्रकारची असतात. या कर्तव्यपालनातून नागरिकांमध्ये जबाबदारी वा उत्तरदायित्वाची भावना विकसित करता येते. भारताच्या विकासासाठी जनतेत एकता, उत्तरदायित्व आणि सहकार्याची वृद्धी होणे आवश्यक असल्यामुळे कर्तव्याचा समावेश घटनेत करण्यात आला. भारतीय राज्यघटनेत समाविष्ट कर्तव्य पुढीलप्रमाणे होत.

**१.** राज्यघटनेचे पालन करून व तिच्यातील आदर्शांचा, भारतीय राष्ट्रगीताचा आणि राष्ट्रध्वजाचा सन्मान करणे.

**२.** स्वातंत्र्य लढयास प्रेरक ठरलेल्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्यांचे अनुकरण करणे

**३.** भारताचे सार्वभौमत्व, ऐक्य आणि एकात्मता वृद्धिंगत करून त्यांचे संरक्षण करणे

**४.** राष्ट्रांचे संरक्षण करणे आणि गरजेनुरूप राष्ट्रीय सेवा करण्यास तयार राहणे.

**५.** भारतात वर्गरहित आणि भेदाभेदरहित बंधुत्वाची भावना तयार करणे आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधक प्रथा नष्ट करणे.

**६.** आपल्या देशातील एकात्म संस्कृती आणि गौरवशाली परंपरेचे रक्षण करणे.

**७.** जंगले, सरावरे, नद्या, पशूपक्षी या नैसगिक संपत्तीचे रक्षण करणे व सजीव प्राण्यांबद्दल भूतदया दाखविणे.

**८.** शास्त्रीय प्रवृत्ती, मानवतावाद, शोधक बुद्धी व सुधारक वृत्तीचा विकास करणे.

**९.** सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचारापासून दूर राहणे.

**१०.** राष्ट्र सतत प्रगतीशील राहील या दृष्टीने व्यक्तीगत आणि सामुदायिक क्षेत्रात कठोर प्रयत्न करणे.

**टिप-मूलभूत कर्तव्याचे मूल्यमापन वा परीक्षण-** मूळ राज्यघटनेत मूलभूत कर्तव्याचा समावेश नव्हता नंतरच्या काळात घटनादुरूस्ती करून कर्तव्याचा समावेश केला गेला. सरकारच्या या कृतीविषयी अनेक अभ्यासकांनी नापसंती दर्शविली. कर्तव्याच्या समावेशामुळे अनेक गंभीर स्वरूपाचे प्रश्न निर्माण झाल्याचे अभ्यासकांनी नमूद केलेले आहे.

१. भारतीय राज्यघटनेत कर्तव्यांची यादी सर्वसमावेशक स्वरूपाची नाही. मतदान, साक्षरता प्रसार, दारूबंदीसारख्या महत्त्वपूर्ण कर्तव्याचा समावेश केलेला नाही. समाविष्ट कर्तव्याच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट सूचना दिलेल्या नाहीत. या कर्तव्याची अंमलबजावणी कशी करावी हा संभ्रम निर्माण होता.

२. नागरिकांच्या वर्तणुकीवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी कायदे करण्याचाअधिकार राज्यघटनेने शासनाला दिलेला असताना कर्तव्याचा घटनेत समावेश शासनाने काय साध्य करण्याचा प्रयत्न केला हा प्रश्न निर्माण होता. घटनेतील कर्तव्याच्या समावेशाने त्यांचे पालन घडेल का? हा ही प्रश्न निर्माण होता.

३. मूलभूत कर्तव्यांत समाविष्ठ अनेक कर्तव्य संदिग्ध वा मोघम स्वरूपाची वाटतात. उदा. मानवतावाद, शोधक बुद्धी असे शब्द वापरलेले आहेत. या शब्दाचा सरकार आपल्या सोईनुसार अर्थ लावू शकते. कर्तव्यपालनाच्या सक्तीतून सरकार आपली हुकूमशाही प्रस्थापित करू शकते.
४. भारतीय राज्यघटनेत समाविष्ठ मूलभूत कर्तव्यांना कायदेशीर स्वरूप नाही. कर्तव्याचा भंग केल्यास कोणती शिक्षा दिली जाईल याबाबत सविस्तर नियमाची निर्मिती न केल्यामुळे कर्तव्य हा एक प्रकारचे नैतिक आदेश ठरतील.
५. आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्क स्थगित होतात तर मूलभूत कर्तव्य देखील स्थगित होतील का? या प्रश्नाचे उत्तर घटनेत दिलेले नाही. अधिकाराच्या अनुपस्थित राज्याने कर्तव्याचे पालन करण्यास बंधनकारक केले तर नागरिकांना गुलामशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहणार नाही. मार्गदर्शक तत्त्वांना शासन देत असल्यामुळे आधीच मूलभूत अधिकाराचा संकोच झालेला होता आणि त्यात कर्तव्याचा समावेश केल्यामुळे हक्कांना नष्टच करण्याचा प्रयत्न सरकारने चालविलेला दिसतो.
६. नागरिकांच्या कर्तव्यासोबत राज्याची कर्तव्य देखील विशद करणे गरजेचे असते. परंतु भारतीय राज्यघटनेत फक्त नागरिकांच्या कर्तव्याचा समावेश आहे. कर्तव्य पालनासाठी योग्य वातावरण निर्माण करण्याची अंतिम जबाबदारी शासनाची असते हे लक्षात घेतले गेले नाही.

भारतीय राज्यघटनेत मूलभूत कर्तव्याच्या समावेशनावरूनअनेक गंभीर स्वरूपाचे आक्षेप अभ्यासकांनी नोंदविलेले असले तरी कर्तव्याच्या समावेशाची आवश्यकता होती असे अनेक विचारवंतांना वाटते. हक्काचा उपभोगासाठी कर्तव्य पालन आवश्यक असते. आपल्याला जसे अधिकार असतात तसे आपल्यासारख्या असलेल्या इतर व्यक्तींना देखील अधिकार असतात. आपण अधिकार उपभोगताना इतराकडून कर्तव्यपालनाची अपेक्षा करता तशीच इतर देखील आपल्याकडून कर्तव्यपालनाची अपेक्षा करतात या अर्थाने हक्कांसोबत कर्तव्याची गरज असते. रशिया, पोलंड, चीन व इतर समाजवादी देशांमध्ये कर्तव्याची घटनेत समावेश असल्यामुळे त्या देशांनी अल्पकाळात आपली प्रगती केली. कर्तव्याच्या जोरावर शिस्त निर्माण केली. आपल्या देशातील राज्यकर्त्यावर्गाने राष्ट्रविकास आणि शिस्तीच्या हेतूने उशीर का होईना कर्तव्याचा समावेश करून घटनेतील एक उणीव कमी केली. कर्तव्य हे शेवटी मूलभूत अधिकारांना पूरक असतात. कर्तव्याच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता, शिस्त, सहकार्य आणि बंधुभाव निर्माण करता येतो. फक्त ज्या परिस्थितीत आणि काळात कर्तव्याचा समावेश केला गेला तो काळ आणि परिस्थिती योग्य नव्हती म्हणून त्यांचा दोष कर्तव्यावर देता येणार नाही.

**टिप- मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्य परस्परसंबंध आणि भेद -** हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. व्यक्ती कल्याणासाठी मूलभूत अधिकाराची नितांत गरज असते तर राज्य कल्याणासाठी कर्तव्याची गरज असते. या परस्परगरजेतून हक्कआणि कर्तव्याचा विचार करणे गरजेचे असते. हक्क आणि कर्तव्य शेवटी राष्ट्रविकास, राष्ट्रहित आणि समाजविकासासाठी नागरिकांना बहाल केलेली आहेत. व्यक्तीच्या आंतरिक आणि बाह्य विकासासाठी व्यक्ती राज्याकडे मागण्या करत असते त्या मागणीला राज्य आणि समाजाने संमती दिली तर त्या मागणीचे हक्कांत रूपांतर होते याचा अर्थ व्यक्तीची मागणी समाज वा राज्य उपयुक्त असेत तर वैधानिक मान्यता प्रदान केली जाते. त्यामुळे व्यक्तीला मिळालेले अधिकार हे समाज आणि राज्य व्यवस्थेशी संसुगतअसतात. म्हणून अधिकाराचा उपभोग घेताना व्यक्तीने समाज आणि राज्याशी संसुगत वर्तन केले पाहिजे अशी अपेक्षा केली जाते त्याला आपण राज्यशास्त्रात कर्तव्यपालन असे म्हणतो. समाजाचा सदस्य या नात्याने व्यक्तीला मिळालेले अधिकार समाजाच्या संरचनेला धोका होणार नाही या अटीवर मिळालेले असतात. आपल्या अधिकाराना इतरांनी मान्यता प्रदान करावी ही अपेक्षा करतो तेव्हा इतराच्या अधिकारांना आपण मान्यता प्रदान करणे म्हणजे कर्तव्याचे पालन करणे असे मानले जाते. समाज वा राज्य व्यवस्थेतील समतोल आणि समन्वय टिकवून ठेवण्यासाठी हक्कांसोबत कर्तव्याची देखील आवश्यकता असते. नागरिक ज्याप्रमाणे राज्याकडून अधिकाराची आणि अधिकाराच्या उपभोगास योग्य वातावरणाची अपेक्षा करतात त्याप्रमाणे राज्य देखील सामाजिक सुव्यवस्था, राजकीय एकता, शिस्त आणि राष्ट्रीय विकासासाठी नागरिकांकडून कर्तव्य पालनाची अपेक्षा करतो. प्रा. लास्कीसारख्या विचारवंत मानतो की, "हक्कांच्या संरक्षणासाठी कर्तव्याचे पालन करणे आवश्यक असते. हक्कांचा उपभोग घेताना दुसऱ्या व्यक्तीच्या हक्कांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असते. हक्कांचा उदोउदो करून समाजविकास साध्य होणार नाही. हक्कांसोबत कर्तव्याच्या पालन करणाऱ्यांना अधिकार उपभोगण्याचा नैतिक अधिकार प्राप्त होतो."

राज्यघटनेत समाविष्ठ मूलभूत हक्काचे स्वरूप कायदेशीर आहे. हक्कांची पायमल्ली वा उल्लंघन केल्यास शिक्षेची तरतूद केलेली आहे. उदा. अस्पृश्यता पाळणे कायदयाने गुन्हा मानला जातो. मात्र मूलभूत कर्तव्यांना कायदेशीर संरक्षण घटनेने उपलब्ध करून दिलेले नाही. मूलभूत कर्तव्याचा भंग केल्यास कायदेशीर कार्रवाई करण्यास अडचणी उद्‌भवतात अर्थात संसदेला कायदा करून कर्तव्य भंगाबाबत शिक्षा करण्याचा अधिकार आहे. उदा. राष्ट्रध्वज

फडकाविण्याचे नियम संसदेने केलेले आहेत. मूलभूत हक्काबाबतची घटनेत वापरलेली भाषा सुस्पष्ट व आदेशयुक्त असून शासनावर बंधनकारक आहे तर मूलभूत कर्तव्याबाबतची भाषा संदिग्ध व नैतिक स्वरूपाची आहे. अशा प्रकारे मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्यामध्ये काही मुद्यांवरून फरक आढळून येतो.

हक्क आणि कर्तव्य परस्परसंबंधित वा परस्परपूरक असल्याचे उपरोक्त चर्चेवरून स्पष्ट होते. परंतु कर्तव्यामुळे हक्क संकुचित होतात असाही दृष्टीकोन मांडला जातो. कर्तव्याचा समावेश असलेल्या बहुसंख्य देशात नागरिकांच्या हक्कांची उपेक्षा केली गेली. कर्तव्यपालनाच्या माध्यमातून गुलामगिरी निर्माण करण्याचा प्रयत्न अनेक देशात झालेला दिसतो तसेच भारतात देखील आणीबाणीच्या काळात कर्तव्याच्या समावेशामुळे राज्यकर्त्यांच्या हेतूबद्दल शंका व्यक्त केल्या गेल्या. या पार्श्वभूमीवर कर्तव्यामुळे हक्क संकुचित होतात ही शंका एका अर्थाने रास्त वाटते. हक्क आणि कर्तव्य याचा समावेश समाज आणि राष्ट्रविकासासाठी घटनेत केलेला आहे. त्यांचा राज्यकर्त्यांवर्गांकडून कसा वापर केला जाईल याबद्दल भाकित करणे कठीण काम आहे असे असले तरी लोकशाही प्रधान देशात कर्तव्यपालनाची सक्ती करताना येणार नाही हे देखील तेवढेच खरे आहे. भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात स्व-इच्छेने कर्तव्य पालनासाठी पुढे येणारे नागरिक असल्यामुळे कर्तव्यपालनातून गुलामगिरी वा हुकूमशाही निर्माण होण्याऐवजी मूलभूत हक्काच्या अंमलबजावणीसाठी पूरक वातावरण निर्माण होण्यास साह्य प्राप्त होते. शेवटी असेच म्हणावे लागेल की नुसत्या अधिकाराच्या माध्यमातून समाजविकासाचे स्वप्न पूर्ण होणार नाही तर त्याला कर्तव्याची जोड द्यावी लागेल. म्हणून भारतीय राज्यकर्त्यांनी हक्क आणि कर्तव्याचा समावेश करून राज्यघटनेत संतुलन वा समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

**प्र.२ रा. भारतीय राज्यघटनेतील राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वाची उगमस्थाने सांगा.**

**किंवा**

**मार्गदर्शक तत्त्वांची उगमस्थाने, प्रकार व वर्गीकरण सांगा?**

घटनेच्या चौथ्या प्रकरणात ३६ ते ५१ कलमामध्ये मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे घटनेच्या सरनाम्यातील तत्त्वज्ञानातून व्यक्त होतात त्यामुळे त्यांचा एकत्रित विचार करावा लागतो. कारण मूलभूत अधिकाराच्या माध्यमातून राजकीय लोकशाहीची प्रस्थापना करता येते. मार्गदर्शक तत्त्वाच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक लोकशाहीची प्रस्थापना करता येऊ शकते. मार्गदर्शक तत्त्वाच्या समावेशाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात की, "आदर्श आर्थिक लोकशाही कशी स्थापन करता येईल याची कल्पना देण्याकरिता मार्गदर्शक तत्त्वाचा घटनेत समावेश केलेला आहे. कारण आम्हाला फक्त प्रौढ मताधिकाराने युक्त राजकीय लोकशाही स्थापन करावयाची नव्हती तर तिला आर्थिक लोकशाहीची जोड उपलब्ध करून द्यायची होती." भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप नैतिक स्वरूपाचे आहे. भारतात न्यायपूर्ण आणि कल्याणकारी समाजारचना तयार करण्याच्या दृष्टीकोनातून या तत्त्वांचा उपभोग होऊ शकतो म्हणून सरकारने धोरण ठरविताना वा निर्णय घेतांना या तत्वांचा विचार करावा ही घटनाकाराची अपेक्षा होती. मूलभूत हक्काप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांना न्यायालयाचे संरक्षण नसल्यामुळे ही तत्वे शिफारस वा सल्लादायी स्वरूपाची आहेत. या तत्त्वांना कायदयाचे पाठबळ नसले तरी कोणतेही सरकार या तत्त्वांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. या तत्त्वांद्वारे भारतात सामाजिक व आर्थिक लोकशाही निर्माण करता येऊ शकेल तसेच राष्ट्रहितासाठी ही तत्वे आवश्यक आहेत. याबाबत प्रख्यात घटना तज्ञ ग्रॅनव्हिले ऑस्टिन मार्गदर्शक तत्त्वातील घटनेतील समावेशाबाबत सांगतात की, "भारतीय घटना हा सामाजिक दस्ताऐवज आहे. कारण घटनेतील बहुसंख्य तरतूदीचा समावेश सामाजिक क्रांतीस पूरक वातावरण निर्मिती करणे हा आहे. घटनेच्या तिसऱ्या आणि चौथ्या प्रकरणातील मार्गदर्शक तत्त्वांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीच्या भावनेचे दर्शन होते. म्हणजे एका अर्थाने मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे ही घटनेची सद्सद्विवेक मानली पाहिजे." भविष्यकालीन काळात कायदेमंडळ आणि कार्यकारीमंडळाने आपली सत्ता कशा पद्धतीने राबवावी यासंबंधीचे मार्गदर्शन करण्यासाठी वा सल्ला देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचा घटनेत समावेश केलेला आहे. ही तत्त्वे पवित्र घोषणा किंवा आश्वासने नाहीत भविष्यकाळात राज्यकर्त्यांवर्गाने अंमलात आणावयाचा कार्यक्रम आहे. म्हणून मार्गदर्शक तत्त्वांच्या पाठीमागे कोणत्याही प्रकारचे कायदेशीर कवच नसले तरी त्यांच्या अंमलबजावणीकडे कोणतेही सरकार दुर्लक्ष करू शकत नाही. कारण सरकारच्या कामगिरीचे मूल्यमापन मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीवरून केले जाते. मार्गदर्शक तत्त्वे ही भारतीय राज्यघटनेतील अभिनव स्वरूपाची वैशिष्टये मानले जाते.

**टिप-मार्गदर्शक तत्वांची उगमस्थाने वा आधार-** भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश आकस्मिक घटना वा कारणातून झाला नसून त्यांच्या समावेशनासाठी अनेक गोष्टी कारणीभूत मानला जातात. राज्यघटना निर्माण होत असताना घडलेल्या विविध घटना आणि तत्त्कालीन काळातील काही जगमान्य तत्त्वे याच्या प्रभावातून मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश झालेला आहे. मार्गदर्शक तत्त्वांची उगमस्थाने पुढील प्रमाणे सांगता येतात.

१. **आयरिश घटनाचा प्रभाव-** भारतीय घटनाकारांनी आयरिश घटनेतून मार्गदर्शक तत्त्वांची संकल्पना घेतलेली आहे. आयरिश घटनेने फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन वसाहतीच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा, स्पेनचे प्रजासत्ताकाच्या घटनेतून ही संकल्पना स्वीकारलेली आहे. याशिवाय चीन, युगोस्लाव्हिया आणि जर्मनीच्या वायमर प्रजासत्ताकाच्या घटनेचा देखील प्रभाव दिसून येतो.

२. **१९३५ च्या कायदयाचा प्रभाव-** १९३५ च्या भारत प्रशासन कायदयात कायदयाला एक सूचनापत्र जोडले होते. त्यात गव्हर्नर जनरल व गव्हर्नर यांनी कशा प्रकारे राज्यकारभार करावा याबाबत सूचना दिलेल्या होत्या. मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप देखील सूचनापत्रासारखे आहे. त्या सूचनापत्राचा विचार मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करताना घटनाकारांनी केलेला आहे.

३. **मानवी हक्क सनद-** भारतीय घटना तयार होत असतांना युनोत मानवी हक्कांबद्दल चर्चा सुरू होती. मानवी अधिकाराची सनद तयार करताना राजकीय अधिकारासोबत सामाजिक व आर्थिक अधिकाराची सुद्धा जागतिक पातळीवर चर्चा सुरू होती. घटना निर्मितीच्या कालखंडातच (१० डिसेंबर १९४८) मानवी हक्कांचा जाहीरनामा युनोने घोषित केला. या सनदेतील मानवी हक्कांचे प्रतिबिंब काही प्रमाणात मार्गदर्शक तत्त्वावर पडलेले आढळते.

४. **गांधीवादाचा प्रभाव-** भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात १९२० ते १९४७ हा गांधीयुगाचा कालखंड मानला जातो. या युगात गांधीजींनी अनेक तत्त्वांचा राष्ट्रीय चळवळीत वापर केला. गांधींनी राजकारणासोबत विधायक कार्याला देखील तेवढेच महत्त्व दिल्यामुळे गांधीवादाच्या प्रभावातून गोहत्या बंदी, ग्रामपंचायती स्थापना, कुटिरोद्योग, दारूबंदी तत्त्वांचा समोवश घटनेत झालेला दिसतो.

५. **समाजवादी विचाराचा प्रभाव-** भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात कार्यरत प्रमुख नेत्यांवर समाजवादी विचाराचा फार मोठा पगडा राहिलेला होता. सिडने आणि बिट्राइस वेब, फेबियन समाजवाद, लोकशाही समाजवाद, श्रेणी समाजवाद इत्यादी समाजवादी विचारधाराचा मार्गदर्शक तत्त्वांच्या निर्मितीवर प्रभाव पडलेला दिसतो. भारताच्या मूळ राज्यघटनेच्या सरनाम्यात समाजवाद शब्दाचा उल्लेख नसला तरी मार्गदर्शक तत्त्वांत समाजवादाला अनुकूल असलेल्या अनेक ध्येयधोरणाचा समावेश घटनेत दिसतो. आयव्हर जेनिंग्ज सांगतात की, 'मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकरणातील शब्दाशब्दामधुन सिडने आणि बिटाइस वेब या फेबिनय समाजवादयाचे भूत डोकावताना दिसते.'

**टिप-मार्गदर्शक तत्त्वाचे महत्त्व आणि स्वरूप-** भारतीय घटनाकारांना लोकशाही शासनपद्धतीच्या अंतर्गत समाजवादी समाजरचना प्रस्थापित करावयाची होती. त्यासाठी आवश्यक तत्त्वांचा समावेश करण्यासाठी घटनेत नीतिदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आला. या तत्त्वांच्या माध्यमातून समाजवादाशी निगडित न्याय, समता आणि बंधुता ह्याची जोपासना करणे शक्य होईल. या तत्त्वांचे महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी ४२ व्या घटनादुरूस्तीने मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी केलेला कायदा मूलभूत हक्कांशी विसंगत आहे या आधारावर रद्द करता येणार नाही हा बदल करण्यात आला. डॉ. पायलीसारखे अभ्यासक मार्गदर्शक तत्त्वांना अनुदेश पत्र मानतात. त्यांचे पालन राज्याकडून झालेच पाहिजे हा आग्रह धरतात. या तत्त्वांचे पालन बंधनकारक स्वरूपाचे नसेल तरी सरकारच्या कामगिरीचे मूल्यमापन करणारे निकष या अर्थाने जनतेच्या पाहत असते. त्याच आधारावर जनता निवडणुकीत मतदान करत असते. या अर्थाने मार्गदर्शक तत्त्वाचे अंमलबजावणी करणे शासनाची जबाबदारी ठरते. मार्गदर्शक तत्त्वाचे महत्त्व पुढील मुद्याद्वारे स्पष्ट करता येते.

१. **नैतिक स्वरूप-** मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप नैतिक व आदर्श स्वरूपाचे आहे. मूलभूत हक्काप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे ही न्यायप्रविष्ठ नाहीत. ही तत्त्वे न्यायप्रविष्ठ नाहीत म्हणून निरर्थक वा निरूपयोगी आहेत असे म्हणता येत नाही. आदर्श व नैतिक समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने या तत्त्वांचा समावेश झालेला आहे. उच्च दर्जाची नैतिक संस्कृती निर्माण करण्यासाठी ही तत्त्वे उपयुक्त आहेत.

२. **कल्याणकारी राज्याची स्थापना-** आधुनिक काळात कल्याणकारी राज्याची संकल्पना सर्वत्र मान्य झालेली आहे. कल्याणकारी राज्याच्या स्थापनेस अनुकूल अशी अनेक तत्त्वे मार्गदर्शक तत्त्वात समाविष्ठ आहेत. उदा. अपंगत्व, वृद्धत्व, बरोजगार इत्यादी काळात सरकारी मदत मार्गदर्शक तत्त्वाच्या माध्यमातून कल्याणकारी राज्याचा पाया अधिक विस्तृत करता येऊ शकतो. सर्वसामान्य जनतेला अपेक्षित राज्यकारभार करण्यासाठी ही तत्त्वे उपयुक्त मानली जातात.

३. **कायदयाचा अर्थ लावण्यास उपयुक्त-** मार्गदर्शक तत्त्वे न्यायप्रविष्ठ नाहीत हे जरी खरे असले तरी न्यायाधीशाना घटनेतील कायदयाचा अर्थ लावावा लागतो. ही तत्त्वे राज्याच्या धोरणाला मार्गदर्शन करणारी तत्त्वे असल्यामुळे राज्यकर्त्यांकडून धोरण आखणी करताना मार्गदर्शक तत्त्वाचा आधार घेतला जातो. त्यामुळे न्यायाधीशाना देखील कायदयाचा अर्थ स्पष्ट करण्यास ही तत्त्वे सहाय्य ठरत असतात. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अनेक खटल्याचा

निकाल देताना मार्गदर्शक तत्त्वांचा आधार घेतलेला आहे. उदा. गोपालन विरूद्ध मद्रास राज्य खटल्याचा निकाल देताना ही तत्त्वे प्रकाशस्तंभासारखी आहेत म्हणून कायदयाचा अर्थ लावताना न्यायाधीशाचे लक्ष ह्या तत्त्वाकडे आकर्षिल जाते असे मत न्यायामूती सेटलवाड यांनी व्यक्त केलेले आहे.

४. **लोकमताचे प्रतिबिंब-** भारतीय राज्यघटनेत समाविष्ठ मार्गदर्शक तत्त्वांच्या माध्यमातून जनतेच्या आशा, आकांक्षा, ध्येय, मूल्य, संस्कृती, रूढी व परंपरा इत्यादीचा विचार केलेला आहे. या तत्त्वांचा खरा आधार लोकमत आहे. लोकनियुक्त सरकारने ह्या तत्त्वांकडे दुर्लक्ष केल्यास लोकमताच्या रोषाला त्यांना सामोरे जावे लागेल. लोकमताचे प्रतिबिंब ह्या तत्त्वामध्ये असल्यामुळे त्यांची अंमलबजावणी सरकारला करावीच लागते.

५. **सरकारच्या कामकाजाचे मूल्यमापन-** मार्गदर्शक तत्त्वाच्या माध्यमातून सरकारच्या कामकाजाचे मूल्यमापन जनता करत असते. ही तत्त्वे सरकारने कोणत्या पद्धती कामकाज करावी याबाबत सल्ला देत असतात. त्या सल्ल्यानुसार राज्यकारभार केल्यास जनतेचा अपेक्षित पाठिंबा मिळू शकतो. सरकारने जनप्रतिबिंबाचे अस्तित्व असलेल्या ह्या तत्त्वांकडे दुर्लक्ष केल्यास जनता देखील पुढील निवडणुकीत सत्तेवरून दूर करू शकते. ही तत्त्वे शेवटी सरकारच्या कामकाजाचे मूल्यमापन करणारी मोजपट्टी आहे.

६. **उदारमतवादी राज्यघटनेचे प्रतिक-** भारतीय राज्यघटनेत राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश केल्यामुळे भारतीय राज्यघटना उदारमतवादी राज्यघटना बनली आहे असे के. सी. व्हीअर यांनी मत व्यक्त केलेले आहे. उदारमतवादाशी संबंधित अनेक तत्त्वांचा समावेश मार्गदर्शक तत्त्वात केलेला आहे. भारतीय सरनाम्याने अपेक्षित केलेली भविष्यकालीन मूल्यव्यवस्थेच्या अंमलबजावणीच्या अनुकूल असलेल्या ध्येयधोरणाचा समावेश ह्या तत्त्वात आहे.

अशा प्रकारे मार्गदर्शक तत्त्वाचे महत्त्व व स्वरूप स्पष्ट करता येते.

**प्र. ३ रा. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करा.**

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात ३६ ते ५१ कलमात क्रमवार दिलेली आहेत. या तत्त्वांचे वर्गीकरण केलेले नाही. डॉ. एम.पी. शर्मासारख्या अभ्यासकाने समाजवादी तत्त्वे, गांधीवादी तत्त्वे, उदारमतवादी तत्त्वे आणि आंतरराष्ट्रीय तत्त्वे ह्या चार भागात मार्गदर्शक तत्त्वाचे वर्गीकरण केलेले आहे. परंतु हे वर्गीकरण देखील शास्त्रशुद्ध स्वरूपाचे नाही. म्हणून काही अभ्यासकांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय आणि ४२ व्या घटनादुरूस्तीने समाविष्ठ तत्त्वे असे वर्गीकरण केलेले आहे. हे वर्गीकरण अनेक विचारवंताना अभ्यासाच्या दृष्टीने सोयीस्कर आणि सुटसुटीत आहे असे वाटते.

**अ.आर्थिक तत्वे-** घटनेच्या ३९, ४१, ४२, ४३ आणि ४८ कलमात आर्थिक बाबींशी संबंधित मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. या तत्त्वांच्या माध्यमातून आर्थिक समता व लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न घटनाकारांनी केलेला दिसतो.

**१. कलम ३९ नुसार-** स्त्री व पुरूष दोघांनाही उपजीविकेची साधने मिळण्याचा समान अधिकार असावा, स्त्री व पुरूषांना समान कामासाठी समान वेतन मिळावे, समाजातील सर्व लोकांचे अधिकतम कल्याण साधता येईल अशा प्रकारे समाजातील भौतिक साधनसंपत्तीची मालकी व त्यावरील नियंत्रणाचे वाटप करावे, सामान्य जनतेच्या हितसंबंधाना बाद्या आणणारी आणि उत्पादन साधनाचे केंद्रीकरण करणारी अर्थव्यवस्था नसावी, स्त्री व पुरूष कामगारांची प्रकृती व कुवत पाहून काम द्यावे, बालपण व तारूण्याचे आर्थिक व भौतिक पिळवणूकीपासून रक्षण करावे.

**२. कलम ४१ नुसार-** राज्य अपल्या आर्थिक क्षमतेनुसार सर्वांना रोजगार, शिक्षण देण्याचा प्रयत्न करील आणि बेकारी, वृद्धत्व, आजारपण यांपासून संरक्षण देण्यासाठी सरकारी मदत देईल.

**३. कलम ४२ नुसार-** कामधंदा व व्यवसायाबाबत न्याय व माणुसकीचे वातावरण तयार करावे तसेच स्त्रियांना प्रसूतीसाठी सवलत व सहाय्य द्यावे.

**४. कलम ४३ नुसार-** शेती व औदयागिक क्षेत्रातील कामगांराना निश्चित रोजगार, योग्य वेतन, विश्रांती, निर्वाह वेतन दयावे, ग्रामीणभागात सरकारी तत्त्वांवर ग्राम व कुटीर उदयोग वाढविण्याचा प्रयत्न सरकारने करावे.

**५. कलम ४८नुसार-** आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने शेती व पशूपालन व्यवसायाचे संवर्धन करावे, दुभती व शेतीपयोगी जनावरांचे रक्षण करावे.त्यांच्या कतलीस राज्याने बंदी आणावी.

कलम ३९ मधील समाविष्ठ तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी मूलभूत हक्कांशी विसंगत असलेला कायदाची वैधता तपासण्याचा न्यायालयाचा अधिकार ४२ व्या घटनादुरूस्तीने काढून घेतलेला आहे. या कलमाला मूलभूत हक्कापेक्षा ही श्रेष्ठ स्थान देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

**ब. सामाजिक तत्वे-** घटनेच्या ४५, ४६, ४७ व ४९ व्या कलमात सामाजिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. समाजात सुधारणा व्हावी आणि सामाजिक लोकशाहीची प्रस्थापना होण्याच्या दृष्टीने आवश्यक तत्त्वाचा समावेश घटनेत केलेला आहे.

१. **कलम ४५ नुसार-** १४ वर्षाच्या आतील सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीने शिक्षण दयावे आणि ही योजना घटना अंमलात आल्यानंतर १० वर्षाच्या आत राबवावी.
२. **कलम ४६ नुसार-** समाजातील दुर्बल घटक म्हणजे अनुसूचित जाती व जमातीच्या शिक्षण व आर्थिक विकासासाठी राज्याने काळजी घ्यावी. त्यांचे सामाजिक अन्याय व पिळवणूकीपासून रक्षण करावे.
३. **कलम ४७ नुसार-** आहार, राहणीमान व सार्वजनिक आरोग्याचा दर्जा सुधारावा. अंमली पदार्थाच्या औषधाव्यतिरिक्त वापरावर बंदी लादावी.
४. **कलम ४९ नुसार-** राष्ट्रीय स्मारके, ऐतिहासिक स्थळे व वास्तूचे रक्षण करावे. त्याच्या संरक्षणसाठी संसदेने कायदे करावे.

**क. राजकिय तत्वे-** घटनेच्या ४०, ४४ आणि ५० कलमात राजकीय स्वरूपाची मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. भारत सरकार आणि घटक राज्य सरकारने राज्यकारभाराबाबत कोणत्या प्रकारची धोरणे स्वीकारावित याबद्दल मार्गदर्शन केलेले आहे. राजकीय तत्त्वे पुढीलप्रमाणे होत.

१. **कलम ४० नुसार-** स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रत्येक गावात ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात सरकार पुढाकार घेईल. पंचायतीना स्वतः कारभार पाहण्यास आवश्यक अधिकार देईल.
२. **कलम ४४ नुसार-** भारतातील जाती जमातीमधील विषमता व तणाव वाढू नये म्हणून भारताच्या सर्व नागरिकासाठी समान नागरी कायदा निर्माण करण्यासाठी सरकार प्रयत्न करेल.
३. **कलम ५० नुसार-** राजकीय सत्तेचे एकत्रीकरण टाळण्यासाठी न्यायमंडळ आणि कार्यकारीमंडळ यांना परस्परांपासून स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न करेल.

**ड. परराष्ट्रविषयक किंवा आंतरराष्ट्रीय तत्वे-** घटनेच्या ५१ व्या कलमात आंतरराष्ट्रीय तत्त्वांचा समावेश केलेला आहे. भारताने जगातील राष्ट्राशी परराष्ट्र संबंध प्रस्थापित करताना वा जागतिक राजकारणात वावरताना कोणत्या तत्त्वांना प्राधान्य दिले पाहिजे यासंबंधीचे मार्गदर्शक आंतरराष्ट्रीय तत्त्वात केलेले आहे. आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या तत्त्वात साधारणतः जागतिक शांतता हा मध्यवर्ती आशय लक्षात घेतलेला आहे.

१. आंतरराष्ट्रीय शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षितता कायम राखावी.
२. परस्परसहकार्य, आदर व न्यायाची आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थापना करावी.
३. राष्ट्रांनी आपसात वागतांना आंतरराष्ट्रीय कायदे व करार आणि संकेताचा आदर करावा.
४. आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे संघर्ष परस्परसामंजस्याने अथवा लवादामार्फत सोडविण्याचा प्रयत्न करावा.

**इ.४२ व्या घटनादुरूस्तीने समाविष्ट तत्वे-** ४२ व्या घटनादुरूस्तीने पुढील मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश घटनेत केलेला आहे.

१. **कलम ३९ (अ) नुसार-** आर्थिक दृष्टिकोनातून मागासवर्गीयांना कायदेविषयक मोफत सहाय्य करावे.
२. **कलम ३९ (क) नुसार-** बालकांची निरोगी वाढ व स्वातंत्र्यासाठी त्यांना आवश्यक संधी व सवलती द्याव्यात.
३. **कलम ४३ (अ) नुसार-** कोणत्याही उदयोगात गुंतलेल्या संस्था व संघटनेच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभाग द्यावा.
४. **कलम ४८ (अ) नुसार-** देशातील वने व वन्यप्राणी यांचे रक्षण करण्यासाठी राज्य प्रयत्न करेल.

अशा प्रकारे भारतीय राज्यघटनेत समाविष्ठ मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण सादर करता येते.

**टिप-मार्गदर्शक तत्त्वांचे मूल्यमापन, परीक्षण, दोष किंवा मर्यादा-** भारतीय राज्यघटनेत समाविष्ठ मार्गदर्शक तत्त्वावर अनेक अभ्यासकांनी आक्षेप घेतलेले आहे. ते आक्षेप पुढीलप्रमाणे होत.

१. **न्यायालयीन संरक्षण अभाव-** राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांना मूलभूत हक्काप्रमाणे न्यायालयीन संरक्षण नसल्यामुळे त्यांची अंमलबजावणी करणे न करणे शासनाच्या हातात आहे. ही तत्त्वे फक्त उपदेशवजा, नैतिक वा सल्लादायी स्वरूपाची आहेत. त्यांची अंमलबजावणी पूर्णपणे शासनाच्या मर्जीवर अवलंबून असलेली बाब आहे.
२. **आदर्शवादी स्वरूप-** भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे ही आदर्शवादी स्वरूपाची आहेत. त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे व्यवहारात अनेकदा अशक्य होते. उदा. भारत हा बहुधार्मिक देश असल्यामुळे अध्यात्मिक बाबींशी संबंधित कायदे धर्मावर आधारित आहेत ही गोष्टी माहित असून घटनाकारांनी मार्गदर्शक तत्त्वात समान

नागरी कायदयाचा आग्रह धरलेला आहे. समान नागरी कायदा आदर्शवत परिस्थिती योग्य वाटता पण प्रत्यक्षात तशी स्थिती भारतात अस्तित्वात नाही. ही तत्त्वे आदर्शवादी स्वरूपाची आहेत असे टीका केली जाते.

३. **तार्किकदृष्टया सुसंगतीचा अभाव-** भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये कोणत्याही प्रकारचा सुस्पष्टपणा आणि तार्किक सुसंगतीचा अभाव दिसून येतो. त्यांचे केलेले वर्गीकरण देखील शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले आढळत नाही. काही तत्त्वांची पुनरावृत्ती झालेली आढळते तसेच काही तत्त्वे तार्किकदृष्टया अव्यवहार्य वाटतात.

४. **सरकारवर बंधनकारक नाहीत-** आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रस्थापनाच्या दृष्टीने या तत्त्वाचा घटनेत समावेश केलेला आहे तर त्या तत्त्वांना कायदेशीर संरक्षण बहाल करणे गरजेचे होते जेणेकरून सरकारकडून त्यांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे केली जाईल. परंतु या तत्त्वांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नसल्यामुळे सरकारकडून दुर्लक्ष केले जाते त्यांचे समर्थन करताना जनतेकडून मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीचा आग्रह धरला जाईल त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करणे शक्य होणार नाही हा युक्तिवाद केला जातो. मात्र भारतासारख्या राजकीयदृष्टया मागासलेल्या, अशिक्षित व अडाणी मतदार असलेल्या देशात या तत्त्वांना जनमताचे समर्थन मिळेल असे मत व्यक्त करणे थोडे घाईचे वा धोक्याचे ठरेल.

५. **सार्वभौमत्वाला बाधक-** भारतीय राज्यघटनेने भारत सरकारला सार्वभौमत्वाचा अधिकार दिलेला असल्यामुळे ध्येयधोरणे आखण्याची अंतिम जबाबदारी शासनाची आहे. लोकनियुक्त सरकारने कोणत्या प्रकारची धोरण आखावी हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे त्याबाबत सल्ला देणे योग्य नाही म्हणून ही तत्त्वे अनावश्यक आहेत. घटनाकारांनी शासनाने भविष्यकाळात कोणत्या तत्त्वांच्या आधारावर राज्यकारभार करावा हा सल्ला वा उपदेश देऊन सार्वभौमत्वाच्या अधिकारावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला असे काही टीकाकारांना वाटते.

मार्गदर्शक तत्त्वावर वरील प्रकारच्या टीका होत असल्या तरी ती तत्त्वे निरर्थक वा कुचकामी स्वरूपाची नाहीत. कायदयाचे पाठबळ असले म्हणजे ती गोष्ट असते असे मानणे म्हणजे वैधानिक अधिकारापुरता अधिकार संकल्पनेचा विचार करण्यासारखे आहे. अधिकार हे शेवटी सामाजिक, ऐतिहासिक व आर्थिक परिस्थितीतून सुद्धा होत असतात त्यांना कायदेशीर मान्यता नाही म्हणून हे अयोग्य आहेत असे मानणे कदाचित धोक्याचे ठरण्याची शक्यता आहे. कारण मार्गदर्शक तत्त्वांना कायदेशीर संरक्षण व न्यायप्रविष्ठ नसले तरी जनमताचे फार मोठे पाठबळ त्यांच्यामागे आहे याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. भावी भारताची उभारणी कोणत्या तत्त्व आणि मूल्यावर करावी याबाबत घटनाकारांनी दिलेले दिशादर्शन या अर्थाने ह्या विचार करणे गरजेचे आहे. मार्गदर्शक तत्त्वे हे भारतीय घटनाकारांनी सांगितलेली पवित्र तत्त्वे आहेत. न्यायमूर्ती छगला म्हणतात की, 'मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी जर प्रामाणिकपणे केली तर भारत हा देश पृथ्वीवरील स्वर्ग ठरेल.' या तत्त्वांच्या माध्यमातून सामाजिक आणि आर्थिक लोकशाही स्थापनेची हमी घटनाकारांनी दिलेली आहे. न्यायालये देखील घटनेचा अर्थ लावताना ह्या तत्त्वांचा आधार घेतल्याची अनेक उदाहरणे आहेत. उदा. गोपालन विरूद्ध मद्रास राज्य मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे विस्तृत विवेचन आहे हे न्यायमूर्ती सेटलवाड यांचे मत एका अर्थाने योग्य वाटते. कल्याणकारी राज्याचा पाया निर्माण करण्याचे साधन या अर्थाने मार्गदर्शक स्थान लक्षात घेतल्यास त्यांचे महत्त्व लक्षात येते.

**प्र. ४था. मार्गदर्शक तत्वे आणि मूलभूत हक्क यांच्यातील परस्परसंबंध व फरक स्पष्ट करा.**

मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभत अधिकार यांच्यातील घटनात्मक संबंधाच्या दृष्टीने विचार केल्यास दोघांचे स्वरूप आणि अंमलबजावणीबाबत तफावत व भिन्नता आढळून येते. मार्गदर्शक तत्त्वाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात कोणत्या तत्त्वांचा अंगीकार करावा याबाबत शिफारशवजा सल्ला दिलेला आहे तर मूलभूत हक्क हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकास आणि कल्याणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकारचे अधिकार बहाल केलेले आहे. परंतु दोन्ही तत्त्वांमध्ये काही तांत्रिक व वैधानिक बाबींवरून फरक स्पष्ट करता येतो मात्र दोन्हीचे सूक्ष्म अवलोकन केले तर असे दिसते की व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व विकासासाठी मूलभूत हक्काइतकेच मार्गदर्शक तत्त्वे देखील महत्त्वपूर्ण आहेत. म्हणून या दोन्हीच्या माध्यमातून भारतातील लोकशाही समाजजीवनाला नवा आकार प्राप्त होईल असा घटनाकारांचा विश्वास होता. परंतु या दोन्ही तत्त्वांमध्ये काही मुद्यावरून फरक आहे. तो फरक पुढील मुद्यांच्या मार्फत मांडता येतो.

१. **स्वरूप आणि आधार-** मूलभूत हक्क हे साधारणपणे नकारात्मक स्वरूपाचे आहेत. या अधिकाराच्या माध्यमातून राज्याच्या कृतीवर बंधने लादली जातात. अधिकार उपभोगायोग्य परिस्थिती निर्माण करण्याचे उत्तरदायित्व राज्याकडे सोपविले गेले आहे याउलट मार्गदर्शक तत्वे सकारात्मक स्वरूपाची आहेत. ही तत्त्वे राज्याच्या कृतीवर बंधने लादण्याऐवजी राज्यास कृती करण्यास प्रोत्साहन देतात. राज्याने अमूक अमूक गोष्टी केले पाहिजे याबाबतचा सल्ला

मार्गदर्शक तत्त्वांच्या माध्यमातून दिला जातो. याचा अर्थ दोन्ही तत्त्वांचे स्वरूप आणि आधारामध्ये भिन्नता आढळून येते.

२. **श्रेष्ठत्व-** मार्गदर्शक तत्वे श्रेष्ठ की मूलभूत हक्क श्रेष्ठ हा वादाचा मुद्दा आहे. न्यायालयानी दिलेल्या निकालावरून मूलभूत हक्क मार्गदर्शक तत्वापेक्षा श्रेष्ठ आहे असे दिसून येते. उदा. कुरेशी विरूद्ध बिहार सरकर राज्याने मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या कायदयाच्या माध्यमातून मूलभूत हक्कांचा संकोच करू नये अशी अपेक्षा विविध खटल्याच्या निकालामध्ये व्यक्त केली परंतु सरकारने ४२ वी घटनादुरूस्ती करून मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी केलेला कायदा मूलभूत अधिकाराशी विसंगत असला तरी न्यायालयाला रद्द करता येणार नाही ही दुरूस्ती करून हक्कांचे महत्व कमी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

३. **सुस्पष्टता-** घटनेत मूलभूत हक्काचा समावेश निश्चित उद्देशासाठी झालेला असल्यामुळे त्यांचे स्वरूप सुस्पष्ट व अचूक शब्दात केलेले दिसते. याउलट मार्गदर्शक तत्वे शिफारस वजा वा सल्लावजाअसल्यामुळे घटनेत त्याचे स्वरूप सुस्पष्ट व अचूक दिसून येत नाही. अनेक मार्गदर्शक तत्त्वाचे वर्णन संदिग्ध व अस्पष्ट स्वरूपाचे दिसून येते.

४. **कायदेशीर संरक्षण-** मूलभूत हक्कांना घटनेने कायदेशीर कवच प्राप्त करून दिलेले आहे. हक्कांवर कोणीही अतिक्रमण केल्यास घटनेच्या ३२ व्या कलमानुसार न्यायालयात दाद मागता येते. याउलट मार्गदर्शक तत्त्वांना कायदेशीर संरक्षण नाही. सरकारने ही तत्वे अंमलात आणली नाही तर सरकारविरूद्ध न्यायालयात जाता येत नाही. सरकारच्या इच्छेनुसार ह्या तत्त्वांची अंमलबजावणी होते.

५. **परिणामभिन्नता-** घटनेतील मूलभूत हक्कातून नागरिकांना राजकीय स्वातंत्र्याची प्राप्ती होते म्हणून हक्कांमुळे राजकीय लोकशाही निर्माण व्हायला मदत होते. याउलट मार्गदर्शक तत्वांमुळे नागरिकांना आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य मिळते म्हणून या तत्त्वांमुळे आर्थिक लोकशाही निर्माण व्हायला मदत होते.

वरील प्रकारचे भेद मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वामध्ये आढळून येतात. उपरोक्त प्रकारचे भेद आढळून येत असले तरी घटनेत मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे या दोन्ही तत्त्वांचा समावेश लोककल्याण या हेतूसाठी झालेला आहे. या दोघांच्या अंमलबजावणीतून नागरिकांचे जीवन सुखी व समाधानी करता येईल. भारताचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास साध्य करण्यासाठी दोन्ही तत्त्वे उपयुक्त आणि महत्त्वपूर्ण आहेत फक्त अभ्यासाच्या सोयीसाठी आणि तांत्रिकतेच्या आधारावर आपण दोन्हीमध्ये भेद करतो.

**खालील दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारतीय राज्यघटनेच्या एकूण किती कलमामध्ये मूलभूत अधिकार समाविष्ट केलेले आहेत.
अ) २० ब) २२ क) २३ ड) **२४**

२. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क----------- देशाच्या राज्यघटनेचा प्रभाव आढळतो.
अ) **अमेरिका व फ्रॉन्स** ब) इंग्लंड व जर्मनी क) स्पेन व इंग्लंड ड) जर्मनी व द.आफ्रिका

३. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क-----------काळात स्थगित होतात.
अ) युद्ध ब) आंतरगत यादवी क) दंगल ड) **आणीबाणी**

४. मूळ राज्यघटनेत किती अधिकाराचा समावेश होता.
अ) पाच ब) **सात** क) आठ ड) दहा

५. समतेचा अधिकार घटनेतील कितव्या कलमामध्ये दिलेला आहे.
अ) **१४ ते १८** ब) १९ ते २२ क) २३ व २४ ड) २५ ते २८

६. ४४ व्या घटनादुरूस्तीने---------मूलभूत अधिकार हक्कांच्या यादीतून वगळला आहे.
अ) समतेचा अधिकार ब) स्वातंत्र्याचा अधिकार क) **मालमत्तेचा अधिकार** ड) शैक्षणिक अधिकार

७. घटनेच्या २१ व्या कलमात ----- स्वातंत्र्याचा समावेश आहे.
अ) मालमत्तेचा अधिकार ब) **जीविताचा अधिकार** क) अटक स्वातंत्र्य ड) धार्मिक स्वातंत्र्य

८. घटनेच्या कोणत्या मूलभूत अधिकारान्वये बालमजुरीवर बंदी लादली आहे.
अ) समतेचा अधिकार ब) स्वातंत्र्याचा अधिकार क) शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार ड) **पिळवणुकीविरूद्ध अधिकार**

९. धर्मनिरपेक्ष तत्त्वाशी संबंधित तरतूदी---------मूलभूत हक्कात समाविष्ट केलेल्या आहेत.
अ) **धार्मिक स्वातंत्र्य** ब) स्वातंत्र्याचा अधिकार क) शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार ड) पिळवणुकीविरूद्ध अधिकार

१०. अल्पसंख्याक समाजाच्या हितरक्षणासाठी कोणता मूलभूत अधिकार महत्त्वपूर्ण मानला जातो.

अ) **धार्मिक स्वातंत्र्य** ब) स्वातंत्र्याचा अधिकार क) **शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार** ड) समतेचा अधिकार

**११.** घटनेच्या कोणत्या कलमाला राज्यघटनेचा आत्मा मानले जाते.

अ) कलम ३० ब) **कलम ३२** क) कलम ३४ ड) कलम ३८

**१२.** मूलभूत कर्तव्याचा समावेश कोणत्या देशाच्या घटनेच्या प्रभावातून झाला आहे.

अ) अमेरिका ब) इंग्लंड क) **रशिया** ड) द. आफ्रिका

**१३.** भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्याचा------------कलमात समावेश केलेला आहे.

अ) कलम ५० ब) **कलम ५१** क) कलम ५४ ड) कलम ५८

**१४.** मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वात फरक खालील कोणत्या तत्त्वातून स्पष्ट करता येतो.

अ) **न्यायालयीन संरक्षण** ब) सरकारी समर्थन क) घटनात्मक स्थान ड) यापैकी नाही

**१५.** भारतीय घटनाकारांनी मार्गदर्शक तत्वाची कल्पना--------देशाच्या घटनेपासून घेतलेली आढळते.

अ) अमेरिका ब) इंग्लंड क) **आर्यलँड** ड) द. आफ्रिका

**१६.** भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे ----------महान नेत्याच्या तत्त्वांना मार्गदर्शक तत्त्वात स्थान देण्यात आले आहे.

अ) पंडीत नेहरू ब) **महात्मा गांधी** क) सरदार पटेल ड) सुभाष चंद्र बोस

**१७.** घटनेतील कोणत्या कलमामध्ये मार्गदर्शक तत्वाचा समावेश आहे.

अ) **३६ ते ५१** ब) १२ ते ३५ क) ५२ व ७० ड) ५ ते ११

**१८.** समान नागरी कायदाचा समावेश मार्गदर्शक तत्वांतील कोणत्या कलमा केलेला आहे.

अ) कलम ४० ब) **कलम ४४** क) कलम ४५ ड) कलम ४८

**१९.** घटनेच्या ५१ व्या कलमात ----------घटकांशी संबंधित मार्गदर्शक तत्वे आहेत.

अ) आर्थिक ब) राजकीय क) सामाजिक ड) **आंतरराष्ट्रीय**

**२०.**------- घटनादुरूस्तीने मार्गदर्शक तत्त्वामध्ये काही नवीन तत्वांचा समावेश केलेला होता.

अ) **४२ वी घटना दुरूस्ती** ब) ४४ वी घटना दुरूस्ती क) ५४ वी घटनादुरूस्ती ड) ६२ वी घटना दुरूस्ती

**२१.** मार्गदर्शक तत्त्वाच्या माध्यमातून ----------प्रकारची लोकशाही भारतात निर्माण होण्यास मदत प्राप्त होईल.

अ) राजकीय लोकशाही ब) सांस्कृतिक लोकशाही क) **सामाजिक व आर्थिक लोकशाही** ड) यापैकी नाही

**२२.** मार्गदर्शक तत्त्वांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली तर भारत हा पृथ्वीतलावरील स्वर्ग बनेल हे विधान कोणी केले आहे.

अ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर ब) **न्यायमूर्ती एम.सी. छगला** क) डॉ. राजेंद्र प्रसाद ड) सरदार पटेल

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**.

**१.** भारतीय घटनेतील दोन मूलभूत कर्तव्ये सांगा.

उत्तर- १) घटनेचे पालन करून तिच्यातील आदर्श, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज यांचा सन्मान करणे.

२)भारताचे सार्वभौमत्व, एकता व अखंडता यांचा पुरस्कार आणि रक्षण करणे.

**२.** भारतीय राज्यघटनेतील दोन मार्गदर्शक तत्वे सांगा.

उत्तर- अ) सर्व भारतीयांसाठी समान नागरी कायदा निर्माण करणे.

ब) १४ वर्षाच्या आतील सर्व मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण राज्याने दयावे.

**३.** राज्यघटनेतील कोणत्या कलमांत मूलभूत हक्कांची तरतूद आहे?

उत्तर- राज्यघटनेतील १२ ते ३५ कलमांत मूलभूत हक्कांची तरतूद आहे.

**४.** भारतीय राज्यघटनेत सद्या किती अधिकार आहेत.

उत्तर- घटनेत सद्या सहा मूलभूत अधिकार आहेत.

**५.** राज्यघटनेतील कोणत्या कलमांत मार्गदर्शक तत्वांची तरतूद आहे?

उत्तर - राज्यघटनेतील ३६ ते ५१ कलमांत मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद आहे.

**६.** घटनेत किती मूलभूत कर्तव्य आहेत.

उत्तर- घटनेत १० मूलभूत कर्तव्याचा समावेशआहे.

**७.** घटनेत मूलभूत कर्तव्या समावेश कोणत्या घटना दुरूस्तीने कोणत्या कलमांत केलेला आहे.

उत्तर- घटनेत मूलभूत हक्कांचा समावेश ४२ घटनादुरूस्तीने आणि प्रकरण ४ मधील ५१ क कलमांत समावेश आहे.

**८.** स्वातंत्र्याच्या हक्कांपैकी कोणतेही दोन हक्क सांगा.

उत्तर - स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्य आणि घटनात्मक उपाययोजनेचा हक्क इ.हक्कांचा समावेश आहे.

**९.** कोणत्या घटनादुरूस्तीने मालमत्तेचा मूलभूत हक्क घटनेतून वगळण्यात आला.
उत्तर- ४४ व्या घटनादुरूस्तीने संपत्ती वा मालमत्तेचा अधिकार मूलभूत हक्कांतून वगळला.

**१०.** माहिती अधिकार केव्हा संमत झाला आणि अंमलात आला.
उत्तर- माहिती अधिकार २००५ मध्ये संमत झाला आणि १२ ऑक्टोबर २००५ पासून अंमलात आला आहे.

**११.** भारतात माहिती अधिकार कोणत्या राज्यात सर्वप्रथम संमत झाला होता.
उत्तर- माहिती अधिकार महाराष्ट्रात राज्यात २००२ मध्ये सर्वप्रथम संमत झाला होता.

**१२.** माहिती अधिकार कायदयाची आवश्यकता का आहे.
उत्तर- प्रशासकीय शिस्त, उत्तरदायित्व, कार्यक्षमता, पारदर्शक प्रशासन आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी हा अधिकार आवश्यक आहे.

**१३.** जगात माहितीचा अधिकार सर्वप्रथम कोणत्या देशात आणि कोणत्या वर्षी देण्यात आला होता.
उत्तर- जगात सर्वप्रथम स्वीडन देशात १७६६ मध्ये माहिती अधिकार देण्यात आला.

**१४.** शिक्षण हक्क कायदयातील प्रमुख तरतूद कोणती आहे.
उत्तर- ६ ते १४ वर्षाच्या मुलांना मुक्त व अनिवार्य शिक्षण उपलब्ध करून देणे.

**१५.** शिक्षण अधिकारातील उणिवा वा मर्यादा लिहा
उत्तर- मुक्त व अनिवार्य शिक्षणासाठी बजेट फारशी तरतूद नाही. २५ टक्के गरिब मुलांना खाजगी प्रवेश मिळवून देण्यास अपयशी ठरला.

**१६.** भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांची दोन उगमस्थाने सांगा.
उत्तर- आर्यलँडची राज्यघटना, मानवी हक्क घोषणापत्र, गांधीवादी विचारसरणी इत्यादींतून मार्गदर्शक तत्त्वांचा घटनेत समावेश झालेला दिसतो.

**१७.** मार्गदर्शक तत्वे आणि मूलभूत हक्कांतील मूलभूत फरक सांगा.
उत्तर- मूलभूत हक्कांना न्यायालयीन संरक्षण आहे तर मार्गदर्शक तत्त्वांना न्यायालयीन संरक्षण नाही.

**१८.** मार्गदर्शन तत्त्वांच्या मुख्य दोन मर्यादा लिहा.
उत्तर- न्यायालयीन संरक्षणाचा अभाव आणि तार्किक सुसंगतीचा अभाव ह्या प्रमुख मर्यादा सांगता येतात.

**१९.** मार्गदर्शक तत्त्वाची आवश्यकता का आहे.
उत्तर- कल्याणकारी राज्याची स्थापना आणि सरकारच्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वाची आवश्यकता आहे.

**२०.** राजकीय मार्गदर्शक तत्त्वातील कोणत्या तत्त्वाला अद्याप मान्यता मिळाली नाही.
उत्तर- समान नागरी कायदा या मार्गदर्शक तत्त्वाला भारतात मान्यता मिळालेली नाही.

**२१.** ४२ व्या घटनादुरूस्तीने मार्गदर्शक तत्त्वात समाविष्ट समाजवादी तत्त्वे कोणते आहे.
उत्तर- कोणत्याही उदयोगात गुंतलेल्या संस्था व संघटनेच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभाग द्यावा.

## प्रकरण तिसरे
## घटनात्मक मंडळे आणि घटनादुरूस्ती प्रक्रिया

**टिप- राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग-** घटनेच्या ३५० व्या कलमानुसार अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला दिलेला आहे. ३५० ब नुसार अल्पसंख्याकाना दिलेल्या घटनात्मक सवलतीची अंमलबजावणी करण्यासाठी एक विशेष अधिकारी नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. घटनेच्या २९ व्या कलमानुसार अल्पसंख्याकांना आपल्या भाषा, लिपी व संस्कृतीचे संरक्षण व जतन करण्यासाठी संस्था स्थापन करण्याचा अधिकार दिलेला आहे तर ३० व्या कलमानुसार अल्पसंख्याकांना आपल्या भाषा, लिपी व संस्कृतीची संरक्षण करण्यासाठी शैक्षणिक संस्था निर्माण करण्याचा अधिकार आहे. सरकार या संस्थाना मदत करताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव करणार नाही. अल्पसंख्याकाचे हितसंबंध व स्वतंत्र अस्तित्वाला कोणत्याही प्रकारचा बाधा येणार नाही. बहुसंख्याकांच्या हुकूमशाहीपासून त्यांचे रक्षण व्हावे या हेतूने अल्पसंख्याकाच्या संरक्षणासाठी घटनात्मक तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. १९५३, १९६१ आणि १९७७ साली अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आलेली होती. या आयोगात एक अध्यक्ष आणि दोन सभासद होते. आयोगाचा सचिव म्हणून एका विशेष अधिकाऱ्याची नेमणूक राष्ट्रपतीनी केलेली होती.

**प्र. १ ला. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग रचना, उद्देश, अधिकार व कार्य स्पष्ट करा.**

**किंवा**

**राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे महत्त्व व मूल्यमापन करा.**

१२ जानेवारी १९७८ साली भारत सरकारच्या गृहमंत्रालयाने राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या स्थापनेचा संकल्प व्यक्त केला. घटना आणि कायदयाचे संरक्षण प्राप्त असतानाही अल्पसंख्याक समाजाला असुरक्षितता, असमानता व भेदभावयुक्त वागणूक दिली जात असल्याची भावना भारतातील अल्पसंख्याकामध्ये मोठया प्रमाणावर रूजत चालेली आहे. ही भावना भारताच्या धर्मनिरपेक्ष परंपरेला तडा देणारी आहे. म्हणून अल्पसंख्याक समुदायात राष्ट्रीय वृत्ती व राष्ट्रीय एकात्मतेला वाव देण्यासाठी भारत सरकारने अल्पसंख्याकाच्या सुरक्षेसाठी विविध उपाययोजना करण्यावर भर देण्यास सुरूवात केली. केंद्र आणि राज्याकडून अल्पसंख्याकासाठी असलेल्या प्रशासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी एक प्रभावशाली संस्था निर्मितीचा विचार सुरू केला. या चर्चेचा एक परिणाम म्हणजे १९८४ साली अल्पसंख्याक आयोग गृह मंत्रालयापासून अलग करण्यात आला. कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत नव्या रूपात गठित करण्यात आला. अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक यातील तणाव लक्षात घेऊन संसदेने १९९२ मध्ये राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम संमत केला या कायदयानुसार अल्पसंख्याकाच्या हक्क रक्षणासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग नेमण्याची वैधानिक तरतूद करण्यात आली. २३ ऑक्टोबर १९९३ च्या अधिसूचनेनुसार मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौद्ध, पारशी हे पाच धार्मिक समुदाय अल्पसंख्याक समुदाय घोषित करण्यात आले. २६ जानेवारी २०१४ रोजी जैन समाजाला देखील अल्पसंख्याक समुदायाचा दर्जा देण्यात आला.

**रचना व कार्यकाल-** अल्पसंख्याक आयोगात एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, पाच सदस्य व एक सचिव असतो. अध्यक्ष व सदस्य हे अल्पसंख्याक वर्गातील असतात. अध्यक्ष व सदस्याचा कार्यकाल तीन वर्षाचा असतो. त्यांची नेमणूक केंद्र सरकारकडून केली जाते. त्यांचे वेतन व भत्ते केंद्रसरकारकडून निश्चित केले जातात.

**राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग निर्मितीचे उद्देश-** अल्पसंख्याक आयोग निर्माण करण्याचे काही ठळक उद्देश सांगितले जातात.

१. अल्पसंख्याकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेणे.
२. अल्पसंख्याकामधील अलगतेची भावना नाहीशी करणे.
३. अल्पसंख्याकाच्या संस्कृती व धार्मिक परंपराचे संरक्षण करणे.
४. केंद्र व घटकराज्य सरकारांनी अल्पसंख्याकासाठी केलेल्या कायदेशीर तरतूदीचे पालन होत की नाही याची पाहणी करणे.

**अधिकार व कार्य-** अल्पसंख्याकानाघटना व कायदयाने दिलेल्या अधिकाराच्या संरक्षणासाठी आणि हक्क भंगाच्या तक्रारीची दखल घेऊन चौकशी करण्यासाठी आयोगाची निर्मिती केलेली आहे. अल्पसंख्याक आयोगापुढे कायदयाने पुढील प्रकारच्या जबाबदाऱ्या सोपविलेल्या आहेत.

१. केंद्र व घटक राज्य सरकारांनी अल्पसंख्याकासाठी केलेल्या वैधानिक तरतूदीचे मूल्यमापन करणे.
२. अल्पसंख्याकासाठी केलेल्या कायदेशीर तरतूदीच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सूचना करणे.

३. केंद्र व घटक राज्य सरकारानी अल्पसंख्याकाबाबत निश्चित केलेल्या धोरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.
४. केंद्र व घटकराज्य अल्पसंख्याक समाजाच्या हितरक्षणासाठी केलेल्या तरतूदीच्य परिणामकारक अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणे व शिफारश करणे.
५. अल्पसंख्याकांच्या हित रक्षणासाठी प्रभावी संरक्षक तरतूदी कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करणे.
६. अल्पसंख्याकाच्या हक्कावर अतिक्रमण करणाऱ्या घटनाची दखल घेणे आणि अल्पसंख्याकावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या तक्रारी दाखल करून घेणे व सरकारला तक्रारीविषयीची माहिती पुरविणे.
७. अल्पसंख्याकांच्या अधिकार व संरक्षणाशी संबंधित तक्रारीची दखल घेणे आणि ह्या तक्रारी संबंधित अधिकाऱ्यापुढे मांडणे
८. अल्पसंख्याकाच्या विकास व संरक्षणासाठी कायदेशीर तरतूदी व कल्याणकारी योजना राबविण्यासाठी सरकारला सल्ला देणे.
९. अल्पसंख्याकासाठी संबंधित निर्णय निश्चिती करताना कोणते उपाय अंमलात आणले पाहिजे याबाबत केंद्र व राज्यसरकारला सल्ला देणे.
१०. अल्पसंख्याकाना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीतून निर्माण होणाऱ्या समस्याचे अध्ययन करून समाधानकारक उपाय सूचविणे.
११. अल्पसंख्याक सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी संबंधित विषयाचे अध्ययन, संशोधन आणि विश्लेषण करणे.
१२. अल्पसंख्याकांशी निगडित प्रकरणावर केंद्र व राज्यसरकाराना मार्गदर्शन करणे.
१३. अल्पसंख्याकाशी संबंधित घटना वा प्रकरणावर अहवाल वा विशेष उपक्रम आखणे.

आयोगाकडे अल्पसंख्याक समाजाच्या हक्क संरक्षणासाठी आवश्यक अधिकार बहाल केलेली आहेत. आयोगा आपल्या कार्याचा अहवाल राष्ट्रपतीला सादर करतो. राष्ट्रपती तो अहवाल संसदेत ठेवण्याचे कार्य करीत असतो. संसदेत अहवालावर सविस्तर चर्चा होते आणि अल्पसंख्याक आयोगाने दिलेल्या शिफारशीच्या आधारावर कायदेशीर तरतूदी देखील केल्या जातात.

**मूल्यमापन-** अल्पसंख्याकाच्या हितरक्षणासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाची सरकारने स्थापना केलेली असली तरी या आयोगावर निर्मिती व कार्यावर अनेक आक्षेप घेतले जातात. अल्पसंख्याकाची एक गठ्ठा मते मिळविण्यासाठी हा आयोग स्थापन करण्यात आला. शासनाने राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न व्यवस्थित केला असता तर आयोग निर्माण करण्याची आवश्यकता राहिली नसते आयोगाची निर्मिती करून शासनाने अलगतावाद वा पृथकतावादालाचे पोषण करून दुटप्पी भूमिका घेतली असे काही लोकांना वाटते. ब्रिटिशांनी काही धार्मिक समुदाय व जातींना विशेष सवलती व अधिकार देऊन भारतीय समाजाची एकी भंग केली. स्वातंत्र्योत्तर काळात सर्व समाजाला एका तराजूत तोलून राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न सोडविण्याऐवजी असे आयोग निर्माण करून ब्रिटिशांचीच रणनीती पुढे चालू ठेवली असे काही अभ्यासकांना वाटते. आयोग स्थापनेचा उद्देश अल्पसंख्याक वर्गांना राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेणे हा होता परंतु आयोगाचा उपयोग अल्पसंख्याकवाद जोपासण्यासाठी केला जातो. आयोगातील अध्यक्ष व सदस्याच्या नेमणुका राजकीय दृष्टीकोन लक्षात घेऊन केल्या जातात. राजकीय पक्ष आयोगाचा उपयोग आपले स्वार्थ साधण्याचे व्यासपीठ म्हणून करतात. या कारणामुळे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री. आर.एस.लाहोटी यांनी आयोगा बरखास्त करण्याची सूचना केली होती. आयोग अल्पसंख्याकाना बहुसंख्याक समाजाशी जोडण्यापेक्षा तोडण्याचे कार्य करतो.

आयोगाच्या निर्मिती, रचना, स्वरूप व कार्यावर अनेक गंभीर स्वरूपाचे आक्षेप अभ्यासकांनी घेतलेले असल तरी अल्पसंख्याक समाजाच्या हक्क संरक्षणासाठी आयोगाची आवश्यकता आहे. गंभीर स्वरूपाच्या टीका होऊन आयोगाचे अस्तित्व टिकून आहे यात आयोगाच्या कार्याचे महत्त्व लक्षात येते.

**प्र. २ रा. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग रचना, अधिकार आणि कार्य स्पष्ट करा.**

मानव अधिकार घोषणापत्र जाहीर झाल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्याची चर्चा सुरू झाली. त्या चर्चेत फलितातून आंतरराष्ट्रीय नागरी आणि राजकीय हक्काचा करारनामा अस्तित्वात आला. या करारनाम्यानुसार जागातिक पातळीवर १९७६ मध्ये मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाचा मुख्य उद्देश आंतरराष्ट्रीय नागरी व राजकीय कराराची अंमलबजावणी करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे हा होता. नागरी आणि राजकीय अधिकाराच्या अंमलबजावणीबाबतच्या राष्ट्रांनी सादर केलेल्या अहवालांचा अभ्यास करून सूचना करणे, करारनामाच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या राष्ट्रास समज देणे, राष्ट्राराष्ट्रातील मतभेद दूर करण्यासाठी सल्लगार आयोगाची नेमणूक करणे आणि सभासद राष्ट्रातील बळी पडलेल्या व्यक्तींनी तक्रार केल्यास आयोग ती तक्रार संबंधित

राष्ट्रप्रमुखाकडे योग्य त्या कारवाईसाठी पाठविणे इत्यादी कार्यासाठी आंतरराष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना करण्यात आलेली होती. आंतरराष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने प्रत्येक राष्ट्राने मानव अधिकाराचा प्रचार व प्रचार आणि देखरेख ठेवण्यासाठी राष्ट्रीय मानव अधिकार आयोग स्थापन करण्याचा आग्रह धरला परंतु भारत सरकारने आयोग स्थापन करण्यात सक्रियता दाखविली नाही. परंतु पंजाब, जम्मू-काश्मिर आणि पूर्वोत्तर राज्यामध्ये झालेल्या हिंसाचाराच्या घटनामुळे मानवी हक्क उल्लंघनाचे आरोप भारत सरकारवर होऊ लागले. हिंसाचाराच्या वाढत्या घटनामुळे मानवी हक्क आयोग स्थापन करण्यासाठी १९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय पातळीवरून दडपण येऊ लागले आणि १९९१ मध्ये भारताने जागतिकीकरणाचा अवलंब केल्यामुळे मानव अधिकार आयोग स्थापन करणे गरजेचे बनले. म्हणून भारत सरकारने १४ मे १९९२ मध्ये मानव हक्क आयोग कायदाचा मसुदा लोकसभेत सादर केला. हा मसुदा स्थायी समितीकडे विचारार्थ पाठविला मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाढत्या दडपणातून भारत सरकारने २७ सप्टेंबर १९९३ रोजी 'राष्ट्रीय आयोग व राज्य मानवी हक्क आयोग' स्थापन करण्यासाठी वटहुकूम काढला. त्या वटहुकूमानुसार १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यामुळे दरवर्षी १२ ऑक्टोबर हा आयोग स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो. ह्या वटहुकूमाचे पुढे कायदयात रूपांतर करण्यात आले. संसदेच्या दोन्ही सभागृहानी वटहुकूमात काही सुधारणा करून मंजुरी प्रदान केली ८ जानेवारी १९९४ रोजी राष्ट्रपतीच्या संमतीनंतर मानव हक्क संरक्षण कायदा प्रत्यक्षात अंमलात आला. या कायदयाचा प्रमुख उद्देश म्हणजे राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील मानव अधिकार आयोग स्थापना करणे हा होता. मानव अधिकारांच्या उल्लंघनावर लक्ष ठेवण्यासाठी हा आयोग निर्माण करण्यात आला. या आयोगाचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे.

**रचना-** मानव हक्क संरक्षण कायद्याच्या दुसऱ्या प्रकरणात राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याची तरतूद आहे आणि तिसऱ्या प्रकरणात आयोग सदस्य आणि नेमणुकीच्या निकषाचा समावेश केलेला आहे. मानव हक्क कायदयानुसार मानव अधिकार आयोगात एक अध्यक्ष व चार पूर्णकालिक सदस्य आणि चार मानद सदस्य असतात. अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश पदाचा अनुभव असलेली व्यक्ती तर चार सदस्यात एक सर्वोच्च न्यायालयातील कार्यरत अनुभवी न्यायाधीश किंवा माजी न्यायाधीश तर दुसरा उच्च न्यायालयात कार्यरत न्यायाधीश किंवा माजी मुख्य न्यायाधीश आणि उरलेले दोन सदस्य मानव अधिकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती असतील. मानद सदस्यात राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग व राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्षाचा समावेश असतो.

**नेमणूक-** आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यांची नेमणूक राष्ट्रपतीद्वारा केली जाते. परंतु स्वतः राष्ट्रपती नेमणूक करत नसून पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती नेमतो. समितीने शिफारश केलेल्या व्यक्तीची नेमणूक केली जात असते. या समितीचे अध्यक्ष पंतप्रधान असतात. लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय गृह मंत्री, लोकसभा व राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते आणि राज्यसभेचा उपाध्यक्ष इत्यादी सदस्य असतात.

**कार्यकाल व वेतन-** आयोग अध्यक्ष आणि सभासदाचा कार्यकाल पदभार सांभाळल्यापासून ५ वर्ष इतका असतो. वयाची ७० वर्ष पूर्ण होईपर्यत आयोग काम करू असतो. या वयोमर्यादेच्या आत पुर्ननेमणूक केली जाऊ शकते. सभासदाचे कार्यकाल ५ वर्ष पूर्ण होण्याआधीच ७० वर्षाचे झाले तर तो ५ वर्षापूर्वीच पदावरून निवृत्त होत असतो. गैरवर्तन, अकार्यक्षमता, भ्रष्टाचार इत्यादी कारणावरून कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी राष्ट्रपती पदावरून दूर करू शकतो. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाच्या अध्यक्षाचा दर्जा सर्वोच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीशासारखा असतो. अध्यक्ष आणि इतर सदस्य यांचे वेतन, भत्ते, आणि पदावनती करण्याची पद्धत सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशासारखीच आहे. आयोग अध्यक्ष आणि सदस्यांना सेवा, वेतन आणि बडतर्फीपासूनची कायदेशीर शाश्वती असल्यामुळे त निःपक्षपातीपणे काम करू शकतात.

**सचिवालय-** आयोगाचे सचिवालय महासचिवांच्या मागदर्शनाखाली कार्य करते. महासचिव भारत सरकारच्या सचिव दर्जाचा अधिकारी असतो. तो आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असतो. आयोगात एक महासचिव, चौकशी विभाग, प्रशासकिय विभाग, सूचना विभाग व संशोधन विभाग हे पाच विभाग कार्यरत आहेत.

**राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे अधिकार व कार्य -** मानव अधिकार आयोगाला पुढिल कार्य पार पाडावी लागतात.

१. पीडित व्यक्ती किंवा तिच्यावर्तीने मानव अधिकार उल्लंघन विषयक तक्रारीची नोंद घेणे आणि चौकशी करून त्याबाबत योग्य ती कारवाई करणे.
२. मानव अधिकार उल्लंघनाचा आरोप अंतर्भूत असलेल्या न्यायालयातील प्रलंबित प्रकरणात न्यायालयाच्या संमतीने मध्यस्थी करणे किंवा प्रकरणाची चौकशी आयोग करू शकतो.

३. सरकारी दवाखाने, बालसुधारगृह, आश्रमांना भेटी देऊन संबंधित ठिकाणी राहणाऱ्या व्यक्तीची राहण्याची, जेवणाची व अन्य परिस्थितीची पाहणी करून केंद्र व राज्यसरकारला सूचना व शिफारशी करणे.
४. भारत सरकार व घटकराज्य सरकारच्या तुरूंगातील कैदयाची चौकशी करून शिफारशी करणे. तुरूंगाना भेटी देऊन सरकारला उपचारात्मक सूचना करणे. तुरूंगात योग्य सुधारणा होऊन कैद्यांना योग्य पद्धतीचे संरक्षण प्राप्त झाल्यास गुन्हेगारांना सुधारणाची संधी मिळू शकते.
५. मानव अधिकारांना बाधा आणणाऱ्या घटकांचे दहशतवादी कृत्यासहित परीक्षण करणे आणि योग्य उपाययोजना सूचविणे. अतिरेक्यांच्या स्थितीबाबत मूल्यांकन करून उपचारात्मक सूचना करणे.
६. मानवी अधिकाराबाबतचे विविध प्रबंध, दस्ताऐवज आणि आंतरराष्ट्रीय कायदयाचा अभ्यास करून त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या शिफारशी आयोगामार्फत केल्या जात असतात.
७. मानव अधिकाराबाबत जनतेला माहिती देऊन हक्काबद्दल जागरूकता निर्माण करणे. अधिकार संरक्षणासाठी विविध सुरक्षा उपचाराविषयी जनतेत जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी प्रसारमाध्यमाचा आयोग वापर करीत असते.
८. मानव अधिकार कायदयाचे पुनर्मूल्यांकन करून ते लागू करण्याची शिफारस करणे. हक्क संरक्षणासाठी घटनेने केलेल्या सुरक्षा उपायाचे परीक्षण करून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीचे उपाय सूचविणे.
९. आंतरराष्ट्रीय कराराचा अभ्यास करून अंमलबजावणी बाबत योग्य त्या सूचना करणे.
१०. मानव अधिकार क्षेत्रात कार्यरत गैरसरकारी संघटनाना प्रोत्साहित करणे वा मदत देणे. समाजातील विविध गटात मानव अधिकारांचा प्रसार करणे वा हक्क संरक्षणासाठी उपलब्ध सुरक्षा उपायाबाबत जनजागृती करणे.
११. मानव अधिकाराबाबत संशोधन कार्य सतत सुरू ठेवणे आणि मानव अधिकारात वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे. मानव अधिकार क्षेत्रातील संशोधनास साह्य देणे वा प्रोत्साहन देणे.
१२. मानव अधिकार उल्लंघनाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी दिवाणी न्यायालयाप्रमाणे साक्षीदारांना उपस्थितीसाठी समन्स काढणे, शपथपत्रावर साक्ष घेणे, शपथपत्रावरील साक्ष स्वीकारणे, सरकारी कार्यालयातून अभिलेखाची मागणी करणे इत्यादी अधिकार आयोगाला आहेत.
१३. मानव अधिकार उल्लंघन विषयक खटल्यात दोषी असलेल्या व्यक्तीविरोधात आवश्यक ती कारवाई करण्याची शिफारश शासनाकडे करणे किंवा पीडित व्यक्ती आणि तिच्या कुटुंबियाना आवश्यक वाटेल ते आर्थिक वा कायदेशीर सहाय्य मिळावे म्हणून शासनाकडे शिफारश करणे हे देखील आयोगाचे कार्य आहे.
१४. आयोग दरवर्षी आपल्या कार्याचा अहवाल केंद्रसरकारला सादर करतो. वार्षिक अहवालाशिवाय विशेष अहवाल देखील केंद्रसरकारला सादर केले जातात.

अशा प्रकारे राष्ट्रीय मानव अधिकार आयोगास मानव अधिकार संरक्षण अधिनियमानुसार व्यापक अधिकार दिलेल आहेत. मानव अधिकारांच्या संरक्षणासाठी आयोगास दिलेले अधिकार समर्थनीय मानले जातात. सद्य:स्थितीत मानव अधिकारांच्या उल्लंघनाच्या व्यापक घटना घडतांना दिसतात त्यासंदर्भात योग्य उपाययोजना करण्यासाठी आयोगाला पुरेसे अधिकार दिलेले आढळतात.

**प्र. ३ रा. नीती आयोग रचना, आवश्यकता, अधिकार व कार्य विशद करा.**

**नीति आयोग- (National Institution for Transforming India)**

१५ ऑगस्ट १९५० रोजी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील सरकारने १५ मार्च १९५० रोजी नियोजन मंडळाची स्थापना केली त्यानंतर जवळपास ६५ वर्षांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने १ जानेवारी २०१५ रोजी नीति आयोगाची स्थापना केली. राज्यसरकारे, संसद सदस्य, वेगवेगळया क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी आणि संस्थाशी चर्चा करून हा आयोग निर्माण केला. हा आयोग केंद्र सरकारला धोरणात्मक बाबतीत सल्ला प्रदान करेल आणि केंद्र आणि राज्यांच्या दरम्यान दुवाचे काम करेल. नीति आयोग (राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था) ही संस्था केंद्र सरकारने योजना आयोग वा नियोजन आयोगाच्या ऐवजी निर्माण केलेली संस्था आहे. स्वतंत्र मूल्यमापन आयोगाने आपला मूल्यमापन अहवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना २९ मे २०१४ रोजी आपला अहवाल सादर केला. त्या अहवालानुसार नियोजन मंडळाचे मूळ स्वरूप, उद्देश व कार्य देखील बदलले आहे. सद्यकाळात नियोजन मंडळ हे अर्थव्यवस्थेला गती देणारे मंडळ राहिलेले नसून राज्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचे केंद्राचे 'नियंत्रण मंडळ' बनले आहे. केंद्राची योजना राज्यावर लादण्याचे साधन म्हणून मंडळाचा वापर केला जातो. म्हणून नियोजन मंडळात सुधारणा करण्यात वेळ वाया घालविण्यापेक्षा देशाच्या विकासाला बळ देणारे नवे मंडळ निर्माण केले पाहिजे आणि नियोजन मंडळ बरखास्त केले पाहिजे अशी शिफारश केली. ३१ ऑगस्ट २०१४ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने ठराव संमत करून नियोजन मंडळ बरखास्त केले आणि त्या जागेवर राष्ट्रीय विकास आणि सुधारणा आयोग (National Develoment and

Reform Commission) (NDRC) निर्मितीला मान्यता दिली. १ जानेवारी २०१५ रोजी मंत्रिमंडळाने पारित ठरावानुसार नियोजन मंडळाच्या ऐवजी नीति आयोग नावाच्या नव्या संस्थेच्या स्थापनेला मंजूरी दिली.

**NITI Aayog**
**नीति आयोग**
National Institution for Transforming India
स्थापना- १ जानेवारी २०१५
अधिकार क्षेत्र- भारत सरकार
मुख्यालय- नवी दिल्ली
अध्यक्ष- नरेंद्र मोदी
उपाध्यक्ष- अरविंद पनगरिया
मुख्य अधिकारी- अमिताभ कांत

अर्थमंत्री अरूण जेटलीच्या मते, "नियोजन मंडळ ही सद्यकाळात अनावश्यक संस्था बनलेली आहे. या संस्थेने अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना देण्याऐवजी तिच्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचे काम केले. भारताची बहुविविधता आणि राज्याच्या बहुविविध आर्थिक समस्या व क्षमता लक्षात न घेता संपूर्ण देशासाठी एकच योजना निर्माण करून राज्यावर लादण्याचे काम केले. राज्याची आणि समाजातील विविध क्षेत्राची भागीदारी न घेता तयार केलेल्या योजना अनेकदा अपयशाच्या धनी बनल्या. भारताच्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेसारखी स्पर्धाक्षम आणि क्षमतावान बनविण्यासाठी आवश्यक क्षमता नियोजन मंडळाकडे नाही. हे मंडळाने केलेल्या साठ वर्षाच्या केलेल्या कामातून अनुभवास येते आणि साठ वर्षापासून मंडळाने अनेक योजना आखून ही भारतीय अर्थव्यवस्था जलद विकास आणि जागतिक अर्थव्यवस्थेला स्पर्धा करण्यास पात्र ठरली नाही. म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेला गतिमान बनविण्यासाठी आणि विकासात सर्व हितधारक गटाची भागीदारी निर्माण करण्यासाठी ही संस्था नष्ट करून नवी संस्था निर्माण करण्याची नितांत आवश्यकता आहे." वरील विधानातून अर्थमंत्री अरूण जेटली यांनी नियोजनमंडळाच्या गेल्या साठ वर्षातील कार्याप्रति असमाधान वअसंतोष व्यक्त करून भारताचा जलद आर्थिक विकास आणि विकासात समाविष्ट विविध घटक रचनात्मक सहयोगासाठी नियोजन आयोगापेक्षा व्यापक पायावर उभी असलेली संस्था स्थापन करण्यावर भर दिला. नीति आयोगाच्या स्थापनेला काही राजकीय घडामोडी देखील कारणीभूत मानल्या जातात. १६ व्या लोकसभेत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीचा पराभव होऊन भाजपच्या नेतृत्वाखालील लोकशाही पुरोगामी आघाडीला बहुमत प्राप्त झाली. या घटनेमुळे काँग्रेस निर्मित व काँग्रेसच्या समाजवादी धोरणाशी संलग्नित नियोजन मंडळ सारख्या संस्थेच्या दोषावर चर्चा होणे वा ती बरखास्त करण्याचा निर्णय होणे ही एक साहजिकच बाब ठरली. सत्ताधारी वर्गात नियोजनमंडळाविषयी असलेल्या अविश्वासातून हे मंडळ बरखास्त करण्यात आले आणि त्यांची जागा घेण्यासाठी नीति आयोगाची स्थापना करण्यात आली.

८ जानेवारी २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीति आयोगाची पहिली बैठक संपन्न झाली. ही संस्था सरकारला थिंक टँकच्या स्वरूपात धोरणात्मक बाबतीत आणि प्रशासकीय गतिमानता निर्माण करण्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य वा ढाचा उपलब्ध करून देण्याचो कार्य करेल आणि धोरण आखणीच्या संदर्भात तांत्रिक स्वरूपाचे सहाय्य देखील उपलब्ध करून देईल. देशाच्या आर्थिक विकासासाठी प्राधान्यक्रम निश्चिती, गतिमान आर्थिक विकासासाठी आवश्यक प्रतिमान निर्मिती, धोरण क्रियान्वयावर नियंत्रण व मार्गदर्शन, धोरण क्रियान्वयाचे मूल्यमापन इत्यादी जबाबदारी व दिशादर्शनाची जबाबदारी नीति आयोग पार पाडली जाईल. योजना आयोग साधारणे जी कामे व जबाबदाऱ्या पार पाडत होतो तशाच प्रकारे नीति आयोग काम करेल परंतु योजना आयोग आणि नीति आयोग यांच्यात मूलभूत स्वरूपाचे अंतर वा फरक म्हणजे योजना आयोग ही संस्था पक्षीय केंद्रीय राजवटीकडून चालविली जात होती. या राजवटीने आखलेल्या ध्येय धोरणानुसार वा निर्देशानुसार पंचवार्षिक योजना केली जात होती. योजनेची आखणी करताना राज्यांना प्रतिनिधित्व आणि विचारविनिमय वा भागीदारी विचार करत नव्हती. राष्ट्रीय विकास परिषदेत पंचवार्षिक योजनेला संमती प्रदान करण्याचा अधिकार राज्यांना होता. योजना आयोगाशी संलग्न घटकाशी सल्लामसलत व भागीदारीचा विचार नव्हता या सर्व उणिवांचा विचार करून केंद्र सरकारने नियोजनमंडळ बरखास्त करून नीति आयोगाची स्थापना केली. या आयोगात राज्यांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व बहाल केलेले आहे. देशाच्या जलद आर्थिक विकासात राज्याच्या भागीदारीला महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आले. राज्याशी योग्य पद्धतीने विचारविनिमय करून आणि राज्यांना विश्वासात घेऊन निर्णय घेण्याची तरतूद ठराव करण्यात आली. योजना आयोगाप्रमाणे केंद्रीकरणाला नीति आयोग प्राधान्य देणार नाही तर राज्याचे हित वा स्वायत्तता लक्षात घेऊन विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाला अवलंब करेल.

योजनेशी संलग्न घटक, विविध क्षेत्रातील तज्ञ, संशोधन संस्था आणि व्यावसायिक यांचे मार्गदर्शन आणि रचनात्मक भागीदारीच्या आधारावर नीतिनिर्धारण वा योजनेचा ढाचा निर्माण करेल. त्यामुळे नीति आयोग ही संकल्पना योजना आयोगापेक्षा व्यापक स्वरूपाची आहे आणि तिच्या माध्यमातून भारताचा जलद आर्थिक विकास साध्य करता येईल आणि जागतिक अर्थव्यवस्थेशी स्पर्धा करणारी स्पर्धाक्षम अर्थव्यवस्था बनेल असा दावा तिच्या पुरस्कर्त्यांनी केलेला आहे.

नीति आयोग ग्रामपातळीपासून नीतिनिर्धारणास प्रारंभ करेल म्हणजे देशाच्या शेवटच्या टोकापासून प्रारंभ करेल. ग्रामपातळीवर नीति निर्माण करण्यासआवश्यक तंत्रज्ञान विकसित केले जाईल आणि ग्राम नीति निर्धारणानंतर वरच्या स्तरावरील नीति निर्धारण केले जाईल. तळागाळापासून ते उत्तरोत्तर उच्च पातळीवर योजना निर्माण केली जाईल. योजना तयार करताना आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय विशेतज्ञ, व्यावसायिक आणि हितसंबंधी समुहाचे सहयोगात्मक सहकार्य घेऊन ज्ञान, उदयोगशीलता, नवनिर्मितीला पूरक यंत्रणा निर्माण केली जाईल. आयोगाची कार्यक्रम आखणी आणि धोरण क्रियान्वयन करताना औद्योगिक प्रगती आणि क्षमता निर्मितीवर जोर दिला जाईल. एकदंरीत देशाचा जलद आर्थिक विकास, देशाच्या अर्थव्यवस्थेला स्पर्धाक्षम बनविणे, जागतिक अर्थव्यवस्थेत भारताची दमदार पद्धतीने वाटचाल घडवून आणणे, घटकराज्य आणि समाजातील विविध योजना संलग्नित घटकांचे रचनात्मक सहकार्य व मार्गदर्शन इत्यादी व्यापक उद्देशाच्या आधारावर नीति आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे.

**नीति आयोग रचना-** नीति आयोगाची रचना पुढील प्रमाण आहेत

१. **अध्यक्ष-** भारताचा पंतप्रधान
२. **कार्यकारीमंडळ-** राज्याचे मुख्यमंत्री, (केंद्रशासित प्रदेशामध्ये विधानसभा अस्तित्वात असेल तर मुख्यमंत्री) आणि केंद्रशासित प्रदेशाचे नायब राज्यपाल
३. **क्षेत्रीय परिषद-** विशिष्ट मुद्दे आणि आकस्मिक घटना की जिचा संबंध एकापेक्षा अधिक राज्याशी संबंधित असेल तेव्हा तिचा विचार करण्यासाठी क्षेत्रीय परिषद स्थापन केली जाईल. ही परिषद विशिष्ट काळासाठी निर्माण केली जाईल. तिची बैठक पंतप्रधानाच्या निर्देशानुसार निश्चित केली जाईल. बैठकीत संबंधित राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशाचे नायब राज्यपाल सहभागी होतील. बैठकीचे अध्यक्षस्थान नीति आयोगाचा उपाध्यक्ष करतील. नियोजन मंडळाच्या रचनेत घटकराज्यांना समावून घेण्यात आले नव्हते. या परिषदेद्वारा राज्यांचे मुख्यमंत्री आणि नायब राज्यपालाना प्रतिनिधित्व देऊन सामावून घेण्यात आले. त्यामुळे सहकारी संघराज्यवाद संकल्पनेला चालना मिळेल हा सरकारी पातळीवरून दावा केला जात आहे.
४. **नीति आयोगाचे संघटनात्मक रचना-**
   I. उपाध्यक्ष- पंतप्रधानमंत्रीद्वारा नियुक्त व्यक्ती
   II. पूर्णवेळ सदस्य- पंतप्रधानद्वारा नियुक्त तज्ञ व्यक्ती तीन सदस्य
   III. अंशकालिन सदस्य- विश्वविद्यालय, संशोधन संस्था आणि संबंधित संस्थातील जास्तीत दोन तज्ञ सदस्य पंतप्रधानद्वारा मर्यादित काळासाठी नियुक्त
   IV. पद्सिद्ध सदस्य- केंद्रीय मंत्रिमंडळातील पंतप्रधानद्वारा नियुक्त चार सदस्य
   V. विशेष आमंत्रित सदस्य- केंद्रीय मंत्रिमंडळ पंतप्रधानद्वारा नियुक्त सदस्य
   VI. मुख्य कार्यकारी अधिकारी- भारत सरकारच्या सचिव स्तरावरच्या अधिकाराचा निश्चित कार्यकालासाठी पंतप्रधानाद्वारे नियुक्ती
५. विविध क्षेत्रातील तज्ञ आणि विशेषतज्ञ व्यक्ती

**नीति आयोग पदाधिकारी तक्ता**

**अध्यक्ष-** नरेंद्र मोदी

**उपाध्यक्ष-** अरविंद पनगरिया

**मुख्य कार्यकारी अधिकारी-**अमिताभ कांत

**पूर्णवेळ सदस्य-** बिबेक देबरॉय (अर्थशास्त्र), डॉ. वी. के. सारस्वत (पूर्व संरक्षण सचिव DRDO), रमेश चंद (शेती तज्ञ)

**पद्सिद्ध सदस्य-** राजनाथ सिंह, अरूण जेटली, सुरेश प्रभू, राधामोहन सिंग (सर्व केंद्रीय मंत्री)

**विशेष आमंत्रित सदस्य-**

नितिन गडकरी, थावर चंद गहलोत, स्मृति ईराणी(सर्व केंद्रीय मंत्री)

**टिप- नीति आयोग स्थापनेची आवश्यकता-** भारताने स्वीकारलेल्या जागतिकीकरणाच्या पर्वानंतर समाजवादी व्यवस्थेतील नियोजनमंडळ सारख्या घटनाबाह्य संस्थेच्या कार्याविषयी दबक्या आवाजात चर्चा होती. परंतु काँग्रेस पक्षाचे भारतीय राजकारणावर वर्चस्व असल्यामुळे आयोग बरखास्त करण्याचा विचार सार्वजनिक स्वरूपात व्यक्त होऊ शकला नाही. मात्र १६ व्या लोकसभेत नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाखाली पुरोगामी लोकशाही आघाडी सरकारने सत्ताग्रहण केल्यानंतर हे मंडळ बरखास्त करण्याची जोरदार चर्चा सुरू झाली. या मंडळाच्या कारभारावर जाहीर नाराजी व्यक्त केली जाऊ लागली. सरकारी पातळीवर मंडळाच्या मूल्यमापनासाठी आयोग नेमण्यात आला. आयोगाने नियोजन मंडळाची निरर्थकता स्पष्ट केल्यामुळे सरकारने नवीन ठराव पारित करून आयोगाऐवजी नीति आयोगाच्या स्थापनेची अधिकृत घोषणा केली.मागील काही वर्षापासून शासनाच्या संस्थागत संरचना विकसित आणि परिपक्त होऊ लागल्या.

१. नवउदारीकरणाच्या युगात नेहरूप्रणित महालनोबिस प्रारूपाकडून देश आता पुढे गेलेला आहे. नियोजनातील सार्वजनिक गुंतवणूकीचा मुद्या अप्रस्तुत बनलेला आहे. कारण गुंतवणूकीसाठी खाजगी सहभाग आवश्यक बनला आहे. या बदललेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यास नियोजन आयोग ही संस्था सक्षम नाही. नियोजन आयोग ही संस्था सार्वजनिक क्षेत्राकरिता नियोजन करत होती. खाजगी क्षेत्राशी नियोजनाचा संबंध नव्हता. खाजगी संस्थाची देशात वाढलेल्या भागीदारीच्या पार्श्वभूमीवर या संस्थेची इतिश्री होणे अटळ होते म्हणून आयोग बरखास्त करून नीति आयोगाची स्थापना करण्यात आली.
२. शासनाच्या कार्यक्षेत्रात विशेषीकरणाचे युग सुरू  झाले. शासनाने कार्य सोपविलेल्या संस्थेच्या कार्यात देखील विशेषीकरणाचा बोलबाला सुरू झाला. म्हणून नियोजन प्रक्रियेच्या संदर्भात देखील विशेषीकरणाचा आग्रह धरला जाऊ लागला. नियोजन मंडळाला शासन प्रक्रिया आणि शासकीय कार्यप्रणालीपासून स्वतंत्र व स्वायत्त आणि अधिक क्रियाशील बनविण्याची चर्चा सुरू झाली. सरकारच्या नीति निर्धारणात हे मंडळ थिंकटँकच्या स्वरूपात कार्य करेल. प्रत्येक स्तरावरील नीति निर्धारणाच्या तत्त्वाच्या बाबतीत महत्त्वपूर्ण आणि तांत्रिक स्वरूपाचा सल्ला प्रदान करेल. आर्थिक क्षेत्रातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आयातसंबंधी मुद्दे, देशांतर्गत आणि अन्य देशाशी व्यापार, उदयोग उदिमांच्या वाढीसाठी सर्वोत्तम प्रक्रियेचा अवलंब व प्रसार, नवे नीतिगत विचाराचा स्वीकार करेल तसेच बदलत्या जागतिक परिपेक्ष्यात एकीकृत विश्वरचनेचा भाग एक भाग बनेल या दृष्टीने कार्य करेल म्हणून केंद्रसरकारने उपरोक्त जबाबदाऱ्या पार पाडण्यास नियोजन आयोग सक्षम नसल्यामुळे हा आयोग बरखास्त करून नीति आयोगाची स्थापना केली.
३. नियोजन मंडळ ही संस्था केंद्रीकरणाला प्राधान्य देणारी व संघराज्य पद्धतीवर आघात करणारी होती. नियोजन मंडळाचा एकतर्फी व्यवहारात राज्याची भागीदारी, राज्याचे प्रतिनिधित्व आणि सल्ला मसलतीला अजिबात महत्त्व नव्हते. एक पक्षीय नितीनिर्धारण म्हणजे केंद्रात सत्तेवर असलेल्या पक्षाच्या नितीनुसार योजनाची आखणी करणाऱ्या मंडळाऐवजी नीति आयोग विकासवादी परिवर्तनाच्या स्वरूपात राज्याचे निती निर्धारणासंबंधीचे वास्तविक दृष्टीकोन आणि भागीदारीवर भर दिला जाईल. जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी सरकारचे नीति दृष्टीकोनासोबत प्रासंगिक विषयाबाबत संस्थेकडे आवश्यक संसाधने, ज्ञान, कौशल्य आणि क्षमता उपलब्ध असतील म्हणजे जलद आर्थिक विकास आणि निती निर्धारणात राज्याची भागीदारी आणि प्रतिनिधित्वासाठी ह्या आयोगाच्या स्थापनेची आवश्यकता होती.
४. विश्वात होणाऱ्या बदलाच्या सकारात्मक प्रभावाला आपल्या नीतिचा भाग बनविण्यासाठी एका सक्षम आयोगाची सरकारला गरज होती. कारण भारताच्या विकासासाठी कोणतेही एकच प्रतिमान वा मॉडेल निर्माण करता येऊ शकत नाही. विकासासाठी इतर देशाच्या प्रतिमानाचा अवलंब करून नितीनिर्धारण करता येणार नाही. आपल्या विकासाच्या गरजा व  क्षमता ओळखून नितीनिर्धारण आपल्याला स्वत: करावे लागेल म्हणून या संस्थेला विकासाचे प्रतिमान निर्माण करताना ते भारतीय दृष्टीकोनावर आधारित असेल याकडे लक्ष केंद्रीत करावे लागेल म्हणजे विकास प्रतिमान हे भारतीय गरजेवर आधारित असेल हे निर्माण करण्यासाठी ह्या संस्थेची आवश्यकता होती.

उपरोक्त स्वरूपाचे कार्य पार पाडण्यासाठी राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था उर्फ नीति आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाची स्थापना करताना राज्य सरकारे, संसद सदस्य, विशेष तज्ञ आणि संबंधित संस्थासहित तमाम हितधारकाशी सविस्तर विचार करून संस्थेची निर्मिती केलेली आहे.

**नीति आयोगाचे उद्देश व कार्य-** नीति आयोग साधारणतः खालील उद्देशासाठी कार्य करेल.

१. राज्याची सक्रिय भागीदारी व राष्ट्रीय विकासाला प्राधान्य देणे हा आयोगाचा प्रथम उद्देश आहे. राष्ट्रीय उद्देश लक्षात घेऊन घटकराज्याच्या सक्रिय भागीदारीच्या आधारावर राष्ट्रीय विकासाची प्राथमिकता, क्षेत्रे आणि रणनीतिविषयी एक सामायिक दृष्टीकोन विकसित करणे, विकासासाठी देशाला व्हिजन उपलब्ध करून देणे आणि हे व्हिजन कशा पद्धतीने अंमलात आणता येईल यासाठी पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्याना राष्ट्रीय अजेंडयाचे प्रारूप उपलब्ध करून देणे वा राष्ट्रीय अजेंडा तयार करून देणे हे आयोगाचे प्रमुख कार्य आहे.

२. 'सशक्त राज्य हेच सशक्त राष्ट्र निर्माण करू शकतात' हे ब्रीद लक्षात घेऊन नीति आयोगाने राज्यासोबत सतत संरचनात्मक भागीदारी विकसित करणे आणि आपल्याकडे उपलब्ध तंत्राच्या माध्यमातून सहयोगप्रदान संघराज्यावादाचा विकासाला सहाय्य करणे आणि राज्यांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून देणे.

३. ग्रामस्तरावर विश्वसनीय योजना निर्माण करण्यासाठी आवश्यक तंत्र विकसित करणेआणि त्याला उत्तरोत्तर उच्च स्तरापर्यंत पोहचविणे.

४. आयोगाकडे सोपविलेल्या विशेष क्षेत्राविषयीच्या आर्थिक धोरणात राष्ट्रीय सुरक्षा हिताचा समावेश आहे की नाही हे सुनिश्चित करणे म्हणजे सरकारच्या आर्थिक धोरणात राष्ट्रीय सुरक्षेच्या हिताला प्राधान्यक्रम उपलब्ध करून देणे.

५. आर्थिक प्रगतीच्या लाभापासून वंचित असलेल्या समुहावर विशेष ध्यान केंद्रीत करून त्यांच्या विकासाला पूरक नीतिची आखणी करणे. आर्थिक विकासाची फळे समाजाच्या सर्वात शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करणे.

६. रणनीतिक आणि दीर्घकालीन विकासासाठी आवश्यक नीति आणि कार्यक्रमाचा ढाचा तयार करणे आणि या कार्यक्रमाची प्रगती आणि क्षमताचे निरीक्षण करणे. निरीक्षणातून लक्षात आलेल्या त्रुटी आणि प्रतिक्रियाच्या माध्यमातून आलेल्या सूचनाच्या आधारावर कार्यक्रमात मध्यवर्ती संशोधन करून नवीन सुधारणा करून उणिवा दूर करण्याचा प्रयास करणे.

७. समान विचारधारा असलेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय थिंक टँक, महत्त्वपूर्ण हितधारक आणि शैक्षणिक आणि नीति संशोधन संस्था यांच्याशी विचारविनिमय आणि प्रोत्साहनात्मक भागीदारी घडवून आणणे.

८. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विशेतज्ञ, व्यावसायिक आणि अन्य हितधारकाचे सहयोगात्मक समुदाय इत्यादीच्या माध्यमातून ज्ञान, नवीनता, उपक्रमशीलतेला सहाय्यक प्रणालीचे निर्माण करणे.

९. राष्ट्रीय विकास अजेंडा वेगाने अंमलात आणण्यासाठी अंतर-क्षेत्रीय आणि अंतर- विभागीय मुद्यांच्या सोडवणुकीसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

१०. आधुनिक कला संसाधन केंद्र स्थापना केली जाईल. ते केंद्र सुशासन आणि न्यायसंगत विकासासाठी सर्वश्रेष्ठ कार्यप्रणाली वा प्रक्रिया निर्माण करण्यासाठी संशोधन करेल त्यासोबत हितधारकां पर्यंत माहिती पोहचविण्याचे काम करेल.

११. आवश्यक संसाधनाची ओळख करण्याबरोबर कार्यक्रम आणि उपायाच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन आणि नियंत्रण जबाबदारी आयोग पार पाडेल जेणेकरून कार्यक्रमाच्या यशस्वीतेविषयीच्या संभाव्यता प्रबळ बनविल्या जातील.

१२. कार्यक्रम आणि निती निर्धारणाच्या अंमलबजावणी करताना औद्योगिक प्रगती आणि क्षमतानिर्मितीवर भर देणे.

१३. राष्ट्रीय विकास अजेंडा आणि उपरोक्त उद्देशाच्या परिपूर्तीसाठी आवश्यक कार्य पार पाडणे.

**टिप-नीति आयोगाची भूमिका व महत्त्व-** गतिशीलता हा नीति आयोगाच्या कार्याचा प्रमुख भाग मानला जातो. खाजगी क्षेत्र आणि आयोग परस्परांच्या सल्लामसलतीनुसार धोरण आखणी करतील जेणेकरून खाजगी उदयोगाना सामर्थ्य प्रदान करून जलद आर्थिक विकास साध्य होईल. राज्याराज्यात विकासासाठी स्पर्धाक्षम वातावरण निर्माण करून सहकारी संघराज्याचा विकास करण्याचा प्रयत्न हा आयोग करेल. आयोगाकडे सोपविलेल्या विविध कार्याचे चार गटात वर्गीकरण केले जाते.

**१. सहकारी संघराज्यवादाला प्रोत्साहन-** नीति आयोगाचे प्रमुख कार्य म्हणजे सहकारी संघराज्यवादाला प्रोत्साहन देणे आहे. राज्यांना सातत्याने संरचनात्मक सहाय्य उपलब्ध करून सहकारी संघराज्याचे संगोपन करणे. राज्य केंद्राच्या धोरण व कार्याची अंमलबजावणी करणारे महत्त्वपूर्ण अभिकरण मानले जाते. या अभिकरणाला माहिती, अनुभव व तंत्रज्ञान पुरवून स्पर्धेसाठी सक्षम बनविणे आणि राज्यराज्यात निरोगी स्पर्धेला उत्तेजन देणे यात आयोगाची भूमिका महत्त्वपूर्ण स्वरूपाची असेल.

२. **व्यूहरचनात्मक नियोजन-** देशाच्या आर्थिक विकासाला गति देण्यासाठी समष्टी आणि क्षेत्रीय पातळीवर व्यूहरचनात्मक नियोजन करणे हे आयोगाचे दुसरे महत्त्वपूर्ण काम मानले जाते. नियोजनाची सुरूवात तळापासून म्हणजे गावापासून करणे आणि त्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्धकरून देणे व उत्तरोत्तर पातळीवर नियोजनाचे स्तर वाढवून अंतिमतः राज्य आणि सर्वात शेवटी देशपातळीवर व्यूहरचनात्मक नियोजनाचा आराखडा तयार करणे. या सर्वासाठी आवश्यक सल्ला, मार्गदर्शन व संसाधनाची उपलब्धता निर्माण करण्यात आयोगाची भूमिका निर्णायक स्वरूपाची असेल.

३. **नवप्रर्वतन केंद्र-** भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक स्पर्धाक्षम बनविण्यासाठी आवश्यक संशोधन आणि संशोधनाच्या आदानप्रदानावर आयोग भर देईल. संशोधनाचे कृतीत रूपांतर कार्य करण्यासाठी तंत्रज्ञानाची पातळी उंचावणे, क्षमताची बांधणी करणे, ज्ञानाचे उपयोजनात रूपांतर करणे, समंक अधिकोष (Data Bank) मजबूत करणे, तज्ञाची भागीदारी व सहाय्य घेणे इत्यादीच्या माध्यमातून आयोग हे नवप्रर्वतनाचे केंद्र म्हणून भूमिका बजावेल.

४. **आंतरविभागीय सहकार्य-** भारतीय संघराज्याच्या विकासासाठी राज्याराज्यात आंतरविभागीय सहकार्याची नितांत गरज आहे. परंतु भारताच्या विविध घटकराज्यांमध्ये सहकार्याचा अभाव दिसून येतो. अनेक लहानमोठया कारणावरून राज्याराज्यात विवाद व संघर्ष अस्तित्वात असल्याचे दिसतो. त्यामुळे राष्ट्र विकासाला खीळ बसलेली आहे. नीति आयोग राज्यांना एक हक्कांचे व्यासपीठ उपलब्ध करून देईल. क्षेत्रीय परिषदेच्या माध्यमातून राज्यांना आपले प्रश्न मांडता येतील. राज्यांना आवश्यक संसाधने, तांत्रिक सहाय्य व मार्गदर्शन हा आयोग उपलब्ध करून देईल आणि त्यांच्या माध्यमातून राज्यांना विकास करता येईल. राज्याराज्यात स्पर्धाक्षम वातावरण निर्माण करून आंतरविभागीय सहकार्य विकसित करण्याची प्रमुख भूमिका आयोगाला पार पाडावी लागेल.

अशा प्रकारे भारताच्या जलद आर्थिक विकासासाठी आणि विकास प्रक्रियेत सर्व हितधारकाचा समावेश घडवून आणण्यासाठी व देशाच्या विकासात राज्याची रचनात्मक भागीदारी विकसित करण्यासाठी आवश्यक कार्य नीति आयोगाकडे सोपविलेली आहेत. हा थिंक टँक आर्थिक बाबतीत नव्हे तर संरक्षण व तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासाला पूरक ठरेल असा आशावाद व्यक्त केलेला आहे. जागतिकीकरणाच्या पर्वात नियोजन आयोग ही कालबाह्य संस्था बनली होती. त्यामुळे बदलत्या परिस्थितीत नव्या संस्थेची गरज होती नीति आयोगाच्या स्थापनेने ही गरज पूर्ण करेल. ही संस्था देशाच्या विकासाला अपेक्षित दिशादर्शन करण्याचे, गुणवत्तापूर्ण सुविधा, विकासासाठी आवश्यक साह्य उपलब्ध करून देण्याचे कार्य करेल म्हणजे नियोजन आयोग बरखास्त झाला म्हणजे नियोजन संपले असे नसून बदलत्या जागतिकीकरणाच्या पर्वातील नवीन गरजा लक्षात घेऊन व्यापक पातळीवर म्हणजे थेट तळापासून नियोजन करून देशाच्या विकासाला इंधन पुरविण्याचे काम हा आयोग करेल. भविष्यातील भारताच्या विकासासाठी ही महत्त्वपूर्ण संस्था असेल हा विश्वास तिच्या पुरस्कर्त्यांनी व्यक्त केलेला आहे.

**टिप- नीति आयोगाचे मूल्यमापन-** नीति आयोगाच्या कार्य व महत्त्वाविषयी अनेक आशावाद व्यक्त केलेले असले तरी काही अभ्यासकांनी नीतिआयोगामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा उहापोह केलेला आहे. त्यातील काही प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. नीति आयोगाच्या निर्मितीमुळे राष्ट्रीय विकास परिषद (National Development Council) बरखास्त होईल. त्यामुळे राज्याच्या हक्कांचे एक व्यासपीठ नष्ट होईल ही आशंका काही अभ्यासकांनी व्यक्त केली. हे मंडळ संविधानात्मक स्वरूपाची संस्था नसली तरी या परिषदेत राज्यांना आपली बाजू मांडता येत असे. ही परिषद राज्याची मुख्य शक्ती मानली जात होती. ही परिषद बरखास्त करून नीति आयोग प्रादेशिक वा क्षेत्रीय परिषदेची संकल्पना पुढे आली. परंतु या परिषदेत राज्यांनी केंद्रानुकूल धोरणे राबवावीत यासाठी विनंती वा दडपण टाकले जात असल्याची टीका काही राज्यांनी केलेली आहे.

२. नीति आयोगामुळे राज्यांना दिल्या जाणाऱ्या संसाधनात कपात केली जाईल आणि राज्यांच्या नियोजनावर केंद्राचे वर्चस्व निर्माण होईल अशी टीका केली जाते तसेच राज्यांनी नवउदारीकरण व खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारे प्रारूप राबवावे यासाठी आयोग काम करतो असा ही आक्षेप काहींनी घेतलेला आहे.

३. नीति आयोगाद्वारे केंद्र सरकार आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण करत आहे. या आयोगामुळे राज्यांना आपल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र मार्ग निवडता येणार नाही. त्यामुळे राज्याच्या आर्थिक स्वायत्ततेला धक्का पोहचेल असे काही अभ्यासकांना वाटते.

४. राज्याचे विकास धोरण आणि संसाधन वाटपावर नियोजन मंडळासारखे किंवा त्याहून प्रभावी नियंत्रण नीति आयोगाचे असेल असे काही अभ्यासकांना मत व्यक्त केले आहे.

५. नीति आयोगाला आपले उद्देश सफल करण्यासाठी प्रशासकीय सहकार्याची नितांत गरज आहे. परंतु प्रशासनातील नोकरशहा विशेषतज्ञाना अपेक्षित सहकार्य करतील का? हा अत्यंत कळीचा मुद्या मानला जातो. आयोगाचे भविष्यात नियोजन आयोगाप्रमाणे नोकरशाहीत रूपांतर होणार नाही याबद्दल काहीही खात्री देता येत नाही. म्हणून काही अभ्यासक आयोगाच्या यशस्वितेविषयी साशंकता व्यक्त करतात.

६. राज्याराज्यात सहकार्य व स्पर्धा निर्माण करून सहकारी संघराज्याचे स्वप्न हा आयोग पाहत असला तरी भारतातील राज्याराज्यामधील तणाव लक्षात घेता आणि आयोगाची वाटचाल पाहता हे एक प्रकारचे दिवास्वप्न आहे अशी टीका केली जाते.

अशा पद्धतीने नीति आयोगाच्या क्षमतेवर काही अभ्यासकांनी प्रश्नचिन्ह उभे केलेले आहे. परंतु वरील टीकेवरून घाईघाईत कोणताही निष्कर्ष काढणे धोकेदायक ठरेल. कारण आयोगाची स्थापना होईन फक्त एक वर्ष झालेले आहे आणि एवढया कमी कालावधीत कार्याविषयी शंका उपस्थित करणे योग्य ठरणार नाही. आयोगाच्या कार्याची नीट कार्यकक्षा देखील ठरलेली नसतांना आयोगाच्या भवितव्याविषयी शक्यता व्यक्त करणे हे आयोगाच्या कार्यक्षमतेविषयी प्रश्नचिन्ह उभे करणे ठरेल. मात्र तरी देखील अभ्यासकांनी व्यक्त केलेल्या आक्षेपाकडे दुर्लक्ष करणे देखील धोकेदायक ठरू शकते. कारण अभ्यासकांनी नियोजन मंडळाचा पूर्वानुभव आणि नीति आयोगाचे सुरूवातीचे कार्य लक्षात घेऊन आयोगाच्या उणिवा दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या उणिवाचा नीट अभ्यास करून आयोगाच्या कार्यात वेळावेळी सुधारणा घडवून आणण्यास हा आयोग भविष्यकालीन भारतातील एक महत्त्वपूर्ण संस्था ठरेल.

**प्र. ४था. घटना दुरूस्ती प्रक्रिया अर्थ, स्वरूप, महत्त्व आणि प्रकार स्पष्ट करा.**

घटना हा देशाच्या राज्यकारभाराचा मूलभूत कायदा असतो. घटनेद्वारा शासनाच्या विविध अंगाची रचना, कार्य आणि परस्परसंबंधाची निश्चिती केलेली असते. तसेच शासन आणि नागरिक यांच्यातील संबंधाविषयीचे कायदे घटनेत समाविष्ट केलेले असतात. शासनाची निर्मिती करणे एवढेच घटनेचे काम नसते तर शासनाच्या अधिकाराची कक्षा निश्चित करण्याचे कार्य देखील पार पाडले जाते. त्यासाठी शासनाच्या अधिकार कक्षेवर कोणकोणत्या मर्यादा आहेत याचा उहापोह केलेला असतो. घटना हा शासकीय नियम व कायदयाचा ऐतिहासिक स्वरूपाचा दस्ताऐवज असतो. या मूलभूत दस्ताऐवजात वारंवार बदल होऊ लागल्यास जनतेच्या मनात घटनेविषयी अप्रीती निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे घटनेत सहजासहजी बदल होऊ नये यासाठी प्रत्येक देशातील घटनाकारांनी काळजी घेतलेली आहे. भारतीय घटनाकारांनी देखील घटना दुरूस्ती प्रक्रियेबद्दलच्या तरतूदीचा समावेश करताना ही दक्षता घेतलेली आहे. घटनेत सहजासहजी बदल होऊ नये ही गोष्ट योग्य असली तरी घटना पूर्णपणे अपरिवर्तनीय स्वरूपाची बनविणे शक्य नसते कारण घटना निर्मिती करताना तत्कालीन काळाच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब तिच्यावर पडलेले असते. देशाच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीत मूलभूत बदल झाल्यास त्यांचे प्रतिबिंब घटनेत उमटणे आवश्यक असते अन्यथा घटना ही कुचकामी ठरू शकते. समाजव्यवस्थेतील परिवर्तनास अनुसरून सुसंगत बदल घटनेत केले नाही तर नागरिक घटनेचे पालन करणार नाही ही गोष्ट अराजकतेला निमंत्रण देणारी ठरेल म्हणून घटना काळानुरूप बनविण्यासाठी घटनेत दुरूस्तीची पद्धत दिलेली असते. घटनादुरूस्ती विषयी मत व्यक्त करताना अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांनी पुढील मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, "घटना ही नागरिकाच्या जीवनाला प्रेरणा देणारी असावी. म्हणून राष्ट्रीय जीवनातील परिवर्तनाबरोबरच घटनेत देखील परिवर्तन झाले पाहिजे."याचा अर्थ राज्यकारभाराच्या नियमाचा समावेश असलेला घटना सारखा दस्ताऐवज देखील काळानुरूप बदलणे गरजेचे असते. राज्यघटना हे देखील राजकीय बदलाचे एक साधन आहे. या साधनात परिस्थितीनुसार बदल झाले नाही तर क्रांतीची शक्यता बळावते आणि हा धोका कमी करण्यासाठी घटनेतील कायदयात जनतेच्या इच्छा, आकांक्षानुरूप बदल घडवून आणला जातो. हा बदल घडवून आणण्यासाठी घटनेत घटनादुरूस्ती प्रक्रियेचा समावेश केलेला असतो. त्यासदंर्भात ८ नोव्हेंबर १९४८ रोजी घटना परिषदेत मत व्यक्त करताना पंडित नेहरू म्हणाले की, "आम्हाला एक स्थायी स्वरूपाची घटना निर्माण करावयाची आहे. परंतु ती अपरिवर्तनीय स्वरूपाची नसेल तर तिच्यात लवचिकतेचे अस्तित्व असेल. घटनेने राष्ट्राच्या प्रगतीला वाव दिला पाहिजे. कारण प्रत्येक निवडून येणारी नवी संसद भारताच्या प्रौढ नागरिकांचे प्रतिनिधित्व करणारी असेल आणि अशा निवडून आलेल्या सभागृहातील सदस्यांना हवे ते बदल करण्याची संधी मिळाली पाहिजे." घटनेत भविष्यातील बदलासोबत दुरूस्तीची आवश्यकता असते हा अर्थ नेहरूच्या विधानातून ध्वनीत होतो. घटना दुरूस्ती गरज वा आवश्यकता लक्षात घेऊन भारतीय राज्यघटनेच्या ३६८ व्या कलमा घटनादुरूस्ती प्रक्रिया समावेश केलेला आहे. घटना दुरूस्तीच्या प्रक्रियेच्या आधारावर घटनेचे स्वरूप व वर्गीकरण निश्चित केले जात असते. राज्यघटनेत दुरूस्तीच्या दोन प्रसिद्ध पद्धती आहेत.

१) **परिवर्तनीय पद्धत-** (Flexible System)- ज्या राज्यघटनेत दुरूस्तीची पद्धत अत्यंत सोपी व लवचिक स्वरूपाची असते त्या राज्यघटनेला परिवर्तनीय राज्यघटना मानली जाते. उदा. इंग्लंडची राज्यघटना इंग्लंडमध्ये पार्लमेंटच्या

साध्या बहुमताने कोणत्याही कायदयात परिवर्तन करता येते किंवा नवीन कायदे करता येतात. त्यामुळे इंग्लंडची राज्यघटना सर्वात परिवर्तनीय वा लवचिक राज्यघटना मानली जाते.

२) **परिदृढ पद्धत-** (Rigid System)- ज्या राज्यघटनेत दुरूस्तीची पद्धत अत्यंत किचकट, कठीण वा गुंतागुंतीची असते त्या राज्यघटनेला परिदृढ राज्यघटना मानली जाते. उदा. अमेरिकेची राज्यघटना अमेरिकेच्या घटनेत दुरूस्तीची पद्धत अत्यंत ताठर वा कठीण स्वरूपाची आहे. अमेरिकाच्या कॉंग्रेसच्या दोन्ही सभागृहानी २/३ बहुमताने आणि ३/४ राज्यांनी मान्यता दिल्याशिवाय दुरूस्ती होत नाही याच कारणामुळे अमेरिकेच्या घटनेत ३५० वर्षात अवघ्या ३० दुरूस्त्या झालेल्या आहेत.

भारतीय घटनाकारांनी दोन्ही पद्धतीतील अतिरेक टाळून सुवर्णमध्ये साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. घटना दुरूस्तीची पद्धत अत्यंत परिवर्तनीय वा लवचिक स्वरूपाची ठेवली तर वारंवार घटनेत बदल होतील. भारतासारख्या विविधता असलेल्या देशात तर सरकार बदले की घटना बदलेल तसेच घटना दुरूस्तीची पद्धत अत्यंत कठीण वा ताठर ठेवल्यास घटना काळानुरूप बदलणार नाही आणि भारतासारख्या विविधता असलेल्या आणि अनेक राजकीय पक्ष असलेल्या देशात दुरूस्तीसाठी आवश्यक बहुमत वा एकमत निर्माण होऊ शकणार नाही त्यामुळे घटनाकारांनी दोन्ही मार्गातील धोके जाणून मध्यमार्गी स्वरूपाची घटना दुरूस्ती पद्धत स्वीकारलेली आहे.

**टिप-घटना दुरूस्तीची प्रक्रिया-** भारतीय राज्यघटनेच्या ३६८ व्या कलमात घटना दुरूस्ती प्रक्रियेविषयी तरतूद केलेली आहे. घटनेत दुरूस्ती करण्यासाठी तीन पद्धती वा मार्गाचा वापर केलेला आहे. प्रत्येक पद्धतीसाठी वेगळया स्वतंत्र अटी निश्चित केलेल्या आहेत. घटना दुरूस्तीच्या तीन ही पद्धती पुढील प्रमाणे होत.

१) **संसदेच्या साध्या बहुमताने दुरूस्ती-** या पद्धतीनुसार संसदेच्या दोन्ही सभागृहापैकी कोणत्याही गृहात सामान्य कायदयाप्रमाणे घटना दुरूस्ती विधेयक मांडता येते. दोन्ही सभागृहातील उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्याच्या साध्या बहुमताने प्रस्ताव पारित केल्यानंतर त्यावर राष्ट्रपतीने स्वाक्षरी केली ही दुरूस्ती अस्तित्वात येते. ही घटना दुरूस्तीची पद्धत सर्वात सोपी मानली जाते. घटनेतील कमी महत्त्वपूर्ण तरतूदीत बदल करण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जातो. या पद्धतीद्वारा घटनेतील पुढील भागात बदल करता येतो.

   **१)** घटकराज्याचे नाव, प्रदेश, सीमा इत्यादी बदल करणे, नवीन घटक राज्याची निर्मिती करणे, नवीन घटकराज्याचा संघराज्यात समावेश करणे.
   **२)** विधानपरिषद निर्मिती वा भंग करणे.
   **३)** नागरिकत्वाबद्दलचे कायदे करणे.
   **४)** सर्वोच्च न्यायालय न्यायाधीश संख्या ठरविणे वा तात्पुरते न्यायाधीशाची नेमणूक करणे, सर्वोच्च व उच्च न्यायालय कामकाज भाषा निश्चित करणे.
   **५)** संसद सदस्य वेतन व भत्ते वाढविणे, संसद सदस्य विशेषाधिकार ठरविणे, गणपूर्ती व मतदारसंघाविषयीचे नियम आणि कामकाजाचे नियम निश्चित करणे, सरकारी कामकाजातील भाषा वापराबाबतच्या तरतूदी
   **६)** संसद आणि घटकराज्य विधिमंडळ मतदार यादया व मतदारसंघाची निश्चिती करणे.
   **७)** राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सभापती, सर्वोच्च व उच्च न्यायालय वेतन, भत्ते व सेवेच्या अटी निश्चित करणे.
   **८)** अनुसूचित जमाती प्रदेशाचे प्रशासन आणि नियंत्रणाविषयी नियम तयार करणे.

२) **संसदेच्या विशेष बहुमताने दुरूस्ती-** या पद्धतीनुसार संसदेच्या कोणत्याही सभागृहात घटना दुरूस्ती विधेयक मांडता येते. संसदेच्या दोन्ही सभागृहातील उपस्थित व मतदान करणाऱ्या २/३ सदस्यांच्या बहुमताने प्रस्ताव पारित झाल्यानंतर राष्ट्रपतीची स्वाक्षरी झाली की ही दुरूस्ती अस्तित्वात येते. या दुरूस्तीने घटनेतील महत्त्वपूर्ण भागात बदल करता येतो. उदा. मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे व घटनेतील बऱ्याशा भागात या पद्धतीने दुरूस्ती करता येते.

३) **संसदेचे विशेष बहुमत व निम्मे घटकराज्यांच्या मान्यतेने दुरूस्ती-** या पद्धतीनुसार संसदेच्या कोणत्याही गृहात घटना दुरूस्ती विधेयक मांडता येते. संसदेच्या दोन्ही सभागृहातील उपस्थित व मतदान करणाऱ्या २/३ बहुमताने प्रस्ताव पारित केल्यानंतर घटकराज्याच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविला जातो. भारतातील निम्मे घटकराज्याच्या विधिमंडळानी प्रस्तावाला मान्यता प्रदान केल्यानंतर त्यावर राष्ट्रपतीची स्वाक्षरी झाल्यास ही दुरूस्ती अंमलात येते. घटना दुरूस्तीची ही पद्धत अत्यंत किचकट व कठीण मानली जाते. या दुरूस्तीच्या माध्यमातून घटनेच्या अतिशय महत्त्वपूर्ण भागात बदल घडवून आणतो येतो. या दुरूस्तीच्या मार्गाने घटनेच्या पुढील भागात बदल करता येतो.

   **१)** राष्ट्रपतीची निवडणूक
   **२)** सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र
   **३)** केंद्र व घटकराज्य यातील संबंध

**४)** घटनादुरूस्तीतील ३८६ वे कलम
**५)** संसदेतील घटकराज्याचे प्रतिनिधित्व

**टिप-घटना दुरूस्ती प्रक्रियेची वैशिष्टये-** घटना दुरूस्ती प्रक्रिया हा भारतीय राज्यघटनेचा महत्त्वपूर्ण पैलू मानला जातो. भारतीय घटना दुरूस्तीची प्रक्रिया ही गुंतागुंतीची असण्यापेक्षा वैविध्यपूर्ण स्वरूपाची आहे. घटना दुरूस्ती प्रक्रियेतील सुटसुटीतपण लक्षात घेता डॉ. के. सी. व्हीअर यांनी पुढील शेरा मारलेला आहे की, "भारतीय घटनाकारांनी राज्यांच्या हक्कांचे संरक्षण करून व तरतूदींच्या दुरूस्तीमध्ये लवचिकता ठेवून योग्य समतोल साधला गेला आहे." भारतीय घटना निर्मिती करताना घटनाकारांनी कोणत्याही भूमिकेबाबत अतिताठरता धारण केली नाही तोच कित्ता घटना दुरूस्तीबाबतही स्वीकारलेला आहे. त्या संदर्भात डॉ. बी.आर. आंबडेकर सांगतात की, "भारतीय संघराज्य व्यवस्थेला कायदेशीर वादाला सामोरे जावे लागणार नाही; कारण लवचिकता हे भारतीय संघराज्य पर्यायाने घटनेचे वैशिष्टये आहे." घटना दुरूस्तीच्या तरतूदीवरून या प्रक्रियेची पुढील वैशिष्टये सांगता येतात.

१) घटनादुरूस्तीविषयक विधेयक मांडण्याचा म्हणजे पुढाकार घेण्याचा अधिकार संसदेला आहे. घटकराज्यांना घटनादुरूस्ती विधेयक मांडता येते नाही तसेच घटना दुरूस्तीच्या फक्त तिसऱ्या प्रकार वा पद्धतीसाठी घटकराज्यांची मान्यता घ्यावी लागते.
२) संसदे दोन्ही सभागृह आणि तिसऱ्या प्रकारासाठी निम्मे राज्याची मान्यता मिळाल्यानंतर राष्ट्रपतीची सही झाली की घटना दुरूस्ती अस्तित्वात येते. परंतु हे विधेयक राष्ट्रपती फेटाळू शकतो का? किंवा या विधेयकास किती दिवसापर्यंत संमती प्रदान करावी याबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद घटनेत आढळून येत नाही.
३) घटना दुरूस्ती विधेयकावरून लोकसभा व राज्यसभेत मतभेद झाल्यास संयुक्त अधिवेशनाची तरतूद नाही.
४) घटना दुरूस्तीच्या ३८६ व्या कलमानुसार घटनेच्या कोणत्याही भागात बदल करता येतो.
५) घटना दुरूस्तीच्या तीन प्रक्रियापैकी प्रथम प्रक्रिया परिवर्तनीय स्वरूपाच्या आणि उरलेल्या दोन प्रक्रिया परिदृढ स्वरूपाच्या आहेत.
६) घटना दुरूस्तीनंतर सार्वमत वा लोकनिर्णय घेण्याची आवश्यकता नाही.
७) संसदेने प्रस्ताव पारित केल्यानंतर घटकराज्याकडे किती दिवसात प्रस्ताव पाठवावा याबाबत देखील निश्चित काल मर्यादाचे बंधन नाही.

**टिप-घटना दुरूस्ती प्रक्रियेचे मूल्यमापन-** भारतीय राज्यघटनेतील घटना दुरूस्ती प्रक्रियेचा सखोल अभ्यास करून काही अभ्यासकांनी या प्रक्रियेतील काही उणिवा निदर्शनात आणून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) घटना दुरूस्ती प्रक्रियेतील सर्वात प्रमुख उणीव म्हणजे राज्य विधिमंडळाना घटना दुरूस्ती प्रस्ताव सादर करता येत नाही फक्त तिसऱ्या प्रकारच्या दुरूस्तीसाठी निम्मे घटकराज्यांची मान्यता घेतली जाते आणि इतर दोन दुरूस्तीबाबत घटकराज्याची मान्यता घेणे आवश्यक नाही ही तरतूद संघराज्याच्या तत्त्वांशी विसंगत आहे तसेच दुरूस्ती प्रक्रियेतील भेदभाव स्पष्ट करणारी आहे. राज्याना घटना दुरूस्ती प्रक्रियेत घटनेने दुय्यम वा गौण स्थान दिल्याचे दिसते.
२) घटना दुरूस्तीचे विधेयक दोन्ही सभागृहानी संमत केल्यानंतर राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीसाठी जाते. परंतु किती कालावधीत स्वाक्षरी करावी ह्याचे स्पष्टीकरण घटनेत नसल्यामुळे राष्ट्रपती स्वाक्षरी न करता विधेयक रोखून ठेवू शकतो. २४ व्या घटनादुरूस्तीने कायदेमंडळाने संमत केलेल्या घटना दुरूस्ती विधेयकावर नकाराधिकार वापरण्याचा अधिकार काढून घेण्यात आला. त्यामुळे राष्ट्रपतीची स्वाक्षरी ही फक्त औपचारिक प्रक्रिया उरलेली ही एक प्रकारे घटनात्मक तरतूदीची विंडबना आहे.
३) अमेरिका, जपान, फ्रॉन्स व इतर अनेक देशात घटनेतील दुरूस्तीसाठी कायदेमंडळासोबत घटना समितीचे दुरूस्तीसाठी खास अधिवेशन बोलावून देखील दुरूस्ती केली जाते. परंतु भारतात घटना दुरूस्तीसाठी घटना समितीचे मंडळ बोलविण्याची तरतूद केली नसल्यामुळे कायदेमंडळाशिवाय घटनेत दुरूस्ती करता येत नाही.
४) घटना दुरूस्ती अधिकारावर काही देशाच्या घटनाकारांनी बंधने लादलेली आहे. उदा. अमेरिकेतील सिनेटमधील समान प्रतिनिधित्व परंतु भारतात संसदेच्या घटनादुरूस्ती अधिकारावर कोणत्याही मर्यादा नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने गोलखनाथ विरूद्ध पंजाब सरकार खटल्यात १३ व्या कलमाचा आधार घेऊन मूलभूत हक्कात बदल करण्याचा अधिकार नाही असा निकाल दिला परंतु सरकारने २४ वी घटनादुरूस्ती करून १३ कलमात काहीही म्हटलेले असले तरी ते घटना दुरूस्तीच्या ३६८ कलमाला लागू नाही हा बदल करून न्यायालयाने लादलेली मर्यादा मानण्यास नकार दिला. केशवानंद भारती खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने संसदेला घटनेची चौकट बदलता येणार नाही हा निकाल दिला मात्र सरकारने ४२ व्या घटनादुरूस्ती करून ३६८ व्या कलमानुसार घटनेच्या

कोणत्याही भागात बदल करता येईल असा बदल केला याचा अर्थ संसदेला घटना दुरूस्तीचा अमर्याद अधिकार दिलेला आहे ही गोष्ट लोकशाही व्यवस्थेसाठी घातक असे काही अभ्यासकांना वाटते.

५) अमेरिका, स्विझर्लंड व युरोपातील अनेक देशात घटनेत मूलभूत स्वरूपाचा बदल घडवून आणावयाचा असेल तर सार्वमत वा जनमत घेणे बंधनकारक असते. परंतु भारतीय राज्यघटनेने सार्वमताचा अधिकार दिलेला नाही एका अर्थाने राजकर्त्यांवर्गांच्या कृपेवर जनतेने विसंबून राहावे हेच वास्तव घटना दुरूस्ती तरतूदीवरून लक्षात येते.

वरील प्रकारच्या उणिवा अभ्यासकांनी मांडलेल्या असल्या तरी घटना अंमलात आल्यापासून ते आजपर्यंत झालेल्या दुरूस्त्याचे स्वरूप लक्षात घेता दुरूस्ती प्रक्रियेतील लवचिकता स्पष्टपणे निदर्शनात येते. घटनेमध्ये परिणामकारक बदल घडवून आणण्याची सत्ता संसदेला बहाल केल्यामुळे अत्यंत अल्पकाळात भारतीय राज्यघटनेत व्यापक बदल घडवून आणणे शक्य झाले. घटनेनंतरच्या ६७ वर्षात १०१ दुरूस्ती होणे ही घटनाकारांनी भविष्यातील राज्यकर्त्यांवर्गांबद्दल दाखविलेला विश्वास काळाच्या कसोटीवर खरा ठरला. "घटनात्मक विकासाची यंत्रणा योग्य तऱ्हेने अस्तित्वात आहे याची परीक्षा या दुरूस्ती प्रक्रियेमुळे होत असते." हे प्रा. अलेक्झांड्रोविझ यांनी व्यक्त केलेले मत भारतीय घटनेला तंतोतत लागू होते.

**भारतीय राज्यघटनेतील महत्त्वपूर्ण घटना दुरूस्त्या-** घटनेच्या अंमलबजावणीपासून ते आजपर्यंत ११२ घटना दुरूस्त्या संसदेत मांडल्या गेल्या आहेत परंतु प्रत्यक्षात १०१ दुरूस्त्या झालेल्या आहेत त्यातील काही दुरूस्त्या अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जातात. या दुरूस्त्याचा अभ्यास आपण या मुद्यांत करणार आहोत.

**टिप-त्र्याहत्तरावी घटनादुरूस्ती-** पी.व्ही.नरसिंहराव प्रधानमंत्री असताना १६ सप्टेंबर १९९१ रोजी विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले. सविस्तर चर्चा झाल्यानंतर २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेने तर २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने विधेयकास मान्यता दिली. २४ एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतीची स्वाक्षरी झाल्यानंतर विधेयकाचे कायदयात रूपांतर झाले. या घटनादुरूस्तीमुळे पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. पंचायतराज संस्थांमधील विविधता नष्ट होऊन एकसूत्रता निर्माण झाली. पंचायतराज व्यवस्थेत आरक्षण, नियमित निवडणुका आणि आर्थिक अधिकार हे या घटनादुरूस्तीचे उद्देश होते. या दुरूस्तीने पुढील तरतूदी करण्यात आल्या आहेत.

१. **घटनात्मक स्थान व दर्जा-** पंचायत राज संस्था राज्यसूचीत समाविष्ट होत्या. या घटनादुरूस्तीने राज्यघटनच्या नवव्या परिशिष्टात कलम २४३ (A) व (O) समाविष्ट करून पंचायतराज संस्थाना घटनात्मक दर्जा दिलेला आहे.

२. **त्रिस्तरीय पंचायतराजव्यवस्था-** या दुरूस्तीनुसार जिल्हा स्तरावर जिल्हापरिषद, तालुकास्तरावर पंचायत समिति आणि ग्रामपातळीवर ग्रामपंचायत ही त्रिस्तरीय रचना सांगितली आहे. २० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या राज्यांना मध्यमस्तर (पंचायत समिती) स्थापनेपासून सूट देऊन द्विस्तरीय पद्धत सांगितली आहे.

३. **ग्रामसभेची तरतूद-** या घटनादुरूस्तीने प्रत्येक गावासाठी ग्रामसभा आवश्यक करण्यात आली आहे. ग्रामसभेला जास्तीत जास्त अधिकार देण्याचे निर्देश दिले आहेत. ग्रामसभेत गावातील सर्व प्रौढ नागरिकांचा समावेश होता.

४. **निवडणुका-** या घटनादुरूस्तीनुसार पंचायतराज संस्थातील कार्यकालात समानता आणली आहे. हा कार्य पाच वर्ष इतका करण्यात आला आहे. कार्यकाल संपण्याच्या सहा महिन्यापूर्वी किंवा बरखास्त केल्यानंतर सहा महिन्याच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक केले आहे.

५. **आरक्षण तरतूद-** या कायदयानुसार अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात, स्त्रियांना ३३ टक्के आणि इतर मागासवर्गीयाना आरक्षण ठरविण्याचा अधिकार विधानसभांना दिलेला आहे. निवडणुकीतील जागा व राजकीय पदाधिकाऱ्या पदातही आरक्षण दिलेले आहे.

६. **वित्तीय व्यवस्था-** या घटनादुरूस्तीनुसार पंचायतराज्याच्या वित्तीय व्यवस्थेची जबाबदारी राज्य विधिमंडळावर सोपविण्यात आली आहे. विधिमंडळ कायदे करून पंचायतराज संस्थांना कर आकारणी व वसुलीचे अधिकार देऊ शकते. पंचायत राज संस्थांची आर्थिक स्थितीची समीक्षा, उत्पन्न साधन निश्चित करण्यासाठी दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोग स्थापन करण्याचा अधिकार राज्यपालाना दिला आहे. पंचायत राज संस्थांना राज्य संचित निधीतून अनुदानाची व्यवस्था केलेली आहे.

**टिप-चौऱ्याहत्तरावी घटना दुरूस्ती-** पी.व्ही. नरसिंहरावाच्या काळात २० एप्रिल १९९३ राष्ट्रपतीच्या संमतीने ७४ वी घटनादुरूस्ती झाली. १ जून १९९३ पासून या घटनादुरूस्तीचे कायदयात रूपांतर झाले. या दुरूस्तीने पुढील बदल कलेले आहेत.

१. **घटनात्मक स्थान व दर्जा-** शहरी स्थानिक संस्था राज्यसूचीत समाविष्ट होत्या. या घटनादुरूस्तीने राज्यघटनच्या नवव्या परिशिष्टात कलम २४३ (त) व (य, छ) समाविष्ट करून शहरी स्थानिक संस्थांना घटनात्मक दर्जा दिलेला आहे.

२. **शहरी संस्थाची रचना-** या दुरूस्तीनुसार नगरपंचायत ग्रामीण क्षेत्राचे नागरी क्षेत्रात संक्रमण होत असलेल्या क्षेत्रात तर नगरपरिषद लहान नागरी क्षेत्रासाठी आणि महानगरपालिका मोठया नागरी क्षेत्रासाठी या प्रमुख तीन संस्थांना स्थापण्याचा अधिकार राज्यांना देण्यात आला. या शिवाय राज्यपालाना औद्योगिक क्षेत्रासाठी औद्योगिक वसाहत घोषित करण्याचा अधिकार दिला.

३. **निवडणुका-** या घटनादुरूस्तीनुसार नागरी संस्थातील कार्यकालात समानता आणली आहे. हा कार्य पाच वर्ष इतका करण्यात आला आहे. कार्यकाल संपण्याच्या सहा महिन्यापूर्वी किंवा बरखास्त केल्यानंतर सहा महिन्याच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक केले आहे. शहरी संस्थाच्या निवडणुकासाठी प्रभाव संस्थाची रचना करण्यात आली. नियमित निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोग स्थापण्याची शिफारश केली.

४. **आरक्षण तरतूद-** या कायदयानुसार शहरी संस्थामध्ये अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात, स्त्रियांना ३३ टक्के आणि इतर मागासवर्गीयाना आरक्षण ठरविण्याचा अधिकार विधानसभांना दिलेला आहे. निवडणुकीतील जागा व राजकीय पदाधिकाऱ्या पदातही आरक्षण दिलेले आहे.

५. **वित्तीय व्यवस्था-** या घटनादुरूस्तीनुसार शहरी संस्थांना वित्तीय व्यवस्थेची जबाबदारी राज्य विधिमंडळावर सोपविण्यात आली आहे. विधिमंडळ कायदे करून शहरी संस्थांना कर आकारणी व वसुलीचे अधिकार देऊ शकते. शहरी स्थानिक संस्थांची आर्थिक स्थितीची समीक्षा, उत्पन्न साधन निश्चित करण्यासाठी दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोग स्थापन करण्याचा अधिकार राज्यपालाना दिला आहे. प्रत्येक राज्याचे विधिमंडळ नागरी संस्थाना हिशोब ठेवणे आणि हिशोब तपासणीसंबंधी कायदयात तरतूद करते. शहरी संस्थांना संस्थांना राज्य संचित निधीतून अनुदानाची व्यवस्था केलेली आहे.

**टिप- शहाऐंशीवी घटना दुरूस्ती-** भारत सरकारने १२ डिसेंबर २००२ रोजी केलेल्या ८६ व्या घटनादुरूस्तीनुसार १४ वर्षाच्या आतील लहान बालकाच्या शिक्षण हक्काला मान्यता देण्यात आली आणि ० ते सहा वर्षापर्यंतच्या बालकांच्या हक्कांची देखील हमी देण्यात आली. या दुरूस्तीनंतर शिक्षण अधिकार हा मूलभूत वा मौलिक अधिकार मानला जाऊ लागला. प्रत्येक लहान बालकाला शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाने आपल्या अंगावर घेतली. १४ वर्षातील आतील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून देण्याचे स्वप्न या दुरूस्तीने पूर्ण झाले.

**टिप- एकशेएकवी घटना दुरूस्ती-** संपूर्ण देशात अप्रत्यक्ष कराच्या एक समान पद्धतीकरिता जीएसटी प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय केंद्र सरकारने मनमोहनसिंग पंतप्रधान असताना केला त्यासाठी डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आणि या समितीने दिलेल्या अहवालाच्या आधारावर जीएसटीचे विधेयक तयार केले आणि विधेयक मंजूरीसाठी प्रयत्न केले परंतु भाजपशासित राज्यांनी विरोध केल्यामुळे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. २०१४ च्या निवडणुकीत विजयी झालेल्या नरेंद्र मोदी सरकारने कररचने ऐतिहासिक बदल घडवून आणण्यासाठी आणि 'एक देश एक कर' उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जीएसटी मंजूरीसाठी व्यापक प्रयत्न सुरू केले. त्यासाठी एकशे बावीसावे घटनादुरूस्ती विधेयक लोकसभेत मांडले. लोकसभेने ६ मे २०१५ रोजी विधेयक पारित केले त्यानंतर राज्यसभेत मांडण्यात आले. ३ ऑगस्ट २०१६ रोजी राज्यसभेने दुरूस्तीसह विधेयक पारित केले. राज्यसभेने सूचविलेल्या दुरूस्त्या मान्य करून हे विधेयक लोकसभेने परत मंजूर केले. जम्मू-काश्मिर वगळता सर्व राज्याच्या विधानसभानी संमती दिल्यानंतर ८ सप्टेंबर २०१६ रोजी राष्ट्रपतीने मान्यता दिल्यानंतर एकशे एकवी घटनादुरूस्तीची प्रक्रिया पूर्ण झाली. या दुरूस्तीनुसार वस्तू आणि सेवा कर १ जुलै २०१६ पासून लागू झाला. संपूर्ण भारतात समान कररचना निर्माण करण्यासाठी अनेक दिवसापासून मंजूरीच्या प्रतीक्षेत (Goods and Services Tax Bill) असलेले बिल सर्व पक्षांच्या संमतीने मंजूर करण्यात आल्यामुळे खालील लाभ होतील.

१. केंद्र आणि राज्याचे बहुसंख्य अप्रत्यक्ष कर जीएसटीत एकत्र होत असल्यामुळे करप्रणाली सोपी व सुटसुटीत होईल.
२. एक करामुळे व्यापाऱ्यांना हिशोब ठेवणे सोयीचे होईल.
३. करावर कर लागत नसल्यामुळे ग्राहकांना वस्तू स्वस्त मिळेल.
४. करवसुली, कर अंमलबजावणी आणि कररचना यात पारदर्शकता आणि सुटसुटीतपणा या दुरूस्तीमुळे येणार असल्यामुळे आर्थिक दृष्टीकोना हे बिल ऐतिहासिक असल्याचे म्हटले जाते.
५. देशभर एकच कर प्रणालीमुळे संपूर्ण देश एकसंघ बाजारपेठ बनेल.
६. संगणक प्रणालीचा वापर करणे जीएसटीमुळे सोपे होईल.
७. समान कररचनेमुळे उत्पादन व सेवा क्षेत्राला चालना मिळवून देशाची आर्थिक वृद्धी घडून येईल.

अशा प्रकारे भारतीय राज्यघटना लागू झाल्यापासून ते आजपर्यंत म्हणजे घटनेच्या वाटचालीतील ६७ वर्षांत एकूण ११२ घटना दुरूस्त्या संसदेत मांडल्या गेल्या त्यापैकी प्रत्यक्षात १०१ घटना दुरूस्त्या संसदेने संमत केल्या आहेत. या

दुरूस्त्यापैकी काही घटना दुरूस्त्या अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जातात. ४२ व्या घटना दुरूस्तीसारख्या वादग्रस्त आणि विस्तृत घटना दुरूस्त्यामुळे घटनेच्या मूलभूत चौकटीला धक्का बसला परंतु भारतासारख्या समंजस लोकमताने हा बदल अमान्य केला आणि घटनेच्या चौकटीला आणि तिच्या तत्त्वाला धक्का लावणाऱ्या सरकारचा निवडणुकीत पराभव केला त्यामुळे या दुरूस्तीने केलेले अनेक हानीकारक बदल नंतरच्या काळात रद्द करण्यात आले. घटना दुरूस्तीच्या अधिकारावरून अनेकदा सत्तारूढ सरकार आणि न्यायालये यांच्या संघर्ष झाल्याची देखील उदाहरणे आहेत. न्यायालयाचा निर्णय हाणून पाडण्यासाठी सरकारने अनेकदा घटना दुरूस्त्या केलेल्या आहेत तसेच न्यायालयांनी देखील हार न मानता अनेक घटनादुरूस्त्या न्यायालयीन पुर्नविलोकन तत्त्वाचा आधार अवैध घोषित केलेल्या आहेत. घटना दुरूस्ती प्रक्रिया आणि अधिकारावरून सरकार आणि न्यायालये यात वेळावेळी झालेल्या संघर्षातून अनेक पेचप्रसंग वा तणाव निर्माण झ ााल्याचे दिसून येत असेल तरी हा तणाव कायमस्वरूपी भारतासारख्या देशात टिकून राहत नाही हे भारतीय जनमाणस आणि घटनेच्या लवचिकतेचे उत्तम उदाहरण मानता येईल. घटना दुरूस्तीच्या अधिकाराच्या माध्यमातून घटनाकारांनी भविष्यातील पिढीला आपले भवितव्य निर्धारित करण्याचा अधिकार दिलेला आहे.

**टिप-भारतीय संविधानात सातत्याने घटना दुरूस्ती करण्याचे धोके-** भारतीय राज्यघटनेतील अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरू झाली. घटनेच्या अंमलबजावणीपासून ते आजपर्यंत म्हणजे जवळपास ६७ वर्षात एकशे बावीस घटनादुरूस्ती विधेयके संसदेत मांडले गेली आणि त्यापैकी एकशे एक घटना दुरूस्तींना संसदेची मान्यता मिळालेली आहे. साधारणतः दोन वर्षाच्या कालखंडात तीन या प्रमाणे घटनेत दुरूस्त्या झालेल्या दिसतात. त्यामुळे एवढया कमी कालावधीत एकशे एक दुरूस्त्या होणे योग्य आहे काय? हा प्रश्न चर्चिला जाऊ लागला आहे. वारंवार होणाऱ्या दुरूस्त्यामध्ये संविधानाच्या मूलभूत ढाच्यात तात्त्विक उणिवा होत्या काय? असा ही काही अभ्यासक उपस्थित करू लागले आहेत. घटनेत मूलभूत स्वरूपाचे दोष असतील तर घटना परिषदेचे पुनर्गठन करून नवीन घटना तयार करावी अशी सल्लावजा शिफारश करणारे अभ्यासक आहेत परंतु या सर्व चर्चेमध्ये फारसे तथ्य आढळून येत नाही. संविधानाच्या मूलभूत दोष दूर करण्यासाठी घटनेत फारशा दुरूस्त्या झालेल्या दिसून येत नाही. घटना दुरूस्तीची चर्चा करताना अमेरिकेच्या घटनेचा संदर्भ देऊन चर्चा केली जाते. अमेरिकेची घटना लागू होऊन सव्वातीनशे वर्ष झाली परंतु त्या घटनेत फक्त तीस दुरूस्त्या झाल्या. परंतु अमेरिका आणि भारतीय घटनेच्या घटना दुरूस्तीच्या संख्येची तुलना करता येणार नाही. अमेरिकेच्या घटनेची दुरूस्ती पद्धत अत्यंत किचकट, परिदृढ व गुंतागुंतीची आहे. त्यामुळे त्या देशाच्या घटनेत फारशा दुरूस्त्या झालेल्या नाहीत. भारतीय राज्यघटना अंशतः परिदृढ व अंशतः परिवर्तनीय असल्यामुळे घटना दुरूस्तीसाठी परिवर्तनीय आणि परिदृढ पद्धत वापरल्यामुळे दुरूस्त्यांची संख्या जास्त आढळून येते. मात्र काही अभ्यासकांच्या मते वरील मुद्दे ग्राह्य धरले तरी घटना दुरूस्तीमुळे होणाऱ्या धोक्याकडे दुर्लक्ष करता कामा नये. भारतीय राज्यघटनेत सातत्याने झालेल्या दुरूस्तीमुळे पुढील धोके निर्माण झालेले दिसतात.

१. **घटनेचे पावित्र्य भंग होते-** भारतीय राज्यघटनेत सातत्याने झालेल्या दुरूस्त्यामुळे घटनेचे पावित्र्य भंग होते. घटनाकारांनी घटनेत व्यापक उद्देशाने काही गोष्टीचा समावेश केलेला आहे. घटना दुरूस्तीच्या माध्यमातून त्यात वारंवार बदल होत असेल घटनेच्या पावित्र्याला हरताळ फासल्यासारखे होईल.

**२. न्यायालयाचे महत्त्व कमी होते-** भारतीय राज्यघटनेत न्यायव्यवस्थेचे महत्त्व कमी करण्यासाठी काही दुरूस्त्या केलेल्या आहेत. उदा. २४, ३८, ४२ वी घटना दुरूस्ती. या दुरूस्तीच्या माध्यमातून कार्यकारीमंडळाचे अधिकार वाढविण्यात आले. न्यायमंडळाला घटनेने दिलेल्या न्यायालयीन पुर्नविलोकनाच्या अधिकारावर गदा आणण्यासाठी केलेल्या आहे. शासनाच्या तिन्ही विभागातील समतोल आणि सत्ताविभाजन करण्याचा घटनाकारांचा प्रयत्न उघळून लावण्याचा हा एक प्रकार आहे. न्यायमंडळाचे महत्त्व कमी झाल्यास कार्यकारीमंडळाची हुकूमशाही निर्माण होऊ शकते.

**३. घटक राज्याचे महत्त्व कमी होते-** भारताने संघराज्य शासन प्रणालीचा अवलंब केलेला आहे. घटनेने केंद्र आणि राज्य यात अधिकार विभागणी केलेली आहे. परंतु घटना दुरूस्तीच्या अधिकाराचा वापर करून केंद्र सरकारने अनेकदा घटक राज्याचे अधिकार कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदा ४२ व्या घटना दुरूस्तीने सातव्या परिशिष्टातील सूची मधील विषयाच्या संख्येत बदल केलेला आहे. भारतातील बहुसंख्य घटना दुरूस्तीच्या माध्यमातून राज्याचे अधिकार कमी करण्यात आलेले आहेत. उदा. १०१ वी घटना दुरूस्ती जीएसटी घटना दुरूस्ती विधेयक मांडण्याचा अधिकार राज्याना नाही तसेच तिसऱ्या प्रकारच्या दुरूस्तीसाठी फक्त निम्मे राज्याची मान्यता आवश्यक असते. पक्षशिस्तीच्या जोरावर केंद्रीय शासन निम्मे राज्याची सहज संमती मिळवू शकते. घटनेत वारंवार दुरूस्त्या होऊ लागल्या तर राज्याचे अधिकार मोठया प्रमाणावर कमी होऊ शकतात.

४. **राजकीय अस्थितेला निमंत्रण-** घटना दुरूस्तीच्या माध्यमातून राजकीय अस्थिरतेला निमंत्रण मिळू शकते. घटना दुरूस्तीच्या माध्यमातून केंद्र सरकार जनतेच्या मूलभूत अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न करत असते. उदा. ४२ वी घटना दुरूस्ती जनतेच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्नाला जनता व विरोधी पक्षाकडून मोठया प्रमाणावर विरोध होत असतो. सरकारला विरोध करण्यासाठी मोर्चे, आंदोलने, उपोषण, संप इत्यादी मार्गांचा अवलंब करत असते सरकार जनतेला विरोध दडपून काढण्यासाठी दंडशक्तीचा वापर करते त्यातून राजकीय अस्थिरतेचा जन्म होऊ शकतो.

५. **विचारसरणीचा प्रसार-** आपल्या विचारधारेला मार्गांत अडथळे आणणारा विचार वा तरतूद रद्द करण्यासाठी देखील घटना दुरूस्तीचा वापर केला जातो. आपण विशिष्ट विचारसरणीचे समर्थक आहोत हे दर्शविण्यासाठी देखील घटना दुरूस्तीचा अवलंब केला जातो. उदा. ४२ व्या घटना दुरूस्तीने सरनाम्यात समाविष्ट केलेले धर्मनिरपेक्षता व समाजवाद शब्द वा तत्त्व मूळ घटनेत समाविष्ट नसलेल्या विचारधाराचा समावेश करण्यासाठी आणि त्यांच्या प्रसार व प्रसारासाठी देखील घटना दुरूस्ती तरतूदीचा वापर केला जातो.

६. **सत्तेचे केंद्रीकरण-** घटना दुरूस्तीच्या माध्यमातून राजकीय सत्तेचे मोठया प्रमाणावर केंद्रीकरण होण्याचा धोका आहे. आजपर्यंत झालेल्या दुरूस्तीचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, घटना दुरूस्तीमुळे केंद्र सरकारच्या अधिकारात मोठया प्रमाणावर वाढ झालेली दिसते. सत्तेच्या अति केंद्रीकरणामुळे केंद्राकडे मोठया प्रमाणावर अधिकार एकवटले आहेत. उदा. पंतप्रधान पदाचे स्थान समानातील पहिले राहिले नसून देशाचा सर्वश्रेष्ठ व शक्तिशाली प्रमुख असे बनलेले आहे. संसद आणि न्यायमंडळाचे अधिकार कमी होऊन मंत्रिमंडळाचे अधिकार वाढत असल्यामुळे संसदीय लोकशाही ही कॅबिनेट लोकशाही बनत असल्याचे दिसते.

अशा प्रकारे संविधानात सातत्याने केलेल्या दुरूस्त्यामुळे धोके निर्माण होऊ शकतात.

**खालील दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडा.**

१. घटनेच्या ------ कलमानुसार राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आली.
   अ) ३४८ ब) ३४९ क) **३५०** ड) ३५१
२. मूलभूत अधिकारातील ------ कलमात अल्पसंख्याकाच्या अधिकाराचा समावेश केलेला आहे.
   अ) १४ ते १८ ब) १९ ते २२ क) २५ ते २८ ड) **२९ व ३०**
३. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम ---- साली संमत करण्यात आला होता.
   अ) १९९१ ब) **१९९२** क) १९९३ ड) १९९४
४. जैन समुदायाला अल्पसंख्याक समाजाचा दर्जा ---- साली देण्यात आला.
   अ) **२०१४** ब) २०१५ क) २०१६ ड) २०१७
५. सातव्या राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष------ आहेत.
   अ) हमीद अंन्सारी ब) **नसीम अहमद** क) डॉ. ताहीर मोहम्मद ड) श्री.वजाहत हबीबबुल्ला
६. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना -------- झाली.
   अ) १० ऑक्टोबर १९९३ ब) ११ ऑक्टोबर १९९३ क) **१२ ऑक्टोबर १९९३** ड) १३ ऑक्टोबर १९९३
७. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचा कार्यकाल ----- वर्षाचा असतो.
   अ) दोन वर्ष ब) तीन वर्ष क) चार वर्ष ड) **पाच वर्ष**
८. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग अध्यक्ष व सदस्याला ----- वषापर्यंत पदावर राहता येते.
   अ) ६० ब) ६५ क) **७०** ड) ७५
९. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग अध्यक्ष व सदस्याची नेमणूक----- करतो.
   अ) **राष्ट्रपती** ब) पंतप्रधान क) केंद्रिय मंत्री ड) राज्यपाल
१०. राष्ट्रीय मानव अधिकार अध्यक्षाचा दर्जा ----- प्रमाणे असतो.
११. अ) **सर्वोच्च न्यायालय सरन्यायाधीश** ब) सर्वोच्च न्यायालय न्यायाधीश क) उच्च न्यायालय मुख्य न्यायाधीश ड)उच्च न्यायालय न्यायाधीश
१२. नियोजन मंडळाची स्थापना --- साली झाली होती.
   अ) १३ मार्च १९५० ब) १४ मार्च १९५० क) **१५ मार्च १९५०** ड) १६ मार्च १९५०
१३. नीति आयोगाची स्थापना --------- झाली.
   अ) **१ जानेवारी २०१५** ब) १ फेब्रुवारी २०१५ क) १ मार्च २०१५ ड) १ एप्रिल २०१५
१४. नीति आयोगाचे अध्यक्ष ------ आहेत.

अ) **नरेंद्र मोदी** ब) नितीन गडकरी क) राजनाथसिंग ड) स्मृती इराणी

१५. नीति आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी ------ आहेत.

अ) नरेंद्र मोदी ब) अरविंद पनगरिया क) **अमिताभ कांत** ड) बिबेक देबरॉय

१६. जगात सर्वात परिवर्तनीय राज्यघटना -------- देशाची आहे.

अ) **इंग्लंड** ब) अमेरिका क) कॅनडा ड) रशिया

१७. जगात सर्वात परिदृढ राज्यघटना-------- देशाची आहे.

अ) इंग्लंड ब) **अमेरिका** क) कॅनडा ड) रशिया

१८. भारतीय घटना दुरूस्तीची प्रक्रिया------- कलमात विशद केलेली आहे.

अ) ३६५ ब) ३६६ क) ३६७ क) **३६८**

१९. भारतीय राज्यघटनेचे स्वरूप ------------ प्रकारचे आहे.

अ) परिदृढ ब) परिवर्तनीय क) **अंशतः परिवर्तनीय आणि अंशतः परिदृढ** ड) यापैकी नाही

२०. भारतीय घटना दुरूस्तीच्या --------- पद्धती घटनेत नमूद केलेल्या आहेत.

अ) दोन ब) **तीन** क) चार ड) पाच

२१. भारतीय घटना दुरूस्ती प्रकियेतील सर्वात -------- परिवर्तनीय पद्धत कोणती आहे.

अ) **साधे बहुमताने दुरूस्ती** ब) विशेष बहुमताने दुरूस्ती क) विशेष बहुमत व निम्मे राज्य संमतीने दुरूस्ती ड) यापैकी नाही.

२२. भारतीय घटना दुरूस्ती प्रकियेतील सर्वात -------- परिदृढ पद्धत कोणती आहे.

अ) साधे बहुमताने दुरूस्ती ब) विशेष बहुमताने दुरूस्ती क) **विशेष बहुमत व निम्मे राज्य संमतीने दुरूस्ती** ड) यापैकी नाही.

२३. भारतीय संसदेत आजपर्यंत -------- घटना दुरूस्ती विधेयके मांडण्यात आली आहेत.

अ) ११० ब) १११ क) **११२** ड) ११३

२४.आजपर्यंत संसदेत मांडल्या गेलेल्या घटना दुरूस्ती विधेयकापैकी ------ दुरूस्ती संमत झालेल्या आहेत.

अ) ९८ ब) ९९ क) १०० ड) **१०१**

२५.पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक स्थान ------- दुरूस्तीने मिळाले.

अ) **७३ वी घटना दुरूस्ती** ब) ७४ वी घटना दुरूस्ती क) ७५ वी घटना दुरूस्ती ड) ७६ वी घटना दुरूस्ती

२६. ७४ वी घटना दुरूस्तीचे ------- प्रमुख वैशिष्टये आहे.

अ) पंचायत राजला घटनात्मक स्थान क) **शहरी स्थानिक संस्थाना घटनात्मक स्थान** ड) मालमत्तेच्या अधिकाराला घटनात्मक स्थान ड) यापैकी नाही

२७.------- घटना दुरूस्तीने १४ वर्षाच्या आतील मुलांच्या शिक्षण हक्काला मान्यता दिली.

अ) ८५ वी दुरूस्ती ब) **८६ वी दुरूस्ती** क) ८७ वी दुरूस्ती ड) ८८ वी दुरूस्ती

२८. वस्तू आणि सेवा कराला----- दुरूस्तीने मान्यता प्रदान केलेली आहे.

अ) ९९ वी दुरूस्ती ब) १०० वी दुरूस्ती क) **१०१ वी दुरूस्ती** ड) यापैकी नाही

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्न**

**१.** अल्पसंख्याक आयोगाची रचना लिहा.

उत्तर- अल्पसंख्याक आयोगात एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, पाच सदस्य व एक सचिव असतो. अध्यक्ष व सदस्य हे अल्पसंख्याक वर्गातील असतात.

**२.** अल्पसंख्याक आयोगाचे दोन उद्देश सांगा.

उत्तर- अल्पसंख्याकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेणे आणिअल्पसंख्याकामधील अलगतेची भावना नाहीशी करणे.

३. अल्पसंख्याक आयोगाचे दोन कार्य लिहा.

उत्तर- केंद्र व घटक राज्य सरकारांनी अल्पसंख्याकासाठी केलेल्या वैधानिक तरतूदीचे मूल्यमापन करणे आणि अल्पसंख्याकासाठी केलेल्या कायदेशीर तरतूदीच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सूचना करणे.

**४.** अल्पसंख्याक आयोगावरील आक्षेप लिहा.

उत्तर- अल्पसंख्याकाची एक गठ्ठा मते मिळविण्यासाठी हा आयोग स्थापन करण्यात आला. शासनाने राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न व्यवस्थित केला असता तर आयोग निर्माण करण्याची आवश्यकता राहिली

नसती. आयोगाची निर्मिती करून शासनाने अलगतावाद वा पृथकतावादालाचे पोषण करून दुटप्पी भूमिका घेतली असे काही लोकांना वाटते.

५. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची रचना सांगा.
उत्तर- मानव हक्क कायदयानुसार मानव अधिकार आयोगात एक अध्यक्ष व चार पूर्णकालिक सदस्य आणि चार मानद सदस्य असतात.

६. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे अध्यक्ष व सदस्य कोण असतात.
उत्तर- अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश पदाचा अनुभव असलेली व्यक्ती तर चार सदस्यात एक सर्वोच्च न्यायालयातील कार्यरत अनुभवी न्यायाधीश किंवा माजी न्यायाधीश तर दुसरा उच्च न्यायालयात कार्यरत न्यायाधीश किंवा माजी मुख्य न्यायाधीश आणि उरलेले दोन सदस्य मानव अधिकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती असतील.

७. मानव अधिकार आयोगाची दोन कार्य लिहा.
उत्तर- पीडित व्यक्ती किंवा तिच्यावर्तीने मानव अधिकार उल्लंघन विषयक तक्रारीची नोंद घेणे आणि चौकशी करून त्याबाबत योग्य ती कारवाई करणे आणि मानव अधिकार उल्लंघनाचा आरोप अंतर्भूत असलेल्या न्यायालयातील प्रलंबित प्रकरणात न्यायालयाच्या संमतीने मध्यस्थी करणे किंवा प्रकरणाची चौकशी आयोग करू शकतो.

८. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगातील किती व कोणते विभाग असतात.
उत्तर- आयोगात एक महासचिव, चौकशी विभाग, प्रशासकिय विभाग, सूचना विभाग व संशोधन विभाग हे पाच विभाग कार्यरत आहेत.

९. नीती आयोग स्थापनेचे दोन उद्देश लिहा.
उत्तर- राज्याची सक्रिय भागीदारी व राष्ट्रीय विकासाला प्राधान्य देणे हा आयोगाचा प्रथम उद्देश आहे.राज्यासोबत सतत संरचनात्मक भागीदारी विकसित करणे आणि आपल्याकडे उपलब्ध तंत्राच्या माध्यमातून सहयोगप्रदान संघराज्यावादाचा विकासाला सहाय्य करणे

१०. नीती आयोगाचे महत्त्व थोडक्यात लिहा.
उत्तर- सहकारी संघराज्याला प्रोत्साहन, नवप्रवर्तन केंद्र आणि आंतरविभागीय सहकार्यासाठी नीती आयोग महत्तवपूर्ण आहे.

११. नीती आयोगावरील आक्षेप सांगा.
उत्तर- नीती आयोगामुळे केंद्राचे वर्चस्व वाढेल, राज्य संसाधनात कपात होईल आणि आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होईल असे आक्षेप घेतले जातात.

१२. घटना दुरूस्तीच्या प्रमुख दोन पद्धती कोणत्या ते सांगा.
उत्तर- परिदृढ आणि परिवर्तन घटनादुरूस्ती हे घटना दुरूस्तीचे प्रमुख दोन प्रकार आहेत.

१३. सर्वात परिवर्तनीय व परिदृढ राज्यघटना कोणत्या आहेत.
उत्तर- सर्वात परिवर्तनीय राज्यघटना इंग्लंड आणि परिदृढ राज्यघटना अमेरिकेची आहे.

१४. भारतीय घटना दुरूस्तीची पद्धत कोणत्या कलमात विशद केलेली आहे.
उत्तर- घटना दुरूस्तीचे पद्धती घटनेच्या ३६८ व्या कलमा दिलेली आहे.

१५. घटना दुरूस्ती प्रक्रियेची तीन पद्धती लिहा.
उत्तर- घटना दुरूस्ती साधे बहुमत, विशेष बहुमत, विशेष बहुमत आणि निम्मे राज्याची मान्यता या तीन मार्गाने होते.

१६. घटना दुरूस्ती प्रक्रियेची एक वैशिष्टये सांगा.
उत्तर- घटनादुरूस्तीविषयक विधेयक मांडण्याचा म्हणजे पुढाकार घेण्याचा अधिकार संसदेला आहे. घटकराज्यांना घटनादुरूस्ती विधेयक मांडता येते नाही तसेच घटना दुरूस्तीच्या फक्त तिसऱ्या प्रकार वा पद्धतीसाठी घटकराज्यांची मान्यता घ्यावी लागते.

१७. घटना दुरूस्ती प्रक्रियेचे दोन दोष लिहा.
उत्तर- राज्यविधिमंडळाला घटनादुरूस्ती प्रस्ताव मांडता येत नाही, दुरूस्तीसाठी राष्ट्रपतीवर मान्यता देण्याची कालमर्यादा निश्चित केलेली नाही.

१८. ६१ व्या घटनादुरूस्तीने कोणता प्रमुख बदल घडून आला होता.
उत्तर- या घटनादुरूस्तीने मतदानासाठी वयाची अट २१ वर्षावरून १८ वर्ष इतकी केली.

**१९.** कोणत्या घटनादुरूस्तीने शहरी आणि ग्रामीण संस्थांना घटनात्मक दर्जा उपलब्ध करून गेला.
उत्तर- ७३ वी आणि ७४ व्या घटनादुरूस्तीने शहरी आणि ग्रामीण स्वराज्य संस्थाना घटनात्मक दर्जा उपलब्ध करून दिला.

**२०.** कोणत्या घटना दुरूस्तीला चवथे स्वराज्य वा भारतातील चतुर्थ क्रांती मानले जाते.
उत्तर- १०१ व्या घटनादुरूस्तीला चौथे स्वराज्य म्हटले जाते.

**२१.** घटनेत सातत्याने दुरूस्त्या केल्यामुळे निर्माण होणारे दोन धोके सांगा.
उत्तर- घटनेत वारंवार दुरूस्त्या केल्यामुळे घटनेचे पावित्र्य भंग होईल, राजकीय अस्थिरतेला निमंत्रण मिळेल, राजकीय सत्तेचे केंद्रीकरण होईल.